आगस्ट १९८७ किंमत दोन रुपये

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



ऑगस्ट-१९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए., पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६६ वे ]** **किंमत २ रुपये** **[अंक ५**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

— कार्यालय —

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## रघुनाथ सावित्री
## साईनाथ भजनमाला

२२

सांई करिता तूझी सेवा ।
सुख वाटे माझ्या जीवा ॥
आकळूनि घेशी मन ।
होईं सर्वांभूती लीन ॥
प्रेम वसो माझे चित्तीं ।
दिसेंदिस वाढो भक्ति ॥
जो का घेई नाम सदा ।
त्यासी शिवेना आपदा ॥

२३

डोळा लावियेला दारा ।
येति बाबा केव्हां घरा ॥
मन माझें विसंबेना ।
स्मृतिवांचोनी राहीना ॥
देव नोहे साधा भोळा ।
पाहे दुरुनी सोहळा ॥
माझी पुरवी ती आळ ।
ठेवी गुरुचरणीं भाळ ॥

२४

साईचिये गांवी प्रेमाचा सुकाळ ।
जाहलें केवळ भूवैकुंठ ॥
वैकुंठीचा राजा साईनाथ माझा ।
जगाचिया काजा अवतरला ॥
अवतरला सांई जगन्माता आई ।
करा त्वरें घाई तरणोपाया ॥
तरणोपाय मिळे सांईचीया नावें ।
तनमन भावें अर्पूनियां ॥
अर्पूनियां काया तुटे मोहमाया ।
आणिक उपाया साधन नेणें ॥
साधन तें साध्य मुखीं गुरुनाम ।
आणिंक तें प्रेम सद्‌गुरुचें ॥

२५

सगुण तुझें रुप सांई मीं बरवें देखिलें ॥
मन भावें तुजसि ध्यांता परिमज हें लाभलें ॥
वदवेना मजसि कांही दृढ हृदयीं ठेविलें ॥
गुरु तूझे नाम घेता मन माझें रंगलें ॥


**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील**
**मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**

# श्री साईलीला – ऑगस्ट १९८७

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख – कविता शिर्षक | लेखक – कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | – | ४ |
| २ | श्री साईनाथांचा शरणार्थी(२६) | –श्री. विश्वास खेर | ६ |
| ३ | श्री साईंचे सत्य चरित्र | –श्री. मु. ब. निंबाळकर | १२ |
| ४ | श्री साईभक्तिचा प्रभाव | –श्री. वि. म. हटवार | २४ |
| ५ | श्री बाबांची आरती | –श्रीमती रुक्मिणी बेंद्रे | २६ |
| ६ | भक्तांच्या पारमार्थिक जीवनाचे शिल्पकार | –श्री. अनिल रसाळ | २७ |
| ७ | अचिन्त्याचे चिंतन | –श्री. शाम जुवळे | २८ |
| ८ | साईनाथांचा निष्काम कर्मयोग | –सौ. संगीता गोडबोले | ३० |
| ९ | साई तुझ्या दारी | –श्री. घोरपडे | ३३ |
| १० | गोकुळचा कृष्ण द्वारकाधिश | –डॉ. सुमन खानवीलकर | ३४ |
| ११ | बाबांच्या प्रेमाची पहिली ज्योत | –श्री. चकोर आजगांवकर | ४१ |
| १२ | साई- आई | –श्री. चंद्रकांत सरकाळे | ४३ |
| १३ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | –साईनंद | ४५ |
| १४ | श्रीसाईनाम स्मरण | –श्रीमती पुष्पलता दाभोलकर | ४६ |
| १५ | श्री साईसमकालीन आमचे आजोबा | –श्री. शशीकांत कुलकर्णी | ४७ |
| १६ | शब्द मला रे वदले | –कु. सूर्यकांत आंगणे | ४८ |
| १७ | मनाची शांती | –कु. शुभांगी कुलकर्णी | ४९ |
| १८ | देशभक्त संत पांचलेगांवकर महाराज | –सौ. सरोजिनी मुळ्ये | ५१ |
| १९ | श्री सच्चिदानंद समर्थ सद्गुरु साईनाथ | –श्री. वसंत प्रधान | ५४ |
| २० | नित्य नेमे स्मरा बाबासाई | –श्री. राम धनावडे | ५६ |
| २१ | श्री सद्गुरुबाबांना काय द्यावे? | –सौ. उषा अधिकारी | ५७ |
| २२ | विधाता – साई | –श्री. बाबू डिसोजा | ५९ |
| २३ | बालसाईभक्तांसाठी | –कु. संतोष राणे | ६० |
| २४ | नित्य मी जिवंत... | –श्री. मनमोहन चांदोरकर | ६१ |
| २५ | गंभीर शस्त्रक्रिया टळली | –सौ. सरीता लिखिते | ६२ |
| २६ | शिरडीवृत्त – मे १९८७ | – | ६३ |

# श्रींवर अढळ निष्ठा ठेवा



## संपादकीय

पाश्चात्य वाङ्मयात संत येशू खिस्ताने तत्कालीन जनतेला भक्तिमार्गाकडे वळविण्यासाठी विविध प्रयत्न केले व त्याबरोबरच अनेक चमत्कारही करुन दाखविले. जिथे चमत्कार तिथे नमस्कार या न्यायाने जनतेनेही त्यांच्या चमत्कारांचे कौतुक, स्वागत करुन त्यांच्याप्रती आपला आदरभाव दर्शविला. येशू खिस्ताचे नंतर त्याप्रमाणेच चमत्कार करुन दाखविणारी दुसरी थोर विभूती म्हणजे संत चूडामणी भगवान श्री साईबाबाच होय असे आमचे ठाम मत आहे. त्यांचा जो पहिला विलक्षण चमत्कार तत्कालीन जनतेच्या मनावर ठसठशीतपणे उमटला तो म्हणजे पणत्यांतून घालायला तेल मिळाले नाही म्हणून त्यातून केवळ पाणी घालून त्यांनी त्या साऱ्याच्या साऱ्या पणत्या पेटविल्या व विशेष म्हणजे त्या दीर्घकाळ तशाच पेटत राहिल्या हा होय. बाबांनी कित्येकदा परकाया प्रवेश करुन ती ती वेळही शोभवून नेलेली आहे.

साईनाथ पूर्णत्वाला पोचलेले योगीराज होते. त्यांनी आपल्या शरीराचे विविध अवयव वेगवेगळे केले होते इतकेच नव्हे तर आपली पोटातील लांबच लांब आंतडी काढून ती जांभळीच्या झाडावर सुकत घातली होती याबद्दलचे पुरावें आहेत. योगसिद्दी मुळेच त्यांनी आपला प्राण तीन दिवस ब्रम्हांडी चढविला होता.

श्रीसाई उत्तम वैद्य होते. श्रीसाईकडे विविध रोगांनी पछाडलेले असंख्य रोगी हरहमेशा येत. मोठ्या आशेने त्यांचेकडे येत व त्यांना आपापले रोग व्याधी दूर करण्यासाठी आवर्जून प्रार्थना करीत. त्यांत कित्येक रोगी तर अगदी असाध्य असत. पण श्रीसाईंनी त्यांना दयाळूपणे, कनवाळूपणे दिलासा देऊन त्यांना विलक्षण औषधे देऊन, करुन दु:ख मुक्त केले. त्यांच्या कृपेने आंधळ्यांना दृष्टीलाभ झाला, पांगळ्यांना चांगले चालता येऊ लागले, बहिऱ्यांना ऐकू येऊ लागले. अशा प्रकारे दीन दु:खितानां आधार देऊन त्यांचे दु:ख दूर करण्याचे भूतदयेचे फार मोठे कार्य साईंनी केले. त्यांच्या मागे हेच कार्य तुम्ही-आम्ही सर्वांनी चालवायचे आहे, चालवायला हवे आहे, चालवलेच पाहिजे.

श्रीमहाराज अंतर्ज्ञानी होते. त्यांचे भक्त मग ते कुठेही व कोणत्याही स्थितीत असोत ज्यांना त्यांची आठवण होई, त्यांची आठवण बाबाही करीत. सध्याच्या काळात दूरध्वनी आहेत, तारायंत्रे आहेत. त्यावेळी ही सारी यंत्रे नव्हती पण असे असतांना कुठे काय चालले आहे, हे श्रींना तात्काळ कळे. शेगांवला श्री गजानन महाराज, आपले बंधु गेले हे शिरडीला महाराजांना तात्काळ कळले, ही सत्यपरिस्थिती आहे. त्यावेळी त्यांनी

शिरडीत केलेला शोक त्यावेळच्या भक्तमंडळींनी पाहिला व महाराज हे असे कां वागतात हे कळेचना. पण त्यानंतर चार दिवसांनी श्री गजानन महाराजांची दु:खवार्ता समजली तेव्हा लोकांना महाराजांच्या अंतर्ज्ञानाची खात्री पटली. महाराजांनी त्यावेळी सांगून टाकले आहे की, तुम्ही कोणी कुठेही असा, तुमच्या हालचाली, तुमच्या खबरा, बातम्या, वार्ता मला समजल्या शिवाय रहात नाहीत. हजारो मैलांवर असलेल्या आपल्या भक्तांचे विचार व त्यांची स्थिती केवळ अंतर्ज्ञानाने त्यांना बरोबर समजत असे.

श्री साईनाथांनी कुठे ना कुठे बसून साधना किंवा तपस्या केली असे कुणी पाहिले नाही. बाबांनी आपल्या बालपणीच्या काळात जरुर ती साधना किंवा तपस्या केली असेल असे कुणी म्हणतील परंतु त्याला पुरावा काय? सोळा-सतराव्या वर्षी त्यांनी शिरडीत प्रवेश केला आणि त्यावेळेपासून तर त्यांना साधना करतांना कुणी पाहिलेले नाही. ते शिरडीत आले तेच पूर्णत्वाने! आपल्या पुराणग्रंथांसंबधी, वेद आणि उपनिषदासंबंधी तसेच कुराण ग्रंथासंबंधी त्यांचे अगाध ज्ञान थक्क करुन सोडणारे होते. कोणत्या ग्रंथात कोणत्या पानावर काय, कोणता मजकूर आहे हे ते चटकन् ग्रंथाचे पान उघडून देत व वाचणाऱ्याला ते वाच म्हणून सांगत. तो मजकूर नेमका पाहिजे तोच असायचा. बाबा स्वयंसिद्ध होते. वाटेल त्या बिकट प्रश्नाची उकल ते सहज रीतीने व लीलेने करीत असत. त्यासाठी त्यांना कोणताही ग्रंथ वाचावा लागत नसे हे विशेष होय. बाबा अंतर्ज्ञानी, स्वयंभू सिद्धपुरुष, योगीराज होते. जे सर्वसाधारण बुद्धिवंताला आकलन करता येत नाही, त्याचे आकलन ते सहज, लीलया, सुलभतेने करीत असत.

अशा या ज्येष्ठ नि श्रेष्ठ संत सत्पुरुषाच्या ठिकाणी तुमची निष्ठा अढळ ठेवा, हेच आवर्जून सांगावेसे वाटते.

---

## श्री साईलीला
## दिवाळी १९८७ अंकाची तयारी सुरू

भक्तांना आलेल्या श्री बाबांच्या विविध, चमत्कारिक अनुभवांचा भरगच्च १२८ पानांचा चित्ताकर्षक व वाचनीय अंक २० ऑक्टोबर १९८७ रोजी प्रसिद्ध होईल. तुमचे अनुभव ३० ऑगस्ट १९८७ पूर्वीच श्री साईलीला कार्यालयात पोचावेत. सामान्य अनुभवांना या अंकात प्रसिद्धी दिली जाणार नाही. तुमचे प्रखर व ताजे अनुभव थोडक्यात लिहा.

श्री साईलीलाकडे या दिवाळी अंकासाठी कविता अजिबात पाठवू नयेत.

— का. संपादक

# श्री साईनाथांचा शरणार्थी – २६

लेखकः **ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद**

अनुवादकः **वि. बा. खेर**

(खालील लेखात जानेवारी, १९३५ ते १० डिसेंबर १९५० पर्यंतचे लेखकाला आलेले अनुभव दिले आहेत.)

उमरेठ येथे मी मोटा फलियात (मुख्य लत्त्यात) हरिलाल जोशींच्या घरात रहात असे तेव्हा संध्यापूजा न करता फक्त ध्यान, आरती व वैश्वदेव करत असे. त्यामुळे वृत्तीमधे मोहाचे प्रमाण थोडे वाढल्यासारखे वाटले. म्हणून असे ठरविले की फक्त निराकाराचे ध्यान, वृत्ती तसेच मोह यांचे नियंत्रण करण्यास समर्थ नाही व ध्यानाबरोबर नित्यकर्म आवश्यक आहे. नित्यकर्म म्हणजे संध्या, ब्रह्मयज्ञ, गुरुपूजा; आरती ही नित्यनेमाने केल्यास वृत्ती समतोल राहू शकते.

उत्तमराम वकिलांच्या घरात बिऱ्हाड केल्यावर तेथे नवरात्री दरम्यान देवीचा सगळा पाठ विधिपुरःसर करत असता एक–दोन दिवसांनी पूजास्थानाच्या समोरच्या वरील तुळईतून खूप भ्रमर निघून उडू लागले. भ्रमरांचा उपद्रव बंद करण्यासाठी सर्व व्यावहारिक उपचार – पाणी मारणे, धूर करणे, वगैरे सर्व निष्फळ झाल्याने असा विचार आला की, नवरात्री दरम्यान सुरु केलेली देवीची साधना प्रभूस म्हणजे साईनाथांना पसंत नसावी. म्हणून लगेच साईनाथांना अंतःकरणपूर्वक मनातल्या मनात म्हणालो की, उद्यापासून देवीची साधना करणार नाही, सोडून देईन. याने भ्रमर अदृश्य झाले। त्या अगोदर वरील बिऱ्हाडी गेल्यावर लगेच वनस्पतीच्या आकारात हिरव्या रंगाने सजलेल्या देवीचे दर्शन दोन–तीन वेळा झाले. ही शाकम्भरी देवी असावी असे नंतर समजले. नवरात्रीत अखंड दीप तर चालूच असे.

"तुकाराम हरिपाठ" याचा मी केलेला गुजराथी अनुवाद घनश्यामला फार पसंत पडल्याने त्याने मला न विचारताच तो प्रसिद्ध केला. हे मला समजताच प्रथम मी त्याला खूप दूषण दिले परंतु त्याचा शुभ हेतू जाणून मी शांत झालो आणि नंतर त्याच्या साहसाबद्दल त्याला शाबासकी दिली. अनुवादाची एक प्रत घनश्यामने स्वतःहून विद्यानंदजींच्या गीताधर्म या मासिकाला पाठवली व त्यांनी तो अनुवाद दोन–तीन हप्त्यात छापून प्रसिद्ध केला. त्यानंतर मासिकाचे संचालक कोणी पटेल हे मला वारंवार पत्र पाठवून लेख पाठविण्यासाठी आग्रह करीत. म्हणून जवळजवळ सात–आठ वर्षे सन १९४५ पर्यंत नियमितपणे मी त्यांना लेख पाठवीत असे व ते छापत असत. या लेखात मुकुंदराजचे 'परमामृत', चांगदेव पासष्टी, समर्थ रामदासांनी शिवाजीला केलेला 'लघुबोध', मुक्ताबाईने चांगदेवला गायलेली अंगाई गीत वगैरे पद्यात प्रकट झाले होते. तसेच आचार्यांनी भगवद्गीतेमधून निवडलेली सूत्रे, श्री उपासनींच्या पुस्तकाच्या आधाराने मी लिहिलेले स्वतंत्र लेखही प्रसिद्ध झाले. पटेल

बदलून कोणी संन्यासी 'संचालक म्हणून आल्यावर टाकीमहाराजांचे 'साम्राज्य ते भोगणे' या पदाचे गुजराथी पद्यात्मक भाषांतर पाठविले ते त्यांनी न छापल्याने लेख पाठविण्याचे बंद केले. नवीन संचालकांनीसुद्धा माझ्याकडे लेखाची मागणी केली नाही आणि मी स्वतःहून काही पाठविले नाही. काही दिवसांनी 'गीताधर्म' माझ्याकडे येण्याचे बंद झाले.

भाटवाड्यात जोशींच्या घरात एकांत चांगला मिळे. तेथे नित्यकर्म वैश्वदेव, ध्यान आदि चांगले होई. याच सुमारास काय मंत्र जपावा या विषयी मी खूपच मंथन केले. 'कल्याण' मासिकात मी वाचले की राधेला प्रसन्न केल्याशिवाय कृष्णप्राप्ती दुर्लभ आहे. गोपीभावाशिवाय ते साधत नाही. बाबांनी सुद्धा पूर्वी बंसी बजैयाच्या नावाने 'जो तू है सो मै हूँ, मै हूँ सो तू है ।' असे सांगून अपरोक्ष ज्ञानाचा मला बोध केला होता व असे पण सांगितले होते की, 'मी गोपींचा याच रितीने उद्धार केला होता. म्हणून गोपींचा मंत्र 'गोपीजन-वल्लभ' जपण्यास सुरुवात केली. हा मंत्र ज्या दिवशी सुरु केला त्याच किंवा दुसऱ्या दिवशी रात्री बाबा स्वप्नात दिसले. तेथे नरेन्द्र पण बसला होता. बाबा म्हणाले, 'या भाच्याला सांग की हा मंत्र जप: राधाकृष्ण जय कुंजविहारी, मुरलीधर गोवर्धनधारी.' नरेन्द्र माझ्याबरोबर उमरेठ येथे नव्हता म्हणून भाच्याचा मृत्यू नजीक आहे असे समजून हा मंत्र जपू लागलो. थोड्याच वेळात हळूहळू जणू काय कोणाचा मरता मरता हाताचा अंगठा हृदयातून प्रकट होताना दिसला व तुकारामाच्या अभंगातील 'तया दिसे रुप अंगुष्ठ प्रमाण' या ओळीची आठवण झाली आणि हा मंत्र सिद्धमंत्र आहे असे समजले. त्यामुळे त्याचा जप क्वचित करी आणि जेव्हा सुमन्तबाई जेव्हा वेडे झाले तेव्हा त्यांच्या आजारात 'बाबांचा हुकूम आहे' असे सांगून हा मंत्र सर्वांकडून खूप वदविला. हल्लीचे वृंदावन येथील महाराज यांचा ता. १९-६-६० रोजी सत्कार करण्यात आला तेव्हा या मंत्राची धून पंधरा मिनिटे म्हणण्यात आली तेव्हा पुन: हृदयातून अंगठा बाहेर आला. विशेष म्हणजे हा अंगठा जसा आत तसाच बाहेर जेथे भक्त दाटीने बसले होते तेथे दिसला. त्यावरुन माझी खात्री झाली की ज्याला कृष्णभक्तीची व आत्म्याच्या दर्शनाची उत्सुकता आहे त्याने हा मंत्र जपला तर त्याच्यासाठी जरुर आत्मरुप भगवान प्रकट होईल.

याच सुमारास गुरुपूजनसमयी ध्वनी ऐकला की 'जो पर्यंत देवीच्या नवार्णव मंत्राच्या अमुक माळा जपणार नाहीस तोपर्यंत मी प्रसन्न होणार नाही.' म्हणून तो मंत्र सांगितलेल्या वेळा जपणे सुरु केले. नंतर परत त्याच्या उलट सूचना झाली. त्यावेळी माझी पत्नी किंवा कन्या कलावती 'आजारी होती आणि ती बरी झाल्यावर तो जप करु नये अशी आज्ञा झाली. ज्यांच्या घरात मी भाडेकरी होतो ते हरिलाल जोशी स्वामी नारायण संप्रदायाचे असून राधा किंवा कृष्णाचे पण उपासक होते म्हणून त्यांच्या घरात किशोर अवस्थेतील श्रीकृष्णाची पूजाअर्चा करण्याचे स्वप्न पडले. आणि माझ्या पत्नीची व विशेषकरुन कलावतीची देवीवर भक्ती होती म्हणून त्यांच्यासाठी देवीचा मंत्र जपण्याची सूचना झाली असे नंतर वाटले. विशेषत: एका रात्री मंत्रासंबंधी स्वप्न पडले.त्यात असे दिसले की अनेक मंत्र जपत जपत मी इतस्तत: भटकून थकलो आहे

आणि नंतर जेव्हा प्रणवाचा जप स्वप्नामधे सुरु केला तेव्हाच शांती आणि विश्रांती मिळाल्याचे वाटले व बिलकुल थकवा वाटला नाही. यावरुन इतःपर दुसऱ्या कुठल्याही मंत्रा ऐवजी केवळ प्रणवमंत्राचा जपच माझ्यासाठी इष्ट व श्रेयस्कर आहे असे नक्की झाले.

नाक्यावरच्या उमियाशंकर घरात रहात असताना याच सुमारास कल्याण मासिकाचा देवीचा अंक वाचनात आला. त्याच्यात पीतवस्त्र धारण केलेला व हंस किंवा दुसऱ्या कुठल्याही वाहनाशिवाय असलेला देवीचा फोटो पाहून माझे मन मुग्ध झाले. वारंवार कल्याण मासिक उघडून देवीचे दर्शन करण्यास आनंद होई. असे होता होता देवी प्रत्यक्ष झाली व घरी दारी आठवण करताच तिचे दर्शन होऊन ती माझ्या सर्व व्यवहारात सामील होऊ लागली. रात्री 'मला झोपायचे आहे' असे म्हटल्यावर मी माझ्या बिछान्यातच तिचे निराळे अंथरूण करी. सकाळी उठे. असे पुष्कळ दिवस चालले. नंतर मला मुंबईला केशवरामकडे जावे लागले. तेथे काही दिवस असे चालले, नंतर एक दिवस तिने नऊ वाजता झोपण्याची मागणी केली व म्हणाली, 'मला पहाटे उठून सर्व योगिक क्रिया – नेती, नौली, धौती, बस्ती इत्यादि करायच्या असतात. म्हणून मला रात्री लवकरच झोपावे लागते.' मी परक्या घरी होतो तेव्हा माझ्याकडून तिच्या झोपण्यासाठी एवढ्या लवकर व्यवस्था करणे मला शक्य झाले नाही. म्हणून त्यानंतर तिचा जो कायम सहवास असे तो हळू हळू बंद पडला. तिच्या या योगिक क्रिया माझ्याने होणे शक्य नसल्यामुळे मला काही फार वाटले नाही.

याच सुमारास 'दुसरे महायुद्ध' चालू होते. त्या दरम्यान एका रात्री उमियाशंकर जोशींच्या घरात पलंगावर मी झोपलो असता एक युरोपिअन स्त्री स्वच्छ पोशाखात पलंगासमोर गुडघे टेकून प्रार्थना करताना दिसली. मला विचार आला की ही कोण असावी? तेव्हा ती म्हणाली, 'मी हॉलन्डची राणी'. त्यावेळी नंतर वर्तमानपत्र वाचून बातमी मिळाली की हॉलन्डची स्थिती फारच अवघड होऊन राणीसुद्धा त्यामुळे हैराण झाली होती. हे वाचून विचार आला की प्रभूला शरण आलेल्या बाईला असे दुःख कशासाठी? नंतर काही दिवसांनी राणीच्या राज्याची संतोषकारक व्यवस्था झाली होती.

सन १९४५ ते १९५० च्या कालात एक मॅट्रिक्युलेट वेदांतचार्य श्री. गिरीशचंद्र दीक्षित यांना त्यांच्या विषयाच्या शिक्षकाची जागा खाली होताच नेमण्यात आले. त्यांनी बारा वर्षे काशीमधे राहून वेदांताचा अभ्यास केला होता व आचार्य ही पदवी प्राप्त केली होती. ते ब्रह्मचारी होते. त्यांचे वडील जामनगरचे एक सुप्रसिद्ध वैद्य होते व चरकभुवन चालवत असत. वेदांताविषयी त्यांच्याकडून पुष्कळच शिकावयास मिळाले. त्यांनी माझ्याकडून सिद्धांतबिंदु व वेदांत/परिभाषा तसेच ब्रह्मसूत्राच्या प्रथम पादाच्या प्रथमाध्यायातील अर्धा-पाऊण भाग वाचून घेतला व चौथ्या पादातील शेवटल्या चार-पाच सूत्रांवरुन पटवून दिले की वेदांतात ईश्वर आहे. आत्मा ब्रह्मच विश्वाचे उपादान आणि निमित्त कारण आहे. या अभ्यासाने वेदांत अनीश्वरवादी आहे या

माझ्या भ्रमाचे निराकरण झाल्याने मला खूप खूप आनंद झाला. हा भ्रम स्वामी विवेकानंदांचे 'The Song of A Sannyasin' मधील शेवटचे कडवे वाचून विवेकानंदांचा दृष्टिकोन न समजल्याने झाला होता. 'दी साँग ऑफ ए संन्यासी'–'संन्याशाचे गीत' (इंग्रजी) हे मी एल्फिस्टन कॉलेजमधे तत्वज्ञान घेऊन बी.ए. चा अभ्यास करताना प्रथम माझ्या वाचनात आले. त्यातील 'आता जन्म नाही, नाही तू, नाही मी, नाही ईश्वर, नाही माणूस' या शब्दांनी माझ्या मनात भ्रम निर्माण झाला होता. विवेकानंदांचा दृष्टिकोन मला समजला नव्हता. संन्यासाश्रम स्वीकारल्याशिवाय ते वाचनात आले तेव्हा वेदांतात ईश्वर नाही अशी माझी समजूत झाली होती. आणि तपस्वी, धर्मिष्ट पुरुष, मुमक्षू ज्याच्यासाठी रात्रंदिवस धडपड करतात ती ईश्वरप्राप्ती, ईश्वरासह तादात्म्य, साक्षात्कार हा सर्व भ्रम आहे असे त्यावेळी वाटले होते. हा भ्रम आता संपूर्णपणे दूर झाला. दी साँग ऑफ ए संन्यासी मधील हे कडवे खालील प्रमाणे आहे:

Thus, day by day, till Karma's powers spent Release the soul for ever. No more is birth, Nor I, nor thou, nor God, nor man. The 'I' Has All become, the All is 'I' and bliss. Know thou art That, Sannyasin bold! Say 'OM Tat Sat, OM'

त्यानंतर अनुकुलतेच्या अभावी वाचन बंद पडले. परंतु तोपर्यंत मी वेदांत व भक्तिमार्ग अलग व परस्पर विरोधी समजत होतो, तो माझा गैरसमज आता दूर झाला. वेदांताचे ब्रह्मच माया आहे व जगतरुप हे परिणामे आहे. शरीर नसताना सुद्धा माया शक्ती असू शकते. ब्रह्म परिपूर्ण असले तरी त्याच्यामुळे जगाचे सर्जन होते. ब्रह्मामधे विषमता किंवा निर्दयता नाही. ब्रह्म निर्गुण आहे परंतु ब्रह्माच्या अधिष्ठानामुळे जगाची प्रकृति आहे – हे सर्व ध्यानात येताच हा सिद्धांत जीवनात दृढ होण्यासाठी श्रवण, मनन, निदिध्यासन-रुप भक्ती करावी अशी खात्री झाली. या नंतर गिरीशचंद्रांनी तर्कभाषा पण मागविले. त्यात वकिलांच्या सारखा युक्तिवाद करुन वेदांताच्या अद्वैत सिद्धांताचे प्रतिपादन करणारे 'खंडनखाद्य' पुस्तक असल्याचे सूचित करुन शेवटी असे पण म्हटले आहे की विद्यारण्यस्वामींचे बृहदारण्यक वार्तिकासारात समग्र वेदांत येतो. त्याच्यात संपूर्ण वेदांताचा समावेश आहे.

एक दिवस सकाळी उठलो व पाहिले तर दातांच्या कवळ्या ज्या ठिकाणी नेहमी ठेवी त्या जागी नव्हत्या. यामुळे स्वाभाविक अडचण उत्पन्न झाली. पूजेच्या खोलीत श्रीसाईमहाराज व भगवान श्रीकृष्णाच्या फोटोंसमोर बसलो होतो तेथे आवाज ऐकला 'दोन रुपये दक्षिणा दे म्हणजे तुला लगेच मिळतील.' दोन रुपये घेऊन महाराजांच्या

समोर ठेवल्यावर लगेच कलावती खाली कचरा काढीत होती तिला दोन्ही कवळ्या जिन्याखाली पडलेल्या आढळल्या. त्या तिने मला लगेच आणून दिल्या. यावरुन माझी खात्री झाली की काही वेळा कार्यसिद्धीसाठी केवळ भक्तिशिवाय दक्षिणेचीसुद्धा जरुरी असते.

एके दिवशी सकाळी पूजेच्या झरोक्यापाशी सकाळची प्रार्थना व स्तोत्र वगैरे पठन केल्याशिवाय स्वस्थ बसलो होतो तेव्हा आपोआप भगवानाच्या नामाचा उच्चार होताना ऐकला. हे काय आहे? असा विचार येता असे सुचले की माणूस जेव्हा स्वस्थ आत्मस्थ होतो तेव्हा शुद्ध प्रत्यक आपोआपच संस्काराप्रमाणे भगवंताच्या नामाचा उच्चार करत असताना ऐकू येतो व याला अनहत नाद म्हणतात.

काही वेळा आरती करताना, धूप जाळताना, श्रीकृष्ण भगवान व प्रतिमेतील संताऐवजी शाळेतील कोणी विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका त्या जागी दिसत. या विषयी विचार करता या निर्णयावर येऊन पोचलो की गुरुमहाराज सर्वव्यापी समजून त्यांची आरती मी करतो त्याचा हा परिणाम असावा. किंवा गुरुमहाराजांना असे पण प्रबोधन करावयाचे असेल की ज्या ज्या विद्यार्थी वा विद्यार्थिनी इत्यादिचा मूळ प्रतिमेच्या जागी भास होतो ते सर्व मीच आहे असे समज. म्हणूनच माझ्या जागी तुला ते दिसतात. तेव्हा सर्वांच्या बरोबरच व्यवहार, माझ्या बरोबरच्या व्यवहाराप्रमाणे आदरपूर्वक असा असावा. "मां च यो ऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । सगुणान समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥ (भगवद्गीता, अ. १४, श्लो. २६)– जो अव्यभिचारी भक्तियोगाने माझी सेवा करतो, तो या गुणांच्या पार जाऊन ब्रह्मत्वास योग्य होतो." या सुमारास स्वतः मनु सुभेदारांनी श्रीमद् भगवद्गीतेवरील शंकरभाष्याचा अनुवाद करण्याचे काम, मी माझी असमर्थता दर्शविली तरी, माझ्यावर सोपवले, ते ईश्वरकृपेने पार पडले. ते तयार करताना कल्याण प्रेसचे भगवद्गीता–भाष्यासहित अनुवाद तसेच श्री. विश्वनाथ पाठकांचे शंकराचार्यांच्या गीताभाष्याचे हिंदी भाषांतर मला उपयोगी पडले. विश्वनाथ पाठकांचा उपोद्धात फारच बोधकारक आहे. भगवद्गीतेविषयी पुष्कळ उपयोगी माहिति जशी की भगवद्गीतेच्या रचनेचा काल, युद्धाची शक्यता व कालमर्यादा वगैरे. या लिखाणावरुन भगवद्गीतेतील मुख्य सिद्धांत सूत्ररुपात गीताधर्मात छापण्यात आले.

कीकाच्या (नरेन्द्राच्या) आजारा दरम्यान सुभेदारांना भेटण्याचे झाले. त्यांनी मला सस्तु साहित्यात दाखल होण्यासाठी पुनः आग्रह केला. कीकाच्या श्राद्ध भोजनानंतर ऑगस्ट १९५० मध्ये मुंबईला (दादरला) गेलो. तेथे सुभेदारांचा पुनः फोन आला. त्यांना भेटलो तेव्हा तीन महिन्यांचे पाचशे रुपये व अहमदाबादमध्ये भाड्याविना रहाण्यास घर या अटींवर मी त्यांचे म्हणणे कबूल केले. नंतर दादरला थोडे दिवस राहिलो. परंतु तेथील वातावरण अनुकूल न वाटल्याने सप्टेंबरमधे मोताला गेलो व तेथे डिसेम्बरमधे अहमदाबादला जाण्याचे ठरले तोपर्यंत वास्तव्य केले.

मोतामधे 'शंकराचार्य' हे माझे पुस्तक तयार झाले व ते अहमदाबादला गेल्यावर

लगेच सस्तु साहित्याने छापून प्रसिद्ध केले. शंकराचार्यांची जन्मतारीख, त्यांची जन्मभूमी वगैरे सर्व माहिती डॉ. राधाकृष्णन यांच्या 'हिस्टरी ऑफ फिलॉसफी' या इंग्रजी ग्रंथात मिळाली. मोतामधील वास्तव्यात अपेक्षित केल्यापेक्षा महिन्याचा खर्च अधिक म्हणजे रु. ८० ते १०० पर्यंत येऊ लागला. या हिशेबाने माझी बचत थोड्याच अवधीत संपुष्टात येईल असे वाटले आणि माझे आयुष्य लांबले तर शेवटी आर्थिक अडचण उत्पन्न होईल अशी पण धास्ती वाटली. म्हणून जितके दिवस नोकरी असेल तेवढा काल तर बचतला हात लावावा लागणार नाही. परिणामे सुभेदारांच्या आग्रहाला वश होऊन सस्तु साहित्यात सामील होण्याचे ठरविले व ते ठीक झाले असे एकदा वाटले. उलट सुभेदारांच्या इच्छेप्रमाणे ग्रंथांवर ग्रंथ तयार करण्याचे शक्य होईल न होईल व शक्य न झाल्यास नोकरी जाईल म्हणून सुभेदारांना मोताहून नकार कळवावा असा सुद्धा खूप वेळा विचार येई. परंतु एकदा कबूल केल्यावर नाही म्हणणे योग्य वाटले नाही. ११ डिसेंबरला, त्रिभुवनदासांची एक दोन घर पाहून ठेवली आहेत व अहमदाबादला येऊन त्यातील एकादे पसंत करावे असे पत्र आल्यावर मी अहमदाबादला जाऊन कलावतीची भाची सौ. सोमीबहेन हिच्या घरी म्हणजे अमृतलाल बिहारीलाल उपाध्याय यांच्याकडे मुक्काम केला. त्रिभुवनदासांनी दोन जागा दाखविल्या – एक मणिनगरमधे व दुसरी शहरात काळपुर, सरैय्यापोळमधे. त्यापैकी सरैय्या पोळातील घर नक्की केले. घराचे भाडे रु. ८३ हे सुभेदारांनी कळविलेल्या आकड्यापेक्षा, रु. ५० पेक्षा अधिक होते. त्रिभुवनदासांचे त्याकडे लक्ष वेधता ते म्हणाले, 'त्याला काही हरकत नाही. तुम्हाला जेवढ्या जागेची जरूर असेल तेवढी वापरा. बाकीच्यात आमची पुस्तके रहातील म्हणजे गोदामाचा खर्च वाचेल. तेव्हा त्याची चिंता करु नये.'

मोतामधे राहिलो त्या दरम्यान नवरात्रामधे देवीचा पाठ वाचता वाचता आजुबाजुचे सर्व जग विलीन झालेले दिसले. चारी बाजुला अंधकार पसरलेला दिसला. फक्त मी स्वतःलाच सप्तशतीचा पाठ करताना पाहू शकत होतो. माझ्या आसनाचा पाट अंधकाराने अच्छादित होता व मी त्यावर बसलो होतो तेवढेच दृग्गोचर होते. बाकीच्या माडीवरील सर्व भागावर दुपारी अंधकाराचे पटल पाहून मला विस्मय वाटला.

* **श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी, त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.**
* **श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.**

# श्री साईंचे सत्य चरित्र – अध्याय ५०वा

गद्य अनुवाद :
**– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर**
(निवृत्त)
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,
बंड गार्डन रोड, पुणे-४११ ००१.

## अज्ञान निरसन

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरुमहाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरू साईनाथांना नमस्कार असो.

जन्म देणारे आईबाप यांच्या उपकारांना अंत नाही. त्यांनीच मला हा मानव देह दिला. (माझे नशीब की) मी त्यांच्या पोटी जंत (आतड्याती किडा) नाही उपजलो किंवा आईच्या पोटाला छळणारा (सळ) होऊन आंधळा, पांगळा, काणा, मुका किंवा बहिरा नाही जन्मलो. (उलट) पुरा धट्टाकट्टा जन्मलो. उत्तम ब्राह्मणवर्ण की ज्याचे देवदेखील पाय धरतात तेथे ईश्वरकृपेने माझा जन्म झाला व मी पूर्ण भाग्यशाली झालो. जन्मोजन्मी जन्म घेताना कोट्यावधी मातापिता होतात परंतु या जन्ममरणाला चुकविणारे मातापिता भेटणे अत्यंत कठीण. जन्म देणारा तोदेखील बापच, दुसरा मौजीबंधन करणारा (जानवे घालायला देऊन विधीपूर्वक गायत्री मंत्र सांगणारा), तिसरा अन्न देऊन पालन करणारा, व चवथा भय व संकटांपासून सोडविणारा. जगात हे सर्व सारख्याच महत्त्वाचे परंतु कृपाळू सद्‌गुरुशिवाय खरा बाप नसतो. त्याची आश्चर्यकारक चतुराई पहा. मातेच्या गर्भात वीर्य ठेवणारा व योनीमार्गे जन्म देणारा हा तो लौकिकी (नावाजलेला) पिता. परंतु सद्‌गुरू हा अलौकिक (असामान्य) पिता असतो. तो नीच योनी मार्गाशिवाय व वीर्याचा कणही न खर्च करता आपल्या मुलाला जन्म देऊन त्यावर पूर्ण अनुग्रह (कृपा) करतो. त्या जन्ममरण घालविणाऱ्या, करुणारुपी मेघाला, ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या, वेदातील गुप्त ब्रह्मज्ञानाचे (सच्चित) प्रतिपादन करणाऱ्या सर्वव्यापका गुरुवर्या तुला नमस्कार असो. संसाररुपी अंधकारातील सूर्या (संसारतमदिनकरा), आत्मानुभव झालेल्या संतांचा शिरोमणी असलेल्या भक्तांच्या चित्तरुपी चकोराच्या चंद्रा आणि श्रेष्ठ कल्पवृक्षा गुरुवर्या तुला माझा नमस्कार असो. गुरु महाराजांचा महिमा अगाध आहे. वर्णन करता करता वाणीचा अभिमान गळून जातो. म्हणून गुरुचरणी मान वाकवून मुक्यासारखे गप्प बसावे हेच बरे. पूर्वजन्मी मोठे तप केलेले असल्याशिवाय (या जन्मी) कोणाला तीन्ही (आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक) तापांचा (दु:खांचा) नाश करणारे संतांचे दर्शन होत नाही. परमार्थ, मोक्ष किंवा आपले कल्याण साधायचा ज्याचा हेतू असेल

त्याने संतांच्या आधीन व्हावे मग त्याला यत्किंचितही उणे पडणार नाही. धन्य धन्य संतांची संगती. तिचे महत्त्व काय वर्णावे? तिथेच सद्‌भक्तांना विवेक, वैराग्य व परम शांती लाभते. (ओ. १-१४)

श्रीसाईबाबा केवळ मूर्तिमंत चैतन्यच आहेत. स्वतः अव्यक्त असून व्यक्त (प्रकट) झाले आहेत. कशी त्यांची विषयांत न गुंतलेली स्थिती? कोण तिचे निश्चितपणे वर्णन करू शकेल? भावार्थी भक्त व प्रेमळ श्रोते यांच्यासाठी तेच एक कृपाळू (सद्‌गुरू) आहेत. आपले चरित्र (स्वतःच) प्रेमाने रसपूर्वक त्यांनी सांगितले (माझ्याकडून लिहवून घेतले). हे चरित्र म्हणजे त्यांचे देऊळच (राऊळच) आहे. (भावार्थ— या चरित्र ग्रंथरूपी मंदिरात त्यांचेच वास्तव्य आहे.) त्यांचा हस्त (आपल्या) डोक्यावर पडला की अहंकाराचा चूरा होतो व 'सोऽहं' (मी तोच आहे) या जपाचा (मनात) गजर चालतो आणि (या जगातील) दृष्टीस पडणारे सर्व काही आनंदमय भासते. माझ्या पामराची त्यांच्या कीर्तीचे वर्णन करण्याची शक्ती कुठली? त्यांनी स्वतःच, भक्तांच्या प्रेमामुळे कृपावंत होऊन, (ही) पोथी उत्पन्न केली. या साईचरणांवर मी लोटांगण घालतो, श्रोतृगणांना अभिवंदन करतो, साधुसंतांना नमस्कार करतो व सगळ्यांना प्रेमपूर्वक आलिंगन देतो. (श्रीसाईबाबा) सहज लीलेने संपूर्ण नीतीच्या (सदाचाराच्या) गोष्टी सांगत असत. त्यांचे नित्यशांती हे भूषण (लेणे) होते. श्रेष्ठ सत्पुरुष (महानुभाव) देखील त्यांचे ध्यान करीत असत. त्यांना सूर्याची उपमा देता येत नाही कारण तो अस्तास जातो (मावळतो). चंद्राची उपमा द्यावी तर तो क्षयी (बारीक होणारा) व साईमहाराज तर सदा संपूर्ण असतात. त्यांच्या चरणी हेमाडपंत नम्र झालेले आहेत व प्रेमाने श्रोत्यांना विनंती करतात की ही कथा श्रद्धेने, आवडीने लक्ष देऊन ऐका. जमीन उत्तम नांगरून त्यात बीज पुरून ठेवले असले तरी कृपारुपी तुम्ही मेघांनी वर्षाव केल्याशिवाय पीक निर्माण होईल का? संतकथा कानी पडल्या की पातकांची कहाणीच (गोष्टच) उरत नाही आणि पुण्याचा उदय होतो. या पर्वणीचा (पवित्र योगाचा) (वाचकांनी) लाभ घ्यावा. (ओ. १५-२४)

आम्हाला सालोक्य (इष्टदेवतेच्या लोकात प्रजेप्रमाणे राहावयास मिळणे) सारुप्य (इष्टदेवतेसारखे रूप प्राप्त होणे), सामीप्य (इष्टदेवतेच्या सान्निध्यात सेवकरुपाने सतत राहण्यास मिळणे), व सायुज्य (इष्टदेवतेशी एकरूप होणे) या चारही मुक्तींच्या ठिकाणी आसक्ती नाही. साईबाबांच्या ठिकाणी निश्चळ भक्ती जडो हीच आम्हासाठी परम प्राप्ती आहे. आम्ही मुळीच बद्ध नाही तर मुक्तीचा आमचा काय संबंध? आमच्यात संतभक्ती जागृत होवो की ज्यामुळे अंतःकरण शुद्ध होते. जेथे मी तू पणाची स्फूर्ती नसते अशी जी 'सहजस्थिती' व 'अभेदभक्ती' ती आम्हाला व्हावी हेच साईबाबांकडून आम्ही मागू. आता श्रोत्यांना हीच विनंती की हा ग्रंथ वाचण्यासाठी हाती घेताना वाच्य (वाचण्याचा विषय), वाचन (वाचण्याची कृती) व वाचक (वाचणारी व्यक्ती) यांची एकात्मस्थिती पहावी. हेमाडपंतांना सोडून द्यावे कारण ते या सच्चरिताचे (खरे कर्ते) नाहीत. भक्तांच्या कल्याणाकरिता ते फक्त एक निमित्त आहेत. दैवयोगाने सापडलेला

शिंपला जे फेकून देतात त्यांचे हातचे मोती जातात. (पवित्र) पिंपळ (अश्वत्थ) वृक्षाच्या उगमाशी (आपल्याला) काय करायचेय? ('काकविष्ठेमाजी पिंपळ' कावळ्याच्या विष्ठेमध्ये जरी त्याची उत्पत्ती असली तरी अपवित्र म्हणून त्याला सोडू नये).आपल्या कल्याणाविषयी माणसाने उदासीन राहू नये. येथे शब्दमात्रांचा बोलविता साईबाबांशिवाय दुसरे कोणी नाही. तेच श्राव्य (ऐकण्याचा विषय), श्रवण (ऐकण्याची क्रिया) व श्रोते (ऐकणाऱ्या व्यक्ती) आहेत ही एकात्मभावना ढळू देऊ नये. जेथे ऐकण्यासाठी कान आदराने तयार नाहीत व वृत्ती एकतान नाही ते वाचनच नव्हे मग तेथे शब्दार्थाला कोण ओळखतो? (या कथा) ऐकताना अहंकार नसावा, श्रोते (ऐकणारे स्वत:) हे साईरुपच आहेत अशी हृदयात भावना ठेवावी व अखंड अद्वैतता राखावी तरच त्या श्रवणाची सार्थकता, तरच पाण्यावरच्या लाटा जशा पाण्यात विरून जातात तशाच सर्व इंद्रियप्रवृत्ती निश्चित साईरूप होतील. तरच ज्ञानीजनांना परमार्थाचा बोध, विनोदाची आवड असणाऱ्यांना विनोदजन्य आनंद आणि काव्याचा रस ग्रहण करणाऱ्यांना या ग्रंथात सर्वत्र निरनिराळ्या काव्यरचनेचा आनंद लाभेल. (ओ. २५-३५)

असो. या सत्य चरित्रात पूर्वी एकोणचाळीसाव्या अध्यायात आपल्या एका उत्तम भक्ताला समर्थ श्रीसाईबाबांनी जो उपदेश केला (त्याचे वर्णन झाले.). ते भक्त बाबांपाशी असताना त्यावेळेस ते भगवद्‌गीतेच्या चवथ्या अध्यायाचे आरंभापासून पारायण करीत होते. एकीकडे (हातांनी) बाबांचे पाय चेपीत होते व (दुसरीकडे) तोंडाने हळूहळू पाठ म्हणत होते. असे म्हणताना तेहतिसावा श्लोक संपला व चौतिसावा म्हणायला घेतला. एकाग्र मनाने लय लावून मनातल्या मनात ते म्हणत होते. परंतु लोकांना कळले नाही तर कुठले काय असणार? (असून काय कामाचे?). म्हणून चौतिसावा श्लोक घेतल्यावर साईबाबांच्या मनात आले की आता येथे आपल्या भक्तोत्तमावर अनुग्रह करावा व त्याला सन्मार्ग दाखवावा. त्या भक्ताचे नाव नानासाहेब (चांदोरकर) होते. त्यांना बाबा म्हणाले, "नाना, काय रे मनात पुटपुटतोस? तोंडाने स्पष्ट का म्हणत नाहीस? केव्हापासून पाहतोय तोंडाने काही पुटपुट चालली आहे. परंतु आवाज बाहेर फुटत नाही. असे हे खासगी (गुप्त) काय आहे?" (त्यावर) मग नानासाहेब खुलासा करत म्हणाले की मी गीतेचा पाठ करीत आहे. इतरांना कटकट होऊ नये म्हणून मी ही पुटपुट करीत आहे. त्यावर श्रीसाई म्हणाले, "असो. ती झाली लोकांची गोष्ट परंतु माझ्यासाठी स्पष्ट (मोठ्याने) बोल. मला पाहू दे की तुझा तुला तरी पाठ कळतो का?" मग नानासाहेबांनी नमस्कार करून "तद्विद्धि प्रणिपातेन" हा श्लोक मोठ्या आवाजाने म्हणून दाखविला व तो ऐकून बाबांना समाधान वाटले. पुढे या श्लोकाचा अर्थ (बाबांनी) विचारल्यावर नानासाहेबांनी पूर्वीच्या आचार्यांनी (टीकाकारांनी) सांगितलेला अर्थ यथासाङ्ग सांगितला. (त्यावर) बाबांनी मान डोलावली (फार छान म्हटले) आणि पुन्हः प्रश्न केला, "नाना! उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं" हा तिसरा चरण पहा व त्याचे मनन कर. त्यातील 'ते' या अक्षरानंतर 'अ'कार अर्थाचा

अवग्रह ('अ'चा लोप दाखविणारे 'S' असे चिन्ह) घातल्यामुळे होणाऱ्या 'अज्ञान' या शब्दामुळे रूढ अर्थ उरफाटा (उलट) होतो का ते पहा. शंकरानंद, ज्ञानेश्वर, आनंदगिरी, श्रीधर, मधुसूदन वगैरे भाष्यकार जो ज्ञानपूर्वक अर्थ करतात तो जसा सगळ्यांना मान्य आहे तसाच मलाही ठाऊक आहे. परंतु अवग्रह घातल्याने होणाऱ्या गमतीला जाणूनबुजून (आपण) व्यर्थ का मुकावे?'' असे म्हणून कृपारूपी मेघ असलेल्या साईबाबांनी भक्तरूपी चकोर व चातक पक्ष्यांसाठी ज्या बोधामृत कणांचा वर्षाव केला त्याचे वर्णन पूर्वीच (३९व्या अध्यायात) झालेले आहे. परंतु या साईलीला मासिकाच्या सर्वच वाचकांना या अर्थाचे कौतुक वाटले नाही व काहीना (त्या अर्थाबद्दल) शंका राहिली हे आश्चर्यच नाही का? असो. ज्यांचे ज्यायोगे समाधान होईल असा 'अज्ञान' शब्दाच्या प्रतिपादनासाठी आणखी एक छोटासा प्रमाणासह प्रयत्न करतो. कोणी अशीही शंका घेईल की बाबांना संस्कृत भाषेचे ज्ञान कुठले? पण शंकेचे (खरे) कारण तर दुसरेच काही असले पाहिजे कारण संतांना काहीच अज्ञात नसते. अहो 'एकेन ज्ञातेन सर्व हि विज्ञातं भवति' (एक जाणल्याने सर्व काही जाणले जाते हे श्रुति (वेद) वचन कोणाला मान्य नाही? साईबाबांना सर्व गोष्टींचे प्रत्यक्ष ज्ञान होते. हातावर असलेल्या आवळ्याप्रमाणे ज्यांना संपूर्ण विश्व दिसते. त्या संतांना की ज्यांच्यामुळे सूर्यही प्रकाशतो त्यांना काय ठाऊक नसते? ज्यांना असे ज्ञान असते त्यांच्याठिकाणी अज्ञान कुठले उरायला? त्यांना सर्व (१४) विद्या (४ वेद, ६ वेदांगे, धर्मशास्त्र, मिमांसा, तर्क किंवा न्याय, पुराणे) अवगत असतात. मग तिथे संस्कृत भाषेला कोण विचारतो? (ओ. ३६-५७).

असो, या साईलीला मासिकाचे काही वाचक म्हणतात, ''नानासाहेब अप्रमाणिक आहेत. त्यांनी त्यांचा हा स्वतःच्या डोक्यातून काढलेला (स्वकपोलकल्पित) कारणाशिवायचा (अप्रयोजक) 'अज्ञान' दर्शविणारा (अज्ञानव्यंजक) अवग्रह, त्यांनीच हे अवग्रहाशी संबंधित अज्ञानाच्या प्रकरणाचे (कांडाचे) ढोंग (थोतांड) रचले आहे व उगीच स्वतःचे ज्ञान सतत मिरवायला हा वितंडवाद (निरर्थक वाद) उठविला आहे. मुळात नसलेला अवग्रह प्रस्थापित करून (घालून) 'ज्ञान' शब्दाच्या जागी 'अज्ञान' शब्द ते काढतात आणि गीतेचा असाच काहीतरी भलताच अर्थ ते लावतात.'' परंतु वस्तुस्थिती पाहिली आणि मनांत बारकाईने नीट विचार केला तर साईलीला मासिकातील एकोणचाळीसाव्या अध्यायातील कथेत काहीच विसंगती नाही. कोणाच्या काहीही कल्पना असोत, नानासाहेब प्रामाणिक व अप्रामाणिक असोत, परंतु त्यांनी सांगितलेल्या गोष्टीला फुकटची बडबड म्हणू नये. वाचकांनी नानासाहेबांचा द्वेष सोडून द्यावा व विकाराला वश न होता दृष्टीचे दोष दूर करावे म्हणजे (त्यांचा) संपूर्ण निष्कपटपणा (त्यांना) दिसेल. उत्तमात उत्तम असे साईलीला मासिक त्यातील एकोणचाळीसावा अध्याय वाचल्याशिवाय या (पन्नासाव्या) अध्यायात सहजपणे प्रवेश (निर्गम) मिळणार नाही (अर्थ समजणार नाही.). श्रीकृष्णाच्या मुखातून प्रकट झालेल्या भगवद्गीतेतील 'ज्ञानयज्ञ' नामक चवथ्या अध्यायातील चौतिसाव्या श्लोकात

'अज्ञान' विषयावर हे प्रवचन झाले.

**तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं, ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥अ. ४ श्लो. ३४॥**

हा तो गीतेचा मूळ श्लोक. त्यातील तिसऱ्या चरणात पहा. 'ज्ञान' पदाच्या आधी एक अवग्रह( ऽ) घातला तर तो 'अज्ञान' पद दाखवितो. मनांत अवग्रह आणला नाही तर 'ज्ञान' हे पद निःसंदेहपणे येते. त्याविरुद्ध कोणाचाच दुराग्रह नाही व तो अर्थ सर्व ठिकाणी ग्राह्यही आहे. ''ज्ञानादेव तु कैवल्यम्'' (ज्ञानापासूनच मोक्ष प्राप्त होतो) हे श्रुतिवचन सर्वत्र मान्य आहे. तरीपण तत्त्वज्ञान्यांनी ज्ञानाचाच उपदेश केला पाहिजे अशा बंधनाची त्यांना आवश्यकता नाही. (ओ. ५८-६९)

मी आत्मा केवळ साक्षी (फक्त कर्म पाहणारा, करणारा नव्हे) आहे,निर्मळ, शुद्ध व सर्व काही जाणणारा आहे. मी (सदा) मुक्त आहे. सर्व प्राण्यांमध्ये असलेला शुद्ध चैतन्य तो मीच. कधीही न भुलणारा असल्याने (अढळत्वे) अद्वैत आनंदाने पूर्ण आहे. परंतु मी अज्ञान नव्हे व अज्ञानाचे कार्यही माझे नव्हे. 'अयमात्मा ब्रह्म' (हा आत्मा ब्रह्म आहे) या अथर्ववेदाच्या महावाक्यातील आत्मा तो मीच. 'प्रज्ञानमानंद' (ज्ञान हेच आनंद) या **ऋग्वेदाच्या महावाक्याचा ठेवा (निधान) मीच. 'अहं ब्रह्मास्मि' (मीच ब्रह्म आहे)** या यजुर्वेदाच्या महावाक्याचे नित्य स्फुरण म्हणजे तीच ही विद्या आणि मी पापी अभागी दैवहीन अशा भावनेची खाण तीच अविद्या. या दोन्ही (विद्या व अविद्या) मायेच्या अनादि व पुरातन शक्ती आहेत. एकीच्या पायी या जीवाला बद्धता (बंधन) लाभते व दुसरीच्या पायी बंधन मुक्तता लाभते. नाम व रूपाचा हा जो भ्रम असतो तो अवघा मायेचा संभ्रम (गोंधळ) असतो. ही माया वर्णन करायला फार कठीण व पार करून जायला तर त्याहून अति कठीण. जे जे कल्पनेचे स्फुरण तेच मायेचे निवासस्थान होय. बंधन व मुक्ती या दोन्ही स्थिती कल्पनेतूनच उगम पावतात. (ओ. ६९-७५)

'ज्ञानादेव कैवल्यम्' (ज्ञानापासूनच मोक्ष) हा श्रुतीचा सिद्धांत अगदी खरा आहे. परंतु पापकर्माचा जोवर नाश होत नाही तोवर ज्ञानाचा उदय होणे अशक्य. ज्याला शुद्ध ज्ञान होते त्याचे संकल्प (इच्छा, अपेक्षा) पळून जातात, त्याला मायेचे बंधन नसते व तेथे विकारांना स्थानच नसते. शुकदेवासारखे परम ज्ञानी परंतु संशयाने (विकल्पाने) त्यांचेही नुकसान झाले. **संशयामुळे**अज्ञान प्रकट होते व ते गुरुशिवाय दूर होत नाही. ज्ञानात संशय शिरला की ज्ञानी **पुरुषालाही** अभिमान ग्रासतो. आंबलेल्या पेजेच्या थेंबाने दुधाने भरलेले मोठे भांडेही-(दुधाणीही) विटते व (सर्व) दूध नासते. म्हणून 'अज्ञान' आधी समजून घ्यावे. त्याच्या निरसनाने मन शुद्ध होताच आत्यंतिक ज्ञान प्रकट होईल व अभेद समाधी लागेल. (ओ. ७६-८०)

ज्याचे ध्यान सदा द्रव्य व वैभवाकडे लागलेले असते, ज्याचे मन विषयसेवनांनी अतृप्त असते व ज्याला आपल्या स्त्री व पुत्रांचे अखंड चिंतन असते, त्याचे ज्ञान **अज्ञानच समजावे. असा (माणूस) धन, स्त्री व पुत्र यांनी मोहित झालेला ज्ञानी असला तरी** तो आपले हित (कल्याण) जाणत नाही. म्हणून जोवर मनुष्य भक्तिहीन असतो तोवर

त्याचे ज्ञान अज्ञानाने झाकलेले समजावे. हा जीवसमुदाय अज्ञानाने घेरलेला (युक्त) आहे. या अज्ञानातून मुक्त होऊन ज्ञानी होणे व ज्ञानाच्या पलीकडे जाणे हेच निश्चित ब्रह्मरुप होणे होय. अज्ञान जाता ज्ञान प्रकट होते. जो क्षमा करु जाणतो तोच (खरा) ज्ञानी होय. जोवर देहाचा अभिमान गळला नाही तोवर तो प्रकृतीच्या (मायेच्या) आधीन असतो. राम, कृष्ण वगैरे जे अवतार झाले, सनक वगैरे जे संत व श्रेष्ठ ऋषी (शिष्टप्रवर) होऊन गेले. त्यांच्या आज्ञेची प्रकृती (माया) ही दासी आहे, परंतु इतर लोकांना ती भुलविते. सर्व प्राण्यांच्या हृदयांत ईश्वर असताना त्यांना कोणालाही आपल्या या स्थितीची जाणीव नसते. अशी ही मायेची , कल्पना न करता येणारी, आवरणशक्ती (बुद्धीला झाकून टाकणारी शक्ती) आहे. 'मी कर्ता व मीच भोक्ता' हा खोटा अभिमान सोडल्याशिवाय व त्या हृदयस्थाला शरण गेल्याशिवाय आत्म्याला मुक्तता लाभत नाही. नित्य व अनित्य वस्तूंचे विवेचन करा. श्रवण, मनन, व निदिध्यासन (सतत गाढ चिंतन) करा व शम, दम वगैरे षड्संपत्ती (शम, द्म, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान) संपादन करा, तरच अज्ञानाचा नाश होईल. हे जग माझ्यापासून सारे वेगळे, मी तर तो अल्प आणि मर्यादित व मी म्हणजे हा देहच असे जे भान तेच ते शुद्ध अज्ञान होय. (ओ. ८०-८९)

ज्ञानाचे प्रतिपादन करणाऱ्या वेदान्त शास्त्रात, परम कृपाळू भाष्यकार 'अनुबंध-चतुष्टयाचा' विस्तारपूर्वक वर्णन करतात. त्यातील 'अधिकारी', 'विषय', व 'संबंध' हे तीन आणि चवथा अनुबंध म्हणजे 'प्रयोजन' (हेतू, उद्देश). या प्रयोजनाचे विवेचन झाले की अज्ञानाच्या निवर्तनाचा मार्ग कळतो. जीव व ब्रह्म याची ऐक्यता हाच वेदान्ताचा मुख्य 'विषय' आहे. या ऐक्य प्रमेयाच्या अंतर्गत जी अज्ञानता असते तिची निवर्तता हेच ते 'प्रयोजन' (उद्देश) त्या मूळ अज्ञानाची निवृत्ती तीच की स्वरुपानंदाची प्राप्ती. म्हणून युक्ती प्रयुक्ती करुन अज्ञानाचा नाश करणेच आवश्यक असते. ज्याचे भेदाचे निरसन झाले नाही तो ज्ञानी नव्हेच. देहाचा अभिमान असणाऱ्यांचे ज्ञान हे अज्ञानच म्हणावे. स्वतः ज्ञानी म्हणून मिरवितो व अयोग्य (अविहित) कर्मांचे आचरण करतो त्याचे जागेपण जळल्यासारखेच आहे. तो तर झोपलेला कुंभकर्णच म्हणावा. ज्याचे वेदाच्या विरुद्ध वर्तन, जो वर्ण व आश्रम यांचे नियम पाळत नाही त्याच्या चित्तशुद्धीचे साधन अविद्येचा नाश हेच होय. सत्त्व (पवित्रता), रज (कार्यरतता) व तम (मंद्यत्त्व) या त्रिगुणांमुळे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांच्या विकारांनी आणि जननेंद्रिय व जीभ यांच्याकडून ब्रह्मदेव वगैरेदेखील फसविले गेले. जगातील सर्व जंगम (चालते बोलते) प्राणी अनादि अविद्या व माया यांनी वेढिलेले असतात, रागद्वेष वगैरे विकारांनी मोहित झालेले असतात व अज्ञानाने घेरलेले असतात. हा जीव अविद्येत बांधलेला असतो. त्याचे शुद्ध रूप प्रकट व्हावयाला अविद्या, काम (इच्छा), कर्म यांचा सगळा संबंध तुटला पाहिजे. गाईंची स्तने दुधाने तुडुंब होऊन गळतात व तेथेच गोचिडे घट्ट चिकटलेली असतात. परंतु त्यांना अशुद्ध अशा रक्ताचीच आवड असल्याने दुधाची गरजच (कौतुकच) नसते. पहा!

बेडुक आणि भूंगा या दोघांचेही सुंदर कमळ हे घर असते परंतु भूंगा (सुवासिक) परागात विहार करतो तर बेडुक चिखलाचा आहार करतो. ज्ञानाचा गड्डा समोर दिसला तरी मुर्खाचा अज्ञानाकडेच ओढा असतो. मूर्खाला अज्ञानच ज्ञान वाटते. त्याच्यापुढे ज्ञानाचा पाढा वाचला तरी त्याचा काही उपयोग होत नाही. अविद्येचे निर्मूलन झाले की ब्रह्मज्ञान स्वतः होऊन प्रकट होते. म्हणूनच अविद्येचे प्रतिपादन आधी करणे आवश्यक आहे. (ओ. ९०-१०३)

एका ब्रह्मज्ञानासारखे या तिन्ही लोकात पवित्र दुसरे काही नाही. त्याचाच उपदेश महत्त्वाचा आहे व त्याशिवाय हे जीवन व्यर्थ आहे. बुद्धी वगैरेंच्या चेष्टेचा (हालचालीचा) ब्रह्म हा विषय असता तर एकाद्या तरी इंद्रियाने ते आहे असे दाखविले असते. 'बुद्धिग्राह्यमतींद्रियम्' ब्रह्म तत्त्व बुद्धीने गोचर (जाणणे शक्य) आहे असे स्मृतीने (गीता अ. ६ श्लोक २१) गर्जताही श्रुतीला (वेदांना) ते संमत नाही. बुद्धी वगैरेंचा जर अभाव झाला (अस्तित्व नाहीसे झाले) तर जे ग्रहण करावयाचे (जाणावयाचे) तेच नसेल. मग ब्रह्माचा अस्तित्वभाव मानायला जागाच उरणार नाही. पहा, इंद्रियांना जे जे गोचर तेच आहे व इतर नाही हे तर सर्वत्र प्रसिद्ध आहे. परंतु तसे म्हटले तर मग ब्रह्म कधीच नसले पाहिजे असा त्याचा अर्थ होईल व त्यामुळे सर्वच अनर्थ होईल. सूक्ष्म तारतम्य दृष्टीने केलेल्या पारंपारिक अर्थाने बुद्धी ही निरंतर व सदा असणारी आहे. तिचा प्रलय झाला (ती नाहीसी झाली) तरी ती तेथे खऱ्या प्रचीतीच्या (अनुभवाच्या) रूपाने राहते. आत्मा विश्वाचे निःसंशय मूळ आहे (म्हणून) कोणत्याही वस्तूचा लय झालेला दिसला तरी तिचे अस्तित्व सदा कायम राहते. घड्यावर खडा मारला तर आकाराचा नाश होऊन खापऱ्या उरतात. घड्याचा आकार नाहीसा झाला तरी खापऱ्या घड्याचे सातत्य दाखवितात. घड्याच्या कार्याचा नाश झाला तरी घड्याच्या अस्तित्वाचा नाश होत नाही. खापऱ्या घड्याच्या सातत्याला कारण होतात. त्यांच्या (आकारांच्या) मानाने कार्याच्या अस्तित्वाचा अंश त्यांच्यात (शिल्लक) असतो. कोणत्याही कार्याच्या विसर्जनाचा अंत शून्यात कधीही होत नसतो. लय हा सदा अस्तित्वनिष्ठ आहे (लय झाले तरी अस्तित्व सूक्ष्मरूपाने कायम राहते). याचे प्रमाण म्हणजे सब्दुद्धि ही सत्याच्या अनुभवात दडून बसलेली असते. (ओ. १०४-११३)

सर्व तीर्थे व्रते तर पवित्र असतातच परंतु ज्ञान हे पवित्राहून पवित्र असते. या ब्रह्मज्ञानावाचून भजन पूजन सर्व व्यर्थ असते. अविद्येने चित्त मलीन होते व त्याचे शुद्धीकरण ईशभक्तीवाचून होत नाही आणि भक्तीशिवाय-ज्ञान उपजत नाही. म्हणून आधी अज्ञान जाणावे. त्याचा उपदेश व त्याचे वर्णन ऐकले म्हणजे त्याच्या बंधनापासून सूटका होईल व त्यातून भक्ती उत्पन्न होईल. पायाळाचे डोळ्यात अंजन पडले की त्याला जमिनीत पुरलेले धन दिसते त्याप्रमाणे भक्तीचा आधार घेतला की अज्ञानाचा नाश होऊन ज्ञानाचा उदय होतो. ज्ञान म्हणजेच स्वरूप प्राप्ती आणि त्याला मूळ अज्ञानाची निवृत्ती. ईश्वराची भक्ती घडल्यावाचून मायेची शक्ती पार करणे अशक्य असते. ज्ञान व अज्ञानाची भेसळ असते त्यातून खडे टाकून देऊन निव्वळ

तांदूळ आधणासाठी वैरण्याला निवडून घ्यावे. सर्व ठिकाणी सर्व प्राण्यांमध्ये ईश्वरच आहे अशा भावनेने ज्ञानयज्ञ वगैरे उपासना करुन जो विश्वतोमुख (सर्वव्यापी) श्रीकृष्णाला पाहतो तो ज्ञानासाठी अज्ञान जाळून टाकतो. आता या ज्ञानयज्ञाने स्वरूप पहा. 'अहं ब्रह्मास्मि' (मी ब्रह्म आहे) हे त्यातील यूप (पशुबळी बांधण्याचा खांब) आहे. पंचमहाभूते हा यज्ञमंडप आहे. जीव व ईश्वर यांतील भेद हा पशू (बळी) आहे. पांच इंद्रिये, पांच प्राण हेच यज्ञाच्या उपचारांचे साहित्य (आभरणे) आहेत. मनबुद्धीच्या कुंडात ज्ञानाग्नीचे प्रदीप्तीकरण केले जाते. जीव हा यज्ञकर्ता यजमान आहे. तो अज्ञानरुपी तुपाचे (घृताचे) अवदान करतो व त्यामुळे आत्मानंदरसी निमग्न होऊन त्याला (यज्ञपूर्तीचे) अवभृतस्नान घडते. तात्पर्य हे की अज्ञानरूपी तुपावाचून ज्ञानाग्नि कधी पेट घेत नाही आणि जीव व ईश्वर यांच्या भेदाला जाळून (त्यांच्या) एकात्मचेते (अभेदाचे) ज्ञान प्रकट होत नाही. (ओ. ११३–१२४)

स्वच्छ आरसा (आदर्श) जसा मळाने झाकलेला, अग्नीचा प्रकाश जसा धूराने व्यापलेला तसेच काम क्रोध यांनी ताब्यात घेतलेले ज्ञान अज्ञानाने झाकलेले (तिरोहित) असते. चंद्रबिंबाला जसा राहू ग्रासतो किंवा शेवाळ जसे पाण्याला झांकते तशी स्वयंप्रकाश अशा ज्ञानाला ही माया आच्छादून टाकते. मोठमोठ्या ज्ञात्याची मती भ्रष्ट होऊन ते अधोगतीला जातात. उपाय माहीत असूनही वांचत नाहीत व मनास येईल तसे आचरण करतात. वानप्रस्थ घेतलेले लोक पुन्हः गृहस्थाश्रमाकडे परत वळतात. करू नये ते अचूक करतात. ज्या वस्तूंची आधी किळस घेतं असत त्याच वस्तूंचा मग प्रिय म्हणून स्वीकार करतात. जे प्रयत्नपूर्वक पापे चुकवीत असत तेच नशिबाने (अदृष्टाने) पापात पडतात. अशा स्थितीला काय म्हणावे? ही काय ज्ञानीजनांची जात म्हणायची? जरी मोठा ज्ञानी झाला व पापाच्या सावलीची पण इच्छा करत नसला तरी पतंग जसा दिव्याला भूलतो तसा तो कार्य (चांगले कृत्य) व अकार्य (वाईट कृत्य) समजण्याचे विसरून जातो. पाप करणे हे अज्ञान आहे याची त्याला पूर्ण जाण असते परंतु त्या जाणिवेची पर्वा न करता कामवासना त्याला (पापाकडे) प्रवृत्त करते. हा सर्व क्रियांचा समुदाय फक्त कामवासनांचे चेष्टित (कार्य) असते व तिचेच (पूर्ण न झाल्याने) क्रोधात रूपांतर होते. कामगतीला जो अडथळा येतो त्यामुळेच त्या कामाचा क्रोध होतो. हाच पदोपदी मोक्षास विरोध करतो व ज्ञानप्रतिबंधक वृत्ती ती हीच. कामक्रोधांचा त्रास या जीवाला जडला आहे. ज्ञानाच्या पंक्तीस ब्रह्मस्वरूपाच्या जवळ त्यांचा सदा वास असतो. ते पाण्यावाचून बुडवितात, अग्नीवाचून जाळतात, शस्त्रांवाचून मारतात आणि दोरांवाचून बांधून टाकतात. त्यांच्यापुढे ज्ञानीदेखील टिकत नाहीत. ज्ञानी जनांना तर पैज लावून पराभूत करतात. त्यांच्यात महाप्रलय करण्याचे सामर्थ्य आहे. ते प्राण्यांना नकळत ग्रासून टाकतात. चंदनाच्या वृक्षांच्या मुळांशी जशी काळसर्पांची वेटोळी असते तशी कामक्रोधांची नाळ ज्ञानगर्भाला बाहेरून वेटाळलेली असते. इंद्रिये, बुद्धी व मन ही त्या कामवासनेची ठिकाणे असतात. त्यांच्या योगाने जीवाचे ज्ञान झाकून त्या जीवाला ते मोह घालतात. जर तुम्हाला चंदन

पाहिजे असेल तर त्या सर्पाचा नाश करा. कामक्रोधाचे आवरण सारून ज्ञानाचा खजिना मिळवा. सर्पाचा नाश केल्याशिवाय कोणाला चंदन लाभेल काय? कृष्णसर्पाचा संहार केल्याशिवाय पुरलेले धन लाभेल का? तसेच परतत्त्व आत्मज्ञान पदरी पडायला प्रकृतीचा (मायेचा) पडदा दूर सारणे हेच एक साधन होय. म्हणून आधी इंद्रियांचे दमन केले पाहिजे म्हणजे कामक्रोधाचा नाश होईल. जीव कामक्रोधाच्या आधीन असतो आणि अज्ञानाचे ज्ञानाला आवरण असते. (ओ. १२५-१४३)

देहापेक्षा इंद्रिये सूक्ष्म असतात, त्याहून मन जास्त सूक्ष्म असते, मनापेक्षा बुद्धी अति सूक्ष्म असते व बुद्धीपेक्षा परमात्मा सर्वांत सूक्ष्म असतो. सर्व संसारधर्माच्या पलीकडे असलेले हे सर्वोच्च परम सत्य, तोच हा अत्यंत कल्याणकारी परमात्मा व तेच हे अमृतमय स्वस्वरूप. शुद्ध, बुद्ध, नित्य, मुक्त तेच ते अभेदस्थितीत असलेले तत्त्व, तेच परमानंदाने उत्पन्न झालेले अंतर्यामी चैतन्य. ज्याला पंचीकरण (आकाशादि पंचमहाभूतांच्या एकेकाचे पाच भाग करून त्या पंचवीस भागांचे अमुक प्रमाणात मिश्रण करणे ते) म्हणतात तेच मायारूप दर्शन होय. आणि ते समजायला अध्यारोप (सत्य ब्रह्माच्या ठिकाणी मिथ्या जगाचा आरोप करणे) व अपवाद (हा आरोप समूळ मिथ्या आहे असे जाणणे) हे एकच साधन आहे. पंचीकृत होऊन मिश्र न झालेली अशी सूक्ष्म महाभूते (भूतांचे पंचीकृत झाले की त्यांना स्थूलता प्राप्त होते) यांना पंचतन्मात्रा म्हणतात. त्यांचे कार्य प्राण, इंद्रिये, मन व बुद्धी यांना आत्म्याची 'सूक्ष्म' शरीरता येते. पंचीकृत पंचमहाभूते पहा. तेथून 'विराट' उदयाला येते. त्या आत्म्याच्या स्थूल देहाला ज्ञानी 'विराट' असे म्हणतात. स्थूल व सूक्ष्म शरीरांना कारण केवळ स्वरूपाचे अज्ञान. ते शरीर मूळ अव्याकृत (अव्यक्त) असून साभास (व्यक्त) झालेले असते. शरीर हे आत्म्याचेच कारण आहे. हे कारण शरीर म्हणून ओळखले जाते. त्यात चैतन्याचे प्रतिबिंब असून केवळ अज्ञानाला कारणीभूत होते. यालाच अव्याकृत व अव्यक्त असे म्हणतात. आत्म्याचे अज्ञान तेच याला कारण असते व ते अवयवांशिवायही नसते व अवयवांसकटही नसते किंवा दोन्हीही नसते. ब्रह्म व आत्मा यांच्या एकत्वाचे जे ज्ञान तेच केवळ या देहाचे शुद्धीकरण (निरसन) करणे, स्वस्वरूपी राहणे यालाच 'मोक्ष' हे नाव आहे. त्याशिवाय दुसरा मोक्षच नाही. स्वस्वरूपावस्थान हाच मोक्ष. (ओ. १४४-१५३)

केवळ ब्रह्म व आत्मा यांच्या एकत्वाचे ज्ञान झाले की अज्ञानाचे निरसन होते म्हणून अज्ञान समजावयाला त्याचे वर्णन आवश्यक आहे. अविद्येने शबल (पुष्कळ भागात विभागले गेले) त्यामुळे ब्रह्माला शबलत्व (बहुत्व) आले. त्याला 'सत्' हे नाव ठेवले व अशा प्रकारे ते बोलण्याचा विषय झाले आणि तेव्हाच मनांत शिरले व ॐ काराच्या आकाराला आले. या ॐ कार ब्रह्माचे ध्यानाबरोबर ईश्वराचे स्मरण करता करता ज्याचा देह सुटेल त्याच्या जन्माचे सार्थक होईल. असो. या वाच्य ब्रह्मापासून

(ॐ कारापासून) अव्यक्ताचा प्रादुर्भाव होतो. अव्यक्तापासून महत्तत्व उपजते आणि त्यापोटी अहंकार उत्पन्न होतो. अहंकाराच्या ठिकाणी पंचतन्मात्रा व त्यातून पंचमहाभूते होतात. शेवटी पंचमहाभूतांच्या उदरी हे निश्चित जग जन्मला आले. अविद्या, माया यांच्या रूपाचे दर्शन हेच या जगाचे रूपलक्षण व या अविद्येचे निरसन करण्यासाठी अज्ञानाचे विवेचन हेच आवश्यक. अत्यंत विशुद्ध आणि निर्मळ जे चिन्मात्र केवळ स्वरुप त्याहून वेगळे जे ते 'शबल' या दोघांची भेसळ करता येत नाही. लक्ष्य ब्रह्म ते निराळे जाणावे. ते वाच्याहून फार निराळे असते. म्हणून ही अज्ञानाची पडळे (पडदे) उपदेशाच्या शक्तीने दूर सारावी. निद्रेमाजी स्वप्न पडता, डोळे नसता, डोळस मन स्वत: अखिल त्रिभुवन पाहते. या सर्वांना कारण अविद्या आहे. खरे पाहता वस्तु एक असते परंतु ती दुसरीच दिसते. दोरी साप म्हणून भासते व शिंपल्याच्या पोटात रुपे आहे असे वाटते. अहो नुसती सूर्याची किरणे पण लोक त्यांना 'मृगजळ' म्हणतात. हा निव्वळ मायेचा खेळ असतो व ज्ञानी लोक देखील तिच्यापुढे हतबल होऊन जातात. पेटलेले कोलीत कोणी हातात गरगर फिरविले की त्याठिकाणी अग्निकंकण (विस्तवाचे चक्र) दृष्टीस पडते व मायेची अचाट करणी (ख्याती) लक्षात येते. पाहू जाता हा खरा अग्नीच. अलातचक्राला (अग्निकंकणाला) तर तिथे थाराच नाही. परंतु हा मायामोहाचा पसारा नसत्या संसाराला उत्पन्न करतो. अशा प्रकारे (बुद्धीचा) निश्चय झाला की भ्रम जातो व संसाराचा लय होतो. मी, देह, माझी पत्नी, माझे घर हा सारा व्यर्थ परिश्रम. पुत्र, पशू आदि तृष्णेच्या पाशाने अगदी वेष्टिले जाऊन ज्ञानी व पंडित म्हणविणारे देखील सुखाचा लवलेशसुद्धा गाठू (मिळवू) शकत नाहीत. आपण शास्त्रप्रवीण व प्रज्ञावान आहोत, आपल्या सारखा जगात कोणी नाही, असा त्यांच्या मनात मोठा अभिमान असतो व त्यामुळे ते सदा असमाधानी असतात. हेच अज्ञान किंवा माया अथवा प्रकृतिप्रधान अविद्या. यांचेच आरंभी ज्ञानीजनांनी निरसन केले की मग ज्ञान उत्पन्न होते. (ओ. १४४-१७१)

ज्ञान हे तर स्वयंप्रकाशित असते. त्याचा उपदेश करावा लागत नाही. अज्ञानाचा नाश होताच ज्ञान आपोआप उत्स्फूर्तपणे प्रकटेल. एकादे तेज:पुंज रत्न केरामातीत दाटून जाते व वर्षांची वर्षे लोटल्यावर त्याची आठवणही बुजून जाते. कर्मधर्मसंयोगाने ते कधीकाळी हाती लागले तरी त्याचे सर्व तेज दगडमातीच्या संगतीने हरवून गेलेले असते. परंतु पुढे ते स्वच्छ घासले आणि वरील काटमाती काढून टाकली तर पूर्वील तेज:पुंजता पावते. तशीच ज्ञानाचीपण अवस्था असते. माती-काट ते अज्ञान व याच अज्ञानाने ज्ञान आवृत्त (वेढलेले) असते. काट-मातीचे निरसन केले (घासूनपुसून नाश केला) तर रत्न सहजच उजळेल. नित्य अनित्य वस्तूंचा विवेक हा पापकर्माचा नाश करणारा, सत्वशुद्धी प्राप्त करुन देणारा व ज्ञान उत्पन्न करणारा असतो. हे जग मायेचा बाजार आहे व येथे नकली वस्तू पुष्कळ आहेत. तसेच खऱ्या म्हणून नकली वस्तू घेणारे गिऱ्हाईकही फार आहेत. त्यामुळे नकली कशी ओळखावी यासाठी भल्याभल्यांची बुद्धी थकते. फसण्याच्या जागेची

लक्षणे (खुणा) नीट कळली पाहिजेत. आणि म्हणूनच बरोबर तज्ञ माणूस (पारखी) घ्यावा लागतो. नकली वस्तू खऱ्यासारखी कशी दिसते हे तो देखादेखी दाखवील आणि अज्ञान नाहीसे होईल. अज्ञान जाता ज्ञान (शिल्लक) राहील आणि मायेचे सहज निरसन होईल. उरलेले ज्ञान म्हणजेच सद्वस्तू जाणावी. या गोष्टीला प्रत्यक्ष प्रमाणाची जरूरी नाही. बुद्धीचे डोळे जरी स्वच्छ उजळलेले असले तरी कल्पनांच्या अंधाराने झांकलेले असतात. अंधाराचा उपदेश केला की ते झांकण दूर होते आणि (बुद्धीच्या डोळ्यांना) उरलेले ज्ञान स्पष्ट दिसते. खरे पाहता रस्त्यात (फुलाची) माळ असते परंतु संध्याकाळी दृष्टीला तो साप भासतो. त्याला कारण अज्ञानाचा पडदा. खिशातील गुप्त दीप (दिवा) पेटविला की अज्ञानाचा लोप होतो, खरे स्वरुप प्रकट होते आणि सर्पत्व आपोआप मावळते. तेव्हा अज्ञानाचा दोष घालवायला उपदेश हाच उपाय आहे आणि म्हणूनच ज्ञानी लोक आपले शरीर झिजवून अज्ञान काय आहे याचाच उपदेश करतात. (ओ. १७२-१८५)

संसारात असताना प्रारब्धाने जे (कित्येक) प्रसंगी भोग येतात ते अज्ञानाने घडलेल्या कर्मांमुळे (अज्ञानजन्य भूतकार्य) येतात, हे आधी जाणले पाहिजे. "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म" (ज्ञान हेच सत्य आहे व ब्रह्म हेच अनंत आहे) आणि अविद्या माया हा सगळा भ्रम आहे. हा जेव्हा नाहीसा होईल तेव्हाचा ज्ञानाचा संभ्रम (घोटाळा) दूर होईल. ज्याचा देहाचा अभिमान गेला नाही त्याला सज्ञान कोणी म्हणावे? अभिमानाचे जे अधिष्ठान (ठिकाण) ते मूर्तिमंत अज्ञान होय. ज्याला मायेचा पूर म्हणतात,ज्यामध्ये हे जग अगदी चूर असते,तो हा भूलविणारा दृष्ट (दिसणारा) संसार आहे व अज्ञान हे त्याचा मूळ आधार आहे. अज्ञानापासूनच याचा उगम असतो, याचे वैभवही अज्ञानातून उद्‌भवते आणि एकत्वाच्या ठिकाणी अनेकात्वाची जी भावना असते, त्याचे मूळ ठिकाणही अज्ञानच आहे. किंचित् प्रकाश किंचित अंधार अशा समयी मार्गीचा दोर, दोर असून सर्प भासतो व अतिशय भीती वाटते, सर्पाचा भास हे केवळ अज्ञान असते. त्या अज्ञानाचा नाश झाल्याशिवाय मन भयमुक्त होत नाही. कोणास फुलाची माळा भासते तर कोणाच्या डोळ्याला दंड (सोटा) दिसतो. एकूण हा सगळा भासच. भ्रांतीच्या अवकळा (पतन) खरोखरीच अनावर असतात. वेदशास्त्राच्या वचनाला अनुसरून जो आस्तिक्य बुद्धी धारण करतो तोच ब्रह्मज्ञानाचा अधिकारी होय. जन्मजन्मांतरीचा नास्तिक कधीच तसा अधिकारी होणे शक्य नाही. हे विश्व उलट्या म्हणजे अयथार्थ दृष्टीने पाहणाऱ्या लोकांना चराचर विश्व हे विश्वात्मा रूपाने न दिसता विश्वरूपाने दिसते हा त्यांचा भ्रम आहे. त्यांचा जन्ममरणाचा क्रम फिटतच नाही. त्यांना जे ब्रह्मतत्व दुर्गम ते अधिकारी लोकांना अगदी सुगम असते. येथे प्रवचन कामास येत नाही अथवा अनेक वेदांवरचा हक्क (स्वीकारणं) किंवा अनेक ग्रंथांचा अर्थ जाणण्याची बुद्धी किंवा अनेक ग्रंथांचे वाचन किंवा बहुश्रुतता याही कामास येत नाहीत. शब्दांमुळे शब्दांचे ज्ञान होईल पण त्यामुळे खऱ्या वस्तूचे (ब्रह्माचे) ज्ञान होईल का? बुद्धीला नित्य व अनित्य जाणण्याची उत्तम शक्ती असते परंतु वस्तू (ब्रह्म) तिच्या

आटोक्यात कधीच येत नाही. षड्दर्शने (न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मिमांसा व वेदान्त) टेकीस आली व अद्यापि वादच करीत राहिली, तरीही आत्मवस्तू आपल्या जागीच राहिली. शब्दांत कधीच गुंतली गेली नाही. मोठे शब्दपंडित झाले तरी वस्तुरुपी सूर्यापुढे ते खद्योतच (काजवेच), एकदा वस्तू (ब्रह्म) प्राप्त झाले की शब्दांचे सर्व जाळे विरून जाते. जगात पहा अंधाऱ्या रात्री दिव्याच्या प्रकाशाने सर्व क्रिया चालतात परंतु सूर्योदय होताच सकाळी दिव्याला कोणी विचारत नाही. तरी जो वाचेचा (बोलण्याचा) विषय नव्हे तो उपदेश कसा होईल? म्हणून वक्त्याचे आख्यानात अज्ञान निरसन हे ध्येय असावे. अस्तित्व बुद्धीने उपासना केली की आत्मा प्रसन्न होतो व उपासकाला आत्मतत्त्वभावाचे प्रकाशन उपलभ्यमान (प्राप्त) होते. आत्म्याच्या ठिकाणी परमात्म्याचे ध्यान केले व दोन्हीमध्ये अभेद रूपाने अनुसंधान ठेवून उपासना **केली की आत्मा स्वतःच उपसकावर प्रसन्न होतो. त्यासाठी दुसरे साधन नाही.** आत्म्याने स्वतःच प्रसन्न व्हावे लागते. साधकाच्या आत्म्याकडे कल पाहून आत्माच त्यावर आपणच कृपा करतो. (ओ. १८६-२०५)

**ग्रंथाच्या विषयाची समाप्ती होता, वक्ते श्रोत्यांना नेहमी प्रार्थना करतात व ऐकण्याच्या** श्रमांसाठी क्षमा मागतात. ही शिष्टरीती सर्व ठिकाणी आहे. परंतु या सच्चरितात तसे नव्हे कारण याचे कर्तृत्व माझ्या माथी नाही. साईबाबा स्वतःच माझ्या हाती लेखणी देऊन आपली कथा लिहून घेतात. म्हणून मी ग्रंथकर्ता नव्हे, येथे कोणी मजकरिता श्रोते नाहीत आणि श्रोत्यांना जर का मी क्षमा करा म्हटले तर ग्रंथाचे कर्तृत्व माझ्या माथी येईल. मला याचे भूषण नाही व माझ्या अंगाला दोषही चिकटत नाही. जेथे साईच कर्ता तेथे हा विषयही त्याचेच कृपेने संपूर्ण झाला. साईबाबांची आज्ञा घेऊन त्यांनी जसे सांगितले तसेच मी सगळ्यांनी ऐकावे म्हणून अज्ञानाचे विवेचन लिहून काढले. आपले वैभव, आपला प्रताप व आपला गौरव प्रकट करायला माझ्यामध्ये प्रवेश करून गुरुदेवांनी विषयाचा अर्थ प्रकाशित केला. या ग्रंथाला जो दूषण देईल अथवा त्याचे जो भूषण मानेल ते दोघेही मला पूर्णपणे वंदनीय असून साक्षात नारायणस्वरूप आहेत. भक्तांच्या अत्यंत कल्याणासाठी स्वतः आपले चरित्र निर्माण करून या हेमाडपंताला हाताशी धरून श्रीसाईबाबांनी हे चरित्र लिहविले. त्यांची शरीर धारणा लोकांवर अनुग्रह करण्यासाठीच, कुतर्कांचे व दुराग्रहांचे खंडन करण्यासाठीच आणि लोकसंग्रह करण्यासाठीच होती. म्हणून हेमाडपंत त्यांच्या चरणी अनन्यभावे लोटांगण घालतात आणि पुढील रसाळ कथा ऐकण्यासाठी श्रोतृगणांनी एकाग्रचित्त व्हावे (अशी विनंती करतात). (ओ. २०६-२१५)

सर्वांचे कल्याण असो. अशा प्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्रीसाईसमर्थ यांच्या सत्य चरित्राचा 'अज्ञाननिरसन' नावाचा **पन्नासावा अध्याय संपूर्ण झाला.**

॥श्रीसद्‌गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्वत्र शुभ असो.॥

# श्रीसाईभक्तिचा प्रभाव

— श्री. वि. म. हटवार
१४९, रेशीमबाग,
नागपूर — ९.

ज्ञानदेव म्हणे हरी हरी म्हणा
वाल्मिकी उद्धरला राम जपे ।
प्रल्हादे धरिला नारायण मनी
तुका वेडा होई विठ्ठल चरणी ।

भक्ति म्हणजे देवावर असलेली श्रद्धा. खरा भक्त परमेश्वराचे नामस्मरण करीत आपल्या वाट्यास आलेली कामे करून सदा प्रसन्नचित्त असतो. अशा श्रद्धाळू, सदाचारी पुरुषांना श्रेष्ठ साईबाबांच्या सान्निध्यात राहावयास मिळणे भाग्यानेच समजावे. ज्याचे मन पवित्र विचाराने प्रेरित असेल त्याचा अंतरात्मा जे काही चिंतेल ते त्यास प्राप्त होण्यास साईराम सहाय्य करेल असा विश्वास प्राप्त होतो.

श्री ज्ञानदेवाचा हरिपाठ, वाल्मिकी रामायण, तुकारामाचे अभंग, प्रल्हादाची भक्ति आम्हास सांगत आहे की जेथे शुद्ध भाव असेल, मनाची तन्मयता असेल तेथे सर्व शक्ति सहाय्य करण्यास सिद्ध असतात. चित्ताची एकाग्रता करुन देवाचा धावा करावा. तो जन्मदाता परमात्मा आपल्या प्रत्येक कर्मास सहाय्यक बनून सत्पुरुषाची गाठ घालून परमार्थाची शिकवण देतो. जन्माचे सार्थक होण्यास गुरुचा मंत्र प्रपंच नेटका करून सर्व मार्ग सुगम करतो. भक्त जी इच्छा करेल ती पूर्ण होते पण सदिच्छा असली पाहिजे.

श्रीसाईबाबा शिरडीचे त्यांच्या काळात मठाधिपती होते. त्यांच्या अनुयायांच्या ठायी जी भक्ति होती त्या भक्तिच्या प्रभावाने मठास एक भव्य संस्थानाचे स्वरुप प्राप्त झाले. याच भक्तिचा प्रभाव समर्थ रामदास स्वामींच्या अनुयायांत होता. एकदा स्वामींच्या मठात जे अनुयायी होते त्यांना काशी विश्वेश्वराच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली. त्यांची रामदास स्वामींच्या नित्य चालणाऱ्या दिनचर्येच्या प्रभावाने इतकी दृढ निष्ठा बनली होती की स्वामींच्या सोबत राहून सर्वजण रामभक्त, देशसेवक आणि धर्मसंरक्षक बनले होते. रामदासस्वामींनी आपल्या सोबत काशीयात्रेला यावे अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली.

श्री रामदास स्वामींचा नित्यक्रम पाच घरी भिक्षा मागून आलेल्या शिधेने श्रीरामाचा नैवेद्य केल्यावर भोजन करीत असत. देवाचे स्नान, पूजाविधी ते स्वतःच करीत. त्यांनी शिष्यांना सांगितले की मी तुमच्या सोबत काशी यात्रेस आल्यावर हे नित्यकर्म करण्यास येथे एकास राहावे लागेल. तेव्हा तुमच्यापैकी कोण येथे थांबण्यास तयार आहे ते सांगावे. कोणीच याबाबतीत जबाबदारी घेण्यास तयार नव्हता. सर्वांचीच इच्छा काशी यात्रेस जाण्याची होती. तेव्हा त्यांनी एका अज्ञान नावाच्या शिष्यास सांगितले

की तू मठात राहून श्रीरामाचे स्नान, पूजाविधी व जेवण दररोज आम्ही परत येईपर्यंत करावे. अज्ञानाने स्वामीची आज्ञा स्विकारली. श्रीरामदासस्वामी सर्व शिष्यांसह काशीला विश्वेश्वराच्या दर्शनास यात्रेला निघाले. दुसरे दिवशी अज्ञान पहाटे उठून नदीवर स्नानास गेला. स्नान आटोपल्यावर त्याने सर्व पुजासाहित्य तयार केल्यावर सकाळी 'श्रीराम जयराम जय जय राम' नामघोष करीत भिक्षा मागून शिधा आणून स्वयंपाक केला. मठातील देवळात श्रीराम, लक्ष्मण व सीतामाई आणि हनुमंताच्या मूर्तिचे स्नान करून पूजा विधी आटोपला. सर्वांकरिता पाने मांडून ते जेवल्यावर स्वामी जेवत असत त्याप्रमाणे आपण नंतर उंरलेले अन्न सेवन करू अशा निर्धाराने बसला. मुखाने रामजप चालू होता. एक दिवस असाच निघून गेला. पात्रावरील अन्न तसेच आहे, देव जेवत का नाहीत म्हणून उदास होऊन आपले काही चुकले असेल असे वाटून क्षमा मागितली. अज्ञानाने आपली श्रद्धा सोडली नाही. असे करताना मुखाने रामनाम तर डोळ्यांतून अश्रू येऊ लागले तरी सात दिवस त्याने निर्धाराने देवाची विनवणी केली. शेवटी प्रत्यक्ष श्रीरामप्रभू, लक्ष्मण, सीता व हनुमानासमवेत आले. सर्वांनी नैवेद्याच्या पात्रातील अन्न सेवन केले. अज्ञानाने देवाला साष्टांग नमस्कार केला व घडलेला स्वामीच्या यात्रेला जाण्याचा वृत्तांत सांगितला. माझ्या गुरूप्रमाणे माझी सेवा गोड करून घ्या व माझी इच्छा आहे की माझ्या स्वामीला शिळ्या भाकरी बारीक करून तळलेला चिवडा फार आवडतो तो त्यांच्याकडे घेऊन जाण्यास मला मदत करा. श्रीरामाने हनुमंताला अज्ञानास काशीला नेण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणे हनुमंत आपला वेष पालटून अज्ञानांस घेऊन रामदास स्वामी गंगेच्या काठी आपल्या शिष्यासोबत जेथे गंगास्नानास गेले होते त्या स्थळी पोहचले व स्वत: **दूर** एका झाडाखाली जावून उभे राहिले. अज्ञानाने स्वामीची भेट घेतली, घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. रामदास आश्चर्याने अज्ञानाकडे बघून म्हणाले, अज्ञाना तू एकटा इतक्या **लवकर येथे कसा आला. तेव्हा त्याने,'दूर झाडाखाली उभे असलेले हनुमंत** माझ्यासोबत आहेत, त्यांनीच उपकार केला म्हणून मी श्रीरामाच्या आज्ञेने येथे आलो' असे सांगितले.

श्री स्वामी रामदासांनी अंतर्ज्ञानाने सर्व जाणले व शिष्यगणांस म्हणाले, तुम्ही इतक्या दूर काशीला येऊन काही मिळवू शकले नाहीत ते माझ्या प्रिय शिष्य अज्ञानाने प्रत्यक्ष प्रभूचे दर्शन प्राप्त केले. असा आहे भक्तिचा प्रभाव.

श्रीसाईंच्या शिर्डीवास्तव्यातील असे अनेक प्रसंग साईचरित्रात आलेले आहेत. श्रीसंत दासगणू महाराजांना पंढरपूरला जाऊन श्रीपांडुरंगाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली तेव्हा श्रीबाबांनी त्यांना तिथल्या तिथेच साक्षात श्रीविठ्ठलाचे दर्शन घडविले. **श्रीसाई आपल्या भक्तांना उदी लावत असत व त्यांच्या त्या उदीने भक्तांना** आराम वाटत असे. जगातील कोणत्याही प्राणीमात्राशी प्रत्यक्ष देवदूत असलेले साईनाथ एकरूप झालेले असत. आपल्या भक्ताने केलेली कोणत्याही प्राण्याची मनापासूनची सेवा त्यांना पोचत असे. कुत्र्याला घातलेली भाकरी बाबांना पोचली हे त्यांच्या तोंडून

**ऐकताच** भक्ताच्या श्रद्धायुक्त मनास आश्चर्य होत असे. श्रीसाईंनी आपल्या भक्तांच्या भक्तीची पराकाष्ठा पाहून त्यांना वेगवेगळ्या स्वरुपात दर्शन दिले आहे. श्री बाळारामाचे मन आपल्या प्रिय व प्रेमळ पत्नीच्या विरहाने व्याकूळ झाले होते. त्यांच्या मनास योग्य वळण लावण्याकरिता बाबांनी त्याला बारा रु. दिले व मच्छिंद्रगडावर जाण्यास सांगितले. श्री बाळाराम तेथे जाऊन ध्यानधारणा करीत असत. थोड्याच दिवसात त्याची साधना पाहून श्री साईबाबांनी प्रत्यक्ष दर्शन दिले. संसारात इतरत्र कुठेही न मिळणारे मानसिक समाधान भक्तिने परमेश्वराच्या सान्निध्यात मिळते.

## श्री बाबांची आरती

**चाल :- आरती घन नीळा**

आरती श्री साई श्री साई
सकल जनांची तू आई ।। धृ. ।।

सिंहासनी मूर्ती विराजे
साई साई नाद निनादे
भक्त नाचती दरबारी
आरती श्री साई श्री साई ।। १ ।।

हाती घेऊनी पंचारती
भावे तुजला ओवाळीती
घण घण वाजे घंटाही
आरती श्री साई श्री साई ।। २ ।।

शिरडी ग्रामी पूर्णानंद
पाहु डोळा आनंद कंद
नित्यानंदे वास करी
आरती श्री साई श्री साई ।। ३ ।।

साई संत असती देव
मना धरी रे दृढ भाव
दर्शन देतील निर्धारी
आरती श्री साई श्री साई ।। ४ ।।

**— श्रीमती रूक्मिणी बेंद्रे**
के.सी. चौधरी यांचे घर,
शारदा नगर, भुसावळ, जि. जळगाव.

# भक्तांच्या पारमार्थिक जीवनाचे शिल्पकार

– श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी.पी.टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई-४०० ०३७.

"मी माझ्या माणसांना जे हवे ते देतो कारण त्यामुळे मी जे त्यांना देऊ इच्छितो, त्याची गरज त्यांना जाणवते व ती तेव्हा मी पुरी करतो." श्रींच्या प्रेमळ कृपेचा सुरुवातीचा वर्षाव हा भक्तांच्या दैनंदिन जीवनांतील ताप नाहीसा करण्यासाठी होतो. आर्त व अर्थार्थी भक्तांची श्रद्धा या कृपेने झटकन बसते. त्यांना श्रींच्या अमर्याद शक्तिचा अनुभव स्तंभित करतो. अनाकलनीय प्रकारे जटिल समस्या सुटणे अकल्पित ईश्वरी सहाय्य त्यांना मिळते. यामुळे त्यांना ते परमेश्वरच आहेत असा विश्वास वाटतो.

कालांतराने छोट्यामोठ्या ऐहिक निकडीच्या समस्या सुटल्यामुळे भक्ताला थोडेसे निवांतपण मिळते त्याला हे निवांतपण अंतर्मुख करते. त्याची तळमळ आता ऐहिकाच्या पलिकडे असलेल्या निर्विकार आनंदाचा सतत अनुभव घेण्यासाठी होते. मिळालेले निवांतपण भक्ताला एकाग्रतेचा अभ्यास करायला लावते व त्याचे स्थिर मन अधिक सखालतेने व त्रयस्थपणे स्वतःच्या गुणावगुणांचा आढावा घेते.

या आढाव्यात त्याचे त्याला कळते की, आपण आतापर्यंत केलेला प्रवास हा अहंकार तृप्तीचा होता, तो आत्मतृप्तीसाठी नव्हता. अहंकाराचे स्फुरण हे जन्मोजन्मीच्या अतृप्त वासनांच्या तृप्तीसाठी असते पण त्यासाठी केलेली धावाधाव ही मृगजळाच्या पाण्याने तहान भागवण्याची केलेली केविलवाणी धडपड होती. त्याने आजपर्यंत कोणाचीच तहान भागली नाही व भागणार नाही. त्यामुळे त्याची प्रवासाची दिशा बदलते.

समर्थ सद्गुरु श्रीसाईबाबांची ही कृपा होय कारण ऐहिकाच्या पलिकडे असलेली स्वानंद अवस्था ही निष्काम कर्मयोगाने झालेल्या चित्तशुद्धीवर अवलंबून असते. त्यामुळे त्याच्या भक्तिचा केंद्रबिंदू आता आत्म्यावर स्थिर होतो. वासनांच्या पिंजऱ्यातून तो केवळ श्रींच्या कृपेने मिळालेल्या वैराग्याने बाहेर येतो. आता त्याला स्वानंदाचे क्षितीज नसलेले आकाश स्वच्छंदपणे विहरण्यास मिळते. किनारा नसलेला स्वानंद सागर तो आपल्यातच अनुभवू लागतो कारण लौकीक अर्थाने रोज उगवून मावळणारा सूर्य त्याच्या जीवनातून निघून गेलेला असतो. उदय व अस्त नसलेला गुरू कृपेचा बोधसूर्य त्याच्या हृदयात उगवलेला असतो. आता पर्यंतचे जीवनातील त्याचे क्षण परप्रकाशित असतात. थोडक्यात बाह्यगोष्टींच्या प्राप्तीवरच त्याचे मर्यादित सुख अवलंबून असते पण गुरूकृपेचा फार मोठा चमत्कार त्याला सत्संगामुळे निसंग करतो. त्यामुळे तो स्वयंप्रकाशित होतो व इतरांनाही प्रकाश देतो.

कळत नकळत समर्थांनी त्याच्या पारमार्थिक जीवनाला आपल्या अदृश्य हातांनी आकार दिलेला असतो. त्याचे जीवन आता कायमच गुरूपौर्णिमेच्या शीतल व सुखद अशा चंद्रप्रकाशातील अप्रतिम व अलौकिक अशा शिल्पासारखे होते. मला वाटते, हाच बाबांचा सर्वात मोठा चमत्कार! रोज सर्वजण झोपेतून जागे होतात व रोज पुन्हा निद्रीस्त होईपर्यंत केवळ मृगजळा मागेच धावतात. खरे तर ते त्यांचे सर्व आयुष्य निद्रीस्तावस्थेतच घालवतात पण श्रींसारखा समर्थ त्यांच्या भक्ताला अमर्याद आनंदात आपल्या कृपेने कायम ठेवतात व परम अर्थपूर्ण जीवन जगावयास देऊन सहजसमाधित आपली कर्तव्य करावयास लावून त्याला अंतिम क्षणी मुक्त करतात. या रितीने श्रीबाबा त्याच्या पारमार्थिक जीवनाचे शिल्प घडवतात.

# अचिन्त्याचे चिंतन

**—श्री. शाम जुवळे**
जनार्दन भुवन ,९ छबिलदास रोड, दादर (प),
मुंबई—४०० ०२८.

सृष्टीप्रमाणे मानवी मनाची रचना गुंतागुंतीची असल्यामुळे आजतागायत ही गुंतागुंत सोडविण्यास माणूस बऱ्याचशा प्रमाणात असमर्थ ठरला आहे. आजच्या या विज्ञान युगात विज्ञान शास्त्राने सृष्टीचे एक दालन महत प्रयासाने खुले करताच त्याच्यापुढे दहा दालने बंद असलेली त्या शास्त्राला दिसून येतात. अशा या विचित्र परिस्थितीत हे शास्त्र वावरत आहे. आजपर्यंत विज्ञानाने तसेच तंत्र शास्त्राने लावलेले शोध संस्मरणीय तसेच कौतुकास्पद आहेत यात दुमत असण्याचे कारण नाही. परंतु अव्यक्तातून साकार झालेले सृष्टीचे व्यक्त स्वरूप त्याला घेरून असलेल्या त्याच्या अव्यक्त स्वरूपापेक्षा बरेच लहान आहे हे यावरून सिद्ध झाले आहे. हे सर्व गूढ लक्षात घेतल्यावर ज्याने हा व्यक्त-अव्यक्ताचा अवाढव्य पसारा उभा केला आहे त्या परमेश्वरापुढे सूज्ञ माणूस नतस्तक होतो यात नवल नाही. वास्तविक या सत्य परिस्थितीचा उलगडा अशा रितीने होत असता प्रत्येक व्यक्तीने परमेश्वराविषयी मनात कृतज्ञता भाव धरून प्रामाणिकपणे जीवन जगले पाहिजे. अशा रितीने व्यक्त केलेल्या कृतज्ञतेला परमेश्वराच्या कृपेची साथ जीवनभर लाभत असते, असा निर्वाळा संतपुरुष देत असतात.

मानवी देहाला मातीच्या घटाची उपमा संतांनी दिलेली आहे. घटाला कारण जशी माती असते त्याप्रमाणे मन-इंद्रियांसहित देहाला कारण बुद्धी आहे असे ते म्हणतात. प्रत्येक देहामध्ये वसणाऱ्या आत्म्यामुळे बुद्धी प्रकाशित होत असते. आत्मा हा

स्वयंप्रकाशित असल्यामुळे प्रकाशाकरता त्याला इतर कोणाची गरज भासत नाही. भगवद्‌गीतेत म्हटल्याप्रमाणे पंच विषयांपेक्षा त्यांचा वापर करणारी इंद्रिये थोर होत. इंद्रियांपेक्षा मन श्रेष्ठ होय मनापेक्षा बुद्धी अधिक श्रेष्ठ होय. आणि या सर्वांच्यापेक्षा आत्म्याचे स्थान सर्वोच्च होय. अशी ही एकापेक्षा एक वर चढत जाणारी श्रेणी आत्म्यापर्यंत येवून थबकली जाते. आत्म्याचे सर्वश्रेष्ठत्त्व अशा रितीने मान्य केल्यावर मानवाने गर्वाने फुगून जावून विधात्याशी कृतघ्नतेने वागण्यात मानवाची कोती वृत्ती दिसून येते.

श्री साईबाबा नेहमी आपल्या भक्तांस सांगत असत की फार चतुराई कामाची नाही, श्रेष्ठ व वयोवृद्ध सांगतील ते ऐकत जावे. (श्रीसाईसच्चरित, अध्याय १६ वा, ओवी क्र. १५) याचा अर्थच असा की, बुद्धीला अवास्तव महत्त्व देवून थोरांच्या अनुभवाला डावलू नये. बुद्धीला मानवाच्या कल्याणकारी हेतुने चालना देऊन मिळालेल्या बोधामृतातून अनुभवाचे बोल बाहेर पडत असतात. बुद्धी हा अंत:करणाचा प्रमुख भाग असल्यामुळे ज्या संतपुरुषांनी जीवनाच्या सखोल अभ्यासाद्वारे आपले अंत:करण शुद्ध व पवित्र केले आहे. त्यांच्या अनुभवी ज्ञानाला मान देणे, हे आपल्यासारख्या सर्वसामान्य जनांचे आद्य कर्तव्यच ठरते. श्रीसाईबाबांसारख्या महान संत पुरुषांचा अमृतोपदेश ज्यांनी दैनंदिन जीवनात आचरणात आणला, ते खरोखरीच धन्य होत. त्यांचा उपदेश म्हणजे अशाश्वत अशा या जगात समृद्ध असे जीवन जगण्यासाठी दिलेला संजीवनी मंत्रच होय.

प्रत्येक जीव हा जन्मोजन्मीचा प्रवास करीत जीवनाच्या विकासाद्वारे पुन्हा शिवामध्ये विलीन होत असतो. एका जन्माच्या मृत्यूने हा विकास संपुष्टात येत नाही, असे संत सांगतात. अशाश्वताच्या क्षेत्रात जीवाने प्रवेश केल्यावर पुन्हा शाश्वताला जावून मिळण्याची धडपड प्रत्येक जीव कळत नकळत करीत असतो, असे संतपुरुष आजवर सांगत आलेले आहेत बाह्य जगातील सुख कितीही प्राप्त करून घेतले तरी त्याने जीवाला पूर्ण समाधान प्राप्त होत नाही, हा संतांनी स्वानुभवांनी केलेला उपदेश अनमोल असाच आहे.

परमेश्वर हा अखिल विश्वात भरून उरला आहे. परमेश्वर म्हणजे अशाश्वतातील शाश्वत असे परमतत्त्वच होय. व्यक्त दशेला आलेल्या आपणासारख्या श्रीसाईभक्तांनी परमेश्वराच्या या परमतत्त्वाचे चिंतन करणे म्हणजे अचिंत्याचे चिंतन करणे होय. चिंतन करणे हा चित्ताचा धर्म असल्यामुळे ज्यांनी आपले चित्त अध्यात्म-साधनेच्याद्वारे शुद्ध व पवित्र केले आहे त्यांनाच त्यापासून निर्माण होणारा आत्मानंद उपभोगता येतो. इतरांना त्यांच्या अज्ञानपणामुळे अशा आनंदाला मुकावे लागते व जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकून रहावे लागते असे संतपुरुष आक्रोश करून सांगत असतात. "जया मनी जैसा भाव। तया तैसा अनुभव।" हे श्रीसाईबाबांचे अमृत-बोल सतत नजरे समोर ठेऊन जीवनाचे सार्थक करून घ्यावे हेच. आपल्या हिताचे ठरते.

# साईनाथांचा निष्काम कर्मयोग

**– सौ. संगीता गोडबोले**
एम्.ए., बी.एड्.
प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, 'परिमल', पुणे-४४.

**"तुमचा मी भार वाहीन सर्वथा,**
**नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥"**

साईनाथांच्या ११ वचनांपैकी असलेले हे एक अमोल रत्न. वरवर याचा अर्थ अगदी साधा वाटतो. साईभक्तांना हे पाठही असेल. पण यात किती गहन अर्थ भरला आहे. भक्तांचा भार साईनाथ वहातात यात यत्किंचितही शंका नाही. आपली लौकिक जीवनातील दुःखे, रोग यांचे निवारण साईनाथ करतातच. पण वरील वचनाद्वारे तुम्ही करीत असलेली सर्व कर्मे साईनाथांच्या चरणी अर्पण करायला सांगितली आहेत.

पण ही कर्मे तरी साईनाथांच्या चरणी का अर्पण करायची? असा प्रश्न साहजिकच आपल्या मनात येईल. याचे कारण असे की, साईसच्चरित्रातून वारंवार जो **सायुज्य** मुक्तिचा म्हणजे मोक्षाचा मार्ग सांगितला आहे, तो प्राप्त करण्याकरिता 'कर्मबंधनातून मुक्त' व्हायला सांगितले आहे. म्हणजेच जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होईल. व शेवटी ते निःश्रेयस पद आपणाला प्राप्त होईल, परमात्म्याची प्राप्ती होईल.

पण, जन्माला आल्यानंतर 'कर्म' हे करावेच लागणार. खाणे–पिणे, नोकरी, कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या आपणाला पार पाडाव्याच लागणार. मग या कर्मातून सुटका कशी? साईनाथांनी या प्रश्नाची उकल भोळ्याभाबड्या भाविकांना अगदी सोप्यारितीने विशद केली आहे. "आपण सर्व कर्मेच माझ्या चरणी वाहा," मग तुम्हाला किती मोकळे वाटते पहा! उगाचच कर्माचे बोचके डोक्यावर घेऊन का वावरायचे!

भगवद्गीतेत श्रीकृष्णाने हेच सांगितले आहे.

**"कर्मण्येवाधिकारस्ते**
**मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा**
**ते सङ्गे ऽस्त्वकर्मणि ॥"**

"कर्म करणे हेच तुझे कर्तव्य आहे. त्याच्या (कर्माच्या) फलाची चिंता कधीही करू नकोस. म्हणूनच कर्माचे फल हा तुझा हेतू असता कामा नये. पण त्याचबरोबर कर्म न करण्याबाबतही तुझा आग्रह असता कामा नये." हाच 'कर्मयोग' लोकमान्य टिळकांनी आपल्या 'गीतारहस्य' ग्रंथात विशद करून सांगितला आहे. विनोबा भावे यांनी सुद्धा 'कर्म व अकर्म' याचे स्पष्टीकरण करताना म्हटले आहे की, "कर्म" – "अकर्म"

करण्याची कला आपणाला साधुसंतांकडून शिकायला मिळते. त्यांनी व्यवहारातील फार समर्पक दाखला दिला आहे. आपणाला मुलगा झाला असता आपण म्हणतो, "मला मुलगा झाला." पण दुर्दैवाने मुलगा मृत्यू पावला तर म्हणतो, "देवाने मुलगा नेला." असे का? "मला मुलगा झाला व माझा मुलगा मृत्यू पावला" असे म्हणा वा "देवाने मुलगा दिला व देवानेच मुलगा नेला" असे म्हणा. दुसरा पर्याय हा अधिक महत्त्वाचा आहे. कर्तृत्व तुमच्याकडे घेऊच नका.

श्री साईनाथांनीसुद्धा हेच सांगितले आहे. तुम्ही कर्म करा, अर्थातच त्यांनी सांगितलेली वचने आचरणात आणून कर्म करा. पण हे 'कर्म' करीत असतानासुद्धा कधीकधी उदासिनता वाटते. मनाला कधीकधी खूप वाईट वाटते. कारण सर्वतोपरी आपण चांगले वागूनही कधीकधी काही शारीरिक व मानसिक भोग आपणाला भोगावेच लागतात. याचे उत्तर काही लोक मागील जन्मातील कर्माशी लावतात. यात चूक काहीच नाही. पण प्रश्न असा राहतो की, या जन्मात आपण कर्म करीतच राहणार, म्हणजे त्याचे फल (अर्थात चांगले असले तरीही) परत पुढील जन्मी येणारच. ही 'कर्माची शृंखला' कुठेतरी थांबली पाहिजे. म्हणूनच तुमचे सारे कर्म साईनाथांच्या चरणी अर्पण करा अन् मोकळे व्हा.

यातून अजून एक गोष्ट साधते, ती ही की, 'कर्मे' साईनाथांच्या चरणी अर्पण केल्यावर तुमच्याकडे कर्तृत्व, भोक्तृत्व राहातच नाही. म्हणजे तुमचा अहंकार, मीपणा, स्वत्व सारे नष्ट होते. आणि कधीकधी चांगले वागूनही जे दुःख (शारीरिक वा मानसिक) वाट्याला येते, ते सहन करण्याची ताकद आपणास येते. कारण कर्ता, करविता परमेश्वर. आपण कोणी नाहीच, ही भावना मनात दृढपणे रुजल्यावर त्याची खंत वाटत नाही. व हे 'कर्म'— 'अकर्म' होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होऊ शकते. भगवद्गीतेत श्रीकृष्णाने हातात चक्र धरले, अर्जुनाला लढाई करायला प्रवृत्त केले. पण तरीही 'तू करणारा कोणीही, नाहीस, तू फक्त क्षत्रिय धर्माचे स्वकर्तव्य केलेस' हेच वारंवार सांगितले आहे.

'ईशावास्य' उपनिषदातील कर्माबाबतचा एक श्लोक फारच समर्पक आहे.

**"कुर्वन्नेवेह कर्माणि,**
**जीजिविषेत् शतं समाः।**
**एवं त्वयि नान्यथेतो ऽस्ति**
**न कर्म लिप्यते नरे ॥"**

"येथेच कर्म (कर्तव्य) करीत तू १०० वर्षे जीवंत रहा. याशिवाय तू दुसरे काही करू नकोस. असे केले असता तुला कर्म चिकटणार नाही."

या श्लोकाचा अर्थ वरवर पाहिला असता त्यात विरोधाभास वाटतो. कारण पहिल्या ओळीत 'कर्म' करायला सांगितले आहे, तर दुसऱ्या ओळीत हे कर्म तुला चिकटणार नाही, असे सांगितले आहे. पण 'कर्म' — 'अकर्म' करण्याची हीच कला तर **आपण साधुसंतांकडून शिकतो, आचरण्यात आणण्याचा प्रयत्न करुन हा परमानंद**

लुटण्याचा प्रयत्न करतो. या श्लोकाद्वारेही 'कर्म' परमेश्वराच्या चरणीच अर्पण करायला सांगितले नाही का?

या श्लोकाच्या आधीचा श्लोक तर फारच उद्‌बोधक आहे.

**"ईशावास्यमिदं सर्वं यत् किञ्च जगत्यां जगत्। तेन त्यक्तेन भञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम्॥"** "हे सारे जगत् (विश्व) परमेश्वराने भरले आहे. त्याचा त्याग करून (त्यक्तेन) तू उपभोग घे." ('मुञ्ज्' धातूचा शब्दशः अर्थ 'खाणे' असा आहे.) **म्हणजेच कर्म करायला सांगितले आहे. पण ते कसे? यामागील शब्द पहा! त्यक्तेन–** त्यागपूर्वक. म्हणजे 'आसक्तिविरहित' असा अर्थ घेता येईल. वा तू कर्मे करणारा नाहीस, कर्ता-करविता कोणी दुसराच आहे, असे समजून 'कर्म' कर. म्हणजे ते 'अकर्म' होईल. पुढील ओळीचा अर्थ, वैयक्तिक व सामाजिक जाणिवेतून असा आहे की, 'कोणाच्याही पैशाची हाव बाळगू नकोस.

श्री. दासगणूंच्या मनात 'ईशावास्य भावार्थबोधिनी' बाबत शंका उपजली होती. श्री साईनाथांनी स्वतः याचे स्पष्टीकरण न करता काकांच्या (भाऊसाहेब दीक्षितांच्या) मोलकरणीच्या मुलीच्या द्वारा हा गूढार्थ २०व्या अध्यायात किती सहजपणे उकलून दाखविला आहे पहा. त्या मुलीला नवीन साडी मिळाल्याने ती नेसल्यावर ती मुलगी जितकी आनंदाने बागडत होती, तेवढीच दुसऱ्या दिवशी ती साडी बदलल्यावर फाटके नेसल्यावर व पूर्वी साडी नसतानाही तेवढीच आनंदी होती. नवीन साडी नसल्याचे दुःख वा नवीन साडी आल्यावर होणारे सुख दोन्हीही तिच्याबाबत नव्हते. श्रीकृष्ण भगवानांनी हेच सांगितले आहे – **"सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ।"...** सुख व दुःख, लाभ व हानी, जय व पराजय यांना जो समान मानतो, तोच 'स्थितप्रज्ञ' होय. साईनाथांनी 'मोलकरणीच्या मुलीच्या' उदाहरणाद्वारे या 'स्थितप्रज्ञाचे'च लक्षण सांगितले नाही का? ईशावास्यात **'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः'** आसक्तिविरहित कर्म तू करीत रहा, असे सांगितले आहे. मोलकरणीच्या मुलीचे कर्म 'आसक्तिविरहित' आहे. तीचे 'कर्म' हे 'अकर्म' झाले आहे. असे कर्म लिप्त होणारे नाही. काय साईनाथांची गूढार्थ स्पष्ट करण्याची अजब रीत!

तसेच, साईनाथांनी स्वतःच ईशावास्य उपनिषदाचे स्पष्टीकरण केले नाही. कारण–

**'ईशे त्या पोरीसही आच्छादिले।**
**प्रकट हे केले बाबांनी ॥'** ओवी १०७.

**"मजवांचून आणीक कोण ।**
**आहे ती काकांची मोलकरीण ॥**
**मीच ती ही दिसली खूण ।**
**ईशावास्य जाणविलें ॥"** ओवी १२७.

दासगणूंच्या मनात प्रथम जी शंका उपजली होती की, ती न शिकलेली काकांची मोलकरीण काय उपनिषदाचा अर्थ सांगाणार? त्याचे निरसन साईनाथांनी तिच्याच

द्वारा गीत म्हणवून केले. पहिल्या श्लोकात 'ईश' म्हणजे परमात्मा. तो सर्वांतर्यामी, सर्व ठिकाणी भरून राहिला आहे असे सांगितले आहे. मग तो या मोलकरणीच्या मुलीत नाही का? हे प्रत्यक्ष उदाहरणाद्वारे विशद करून मनातील शंका दूर केली.

साईनाथांची इतका कठीण विषय स्पष्ट करून सांगण्याची रीत, दाखले देऊन प्रत्यक्षपणे भावार्थ विशद करण्याची पद्धत आजच्या काळातील शिक्षकांनासुद्धा खूप काही शिकवून जाईल.

तर, असा भगवद्‌गीतेतील व ईशावास्य उपनिषदातील 'निष्काम कर्मयोग' साईनाथांनी भोळ्या भाविकांना किती सहजपणे विशद करून सांगितला आहे. यावर साईभक्तांनो विचार करा, मनन करा, निदिध्यासन (अभ्यास – पुनरावृत्ति) करा, व आचरणात आणण्याचा प्रयत्न करा. आणि पहा, आपल्या जीवनात किती आमूलाग्र बदल होतो ते!

## साई तुझ्या दारी


साई तुझ्या द्वारी आलो क्षणभर
त्यागुनी काम क्रोध अहंकार ॥ धृ ॥

साई माझा मी साईचा
हाच ध्यास माझ्या मनिचा
साई सदा भुकेला भक्तीचा
साई तुझ्या द्वारी आलो क्षणभर
त्यागुनी काम क्रोध अहंकार ॥ १ ॥

नाही लोभ धन दौलतिचा
दास मी आहे तुझ्या चरणांचा
ध्यास मनी तुझ्या दर्शनांचा
साई तुझ्या द्वारी आलो क्षणभर
त्यागुनी काम क्रोध अहंकार ॥ २ ॥

तूच समर्थ नाथ साई
तुझसी मी मागू काही
तुझ्या दर्शनाची मज घाई
साई तुझ्या द्वारी आलो क्षणभर
त्यागुनी काम क्रोध अहंकार ॥ ३ ॥

**— श्री. घोरपडे,**
हेड कॉन्स्टेबल, वरळी, मुंबई.



# गोकुळचा कृष्ण द्वारकाधिश

– डॉ. सुमन खानवीलकर
बॉम्बे पूना रोड,
लोणावळा.

जयां पुरुषाचां ठायीं । कर्माचा तरी खेदु नाहीं ।
परी फळापेक्षां काहीं । संचरेना ॥३॥
आणि हें कर्म मी करीन । अथवा आदरिलें सिद्धी नेईन ।
येणें संकल्पें ही जयाचें मन । विटाळेना ॥४॥
ज्ञानाग्नीचे नि मुखे । जेणें जाळिली कर्मे अशेखें ।
तो ब्रम्हचि मनुष्य वेखें वोळख तूं ॥५॥

साईनाथा मला की नाही काल एक स्वप्न पडले,मस्त स्वप्न होते. बघ,इतके दिवस आपण गप्पा मारतो पण तू काही मला हे सांगितले नाहीस. काय पडले स्वप्न सांगते हं ! पण मध्ये मध्ये बोलून मला खोडून टाकायचे नाही.

ऐक सांगते. माझ्या स्वप्नात मोर मुगुटधारी पितांबर नेसलेला, गळ्यात वैजयंतीमाला,हातात मुरली आणि खट्याळपणे हसणारा कृष्ण आला होता. मी प्रथम जरा गोंधळले. या कलियुगात कुठे कृष्ण, कृष्ण तर द्वापार युगात. इतक्यात तोच म्हणतो कसा, मला ओळखले नाहीस,ज्याची तू रोज आठवण करतेस तोच मी. अरे हो मी गोकुळातला कृष्ण बनून आलो तेव्हाच बाईसाहेब दचकल्या.

असे म्हणताच माझ्या डोक्यात प्रकाश पड़ला आणि तुझे चरित्र डोळ्यासमोर उभे राहिले. साईनाथा मला शंका होतीच पण बोलावे कसे? पण तूच बोलला होतास मी अनादी आहे. तेच वाक्य अर्जुनाला कृष्णाने सांगितलेले आठवत होते.

तसेच तुझे वागणे, बोलणे मनाला पटवत होते. तूच हे रुपडे घेऊन आला आहेस. पण संकल्प विकल्पच संसारी माणसाला तुझे स्वरुप ओळखण्याच्या आड येतात.

तू खरा निर्गुण निराकार पण या भक्तांसाठी तू गुणातीत साकार रुप धारण केलेस खरे. तुला हे न पटणारे पण तुझ्या लाडक्या भक्तांसाठी तू सारे विसरतोस आणि ज्याला जसा हवा तसा बनत गेलास. ज्याने जशी भक्ती करावी तसे तू स्वीकारुन त्याला समाधान देत होतास.

काय म्हणालास,असे कसे शक्य आहे? सांगतेच आता तुला.

अगदी आताचेच तुझे वाक्य सांगते ऐक. ते मुरलीधराचे मंदिर बांधणे चालले तेव्हा तू काय बोललास आठवते काय तुला? आपण येथेच बसू. सुख दु:खाच्या गप्पा करु. लोकांनी मान डोलावली नुसती. तुझी मायाच और नारे. मग त्यांना कसे कळावे, मुरलीधर दुसरा कोणी नाही तूच आहेस ते. असो.

हे बघ तू असा खट्याळपणे हसू लागलास ना की मी सारे विसरुन जाते. नी तुझ्याकडे नुसती पहात रहाते. आता तुला सांगते ते नीट ऐक.तू भूल भुलैय्या आहेस बरे.तुझे द्वापार युगातले चरित्र व आताचे कलियुगातले चरित्र तुझ्या कृपेनेच माझ्या डोळ्यासमोर दिसते,ते तुला सांगते.तू फक्त हो नाही म्हणायचे, म्हणजे तू ऐकतोस ते मला समजेल,दुसरे काही नाही.

तुझा द्वापार युगात मथुरेत जन्म झाला, गोकुळात वाढलास,देवकी पुत्र यशोदेने वाढवला, गोपी गोपाळांनी लाड केले.कलीयुगात जन्म कोठे माहित नाही.कृष्णाचा तरी कोठे माहीत होता,नंतर माहित झाला.असो.

वाढलास शिरडी माईच्या कुशीत. लाड कौतुक केले बायजाबाई, तात्या कोते दिक्षित, बुटी निमोणकर, म्हाळसापति, राधाकृष्णामाई वगैरेनी, खरेना? हे कसे पटले अगदी मनसोक्त हसलास हं साईनाथा!

अरे देवा, तुला कृष्णावतारात गुरु कशाला पाहिजे होता रे,नि ते गुरुगृहीचे कष्ट सेवा. तसेच यावेळी तरी तू गुरुंचा गुरु परब्रम्ह असताना जव्हार अल्लीना गुरु करण्याची काय आवश्यकता सांग. पण नाही स्वत:चे ब्रम्हस्वरुप कोणाला समजू नये, खरेना? त्यांच्या बरोबर जाऊन तेथे कष्ट करुन दिवस काढलेस.

कृष्णस्वरुपात गुरु दक्षिणा म्हणून गुरुपत्नीने मेलेला मुलगा जिवंत करुन मागितला, तो दिलास. यावेळी ज्या बाईने आपल्यावर नि:स्वार्थ प्रेम केले, ते ऋण फेडण्यासाठी तिचा मुलगा तात्या पाटील याला स्वतः प्राणार्पण करुन तू जीवदान दिलेस, खरेना? असा खोट्या रागाने बघू नको,मी काय खोटे सांगत नाही. साईनाथा, तुझ्या लीला फारच और आहेत. अरे हो तूच दोन्ही जन्मात अशा कितीतरी गोष्टी कबूल कराव्या अशा आहेत.

सांगते ऐक,संत माझी सचेतन मूर्ती कृष्ण स्वये म्हणे भागवती तसेच मी अनादी आहे हे कृष्णाने अर्जुनाला सांगितले होते. तेच तुम्ही आम्हा भक्तांना सांगितलेत, खरेना?

तसेच तुमचे त्या तुमच्या गोकुळातल्या गोपाळांपेक्षा त्या लंगड्या पेंद्यावर फार प्रेम होते.त्याचा सहवास तुला हवा हवा वाटे. त्याचे लाड करत होतास आणि आता या वेळी हरी सिताराम दिक्षीत उर्फ लंगडाकाका याचेवर तुझे प्रेम होते.त्यांचे लाड पुरवलेस पटले का महाराजा आता तरी? त्यावेळचेच सारे.फक्त वेगळी रुपं घेतली. लीला त्याच, खोड्या त्याच. काय म्हणते मी, समजून न समजल्यासारखे करतोस हं.

कृष्णावतारात विश्वरुप दर्शन अर्जुनाला व येशोदेला करवलेस,तेच तू योवेळी कोणाला विठ्ठलाचे,कोणाला त्याच्या गुरुमाऊलीचे तर प्रयाग तीर्थाचे स्नानाची हौस भागवलीस.कधी कर्दन काळाचा अवतार तर कधी प्रेमस्वरुप माऊली अशी कितीतरी दर्शने कैक जणांना घडवलीस. साईनाथा कोणाचे मूल अग्नीत पडले, पालींची भेट, कोणाचे काय बसल्या जागेवरुन सांगत होतास,असा तू सर्वसाक्षी आहेस,ते लोकांना पटवलेस.

तुझ्या गोपाळांवर, गोकुळच्या लोकांवर तेथील पशु पक्षांवर आलेलं संकट,पाऊस वारा यांचे थैमान, गोवर्धन उचलून धरलास आणि त्या खाली सारे निर्भय झाले ना तसेच या तुझ्या अवतारात शिरडीवर त्या तुझ्या भक्तांवर आलेले संकट त्या पर्जन्यवृष्टीला, वायुराजाला नुसती आज्ञा केलीस, सारे भयभित झाले होते पण एका क्षणात सारे वातावरण बदलले आणि द्वारका माईच्या आश्रयात राहिलेले सारे आनंदाने तुझे गुणगान गात गात आपापल्या घरी गेले. असा तू निसर्गावर अधिकार दाखवून तुझे श्रेष्ठत्व पटवून दिलेस साईनाथा!

साईनाथा, तो गोकुळातला काला आठवतो का? सारे गोपाळ मिळून सर्वांची शिदोरी एका ठिकाणी करुन कसे मजेने खात असा ना! आता पण नैवेद्याची आलेली ताटे एका ठिकाणी केली जात होती. तसेच तू स्वत: निरनिराळ्या भाज्या,डाळ घालून मसाले भात करत होतास आणि तो सर्व जाती धर्माचे भक्त एका ठिकाणी बसून खात होते. आनंदाने, नि:संकोचपणाने त्यांच्यात रमलास, खायला घातलेस गरीब-श्रीमंत, भक्त-अभक्त असा कोणताच भेदभाव धरला नाहीस, खरेना?

आणि तू परमात्मा आहेस हे समजण्यासाठी त्या मसालेभाताच्या उकळत्या हंडीत हात घालून ढवळत असताना पाहून सारे भक्त थक्क होऊन जात.रे नाथा,तुझे सत्य स्वरुप कळे पण मायेने मोहीत जसे गोपाळांना केले होतेस तसेच तू या भक्तांना केले होतेस. यामुळे तुला ओळखून न ओळखल्या सारखे वागले गेले.

कृष्णा, तुलाच काय साऱ्या लोकांना कंसाने त्राही भगवान करुन सोडले होते. स्वत:च्या बहीणीला मेव्हण्याला सुद्धा तुरुंगात ठेवले होते. यातून तू तुझ्या बालवयातल्या पराक्रमाने सर्वांना सुखी केलेस. तसेच साईनाथा तुमच्या वेळी जातीय भेदाच्या तसेच अनाचाराच्या कंसाने सर्व ठिकाणी थैमान घातले होते. नाती गोती विसरले होते. स्वत:च्या सुखासाठी माणसे बेभान होऊन वागू लागली होती. त्यांना तू तुझ्या मायेने जवळ आणलेस.तुझ्या सहवासाने जाती धर्म भेदाचे वातावरण सुधारले. कृष्ण स्वरुपात दुष्ट वृत्तीच्या कंसाला मारलेस.आता तू जाती धर्म भेदाच्या,अनितीच्या रुपात वावरणाऱ्या कंसाला मारलेस आणि लोकांना सुखी केलेस. नाथा,किती किती सांगू रे तुझे गुण.

तू गुरुगृही असताना गुरुपत्नीने दिलेले चणे एकट्या सुदामाने खाल्ले ते ओळखून न ओळखल्यासारखे केलेस पण यावेळी मात्र साईनाथा,तुझा भक्त नाना यांना पाय दाबताना चणेच खाताना उपदेशामृत थट्टाविनोद करुन पाजलेस अशा नाना कला केल्यास बरे.

कसं सांगू तुला.अरे,अर्जुनाला गीता सांगितलीस व उद्धवाचा गर्व हरण करताना त्याला केलेला उपदेश यातले काय कमी आहेरे. तुझ्या चरित्रात, नाना तऱ्हेने लोकांचे गैरसमज, अज्ञान तू दूर केले आहेस. तुझे ते गोडपण,उपदेशपर बोलणे म्हणजे साक्षात गीताच उभी रहाते डोळ्यासमोर. अर्जुनाला गीता सांगून जगाला तू शिकवीलेस.आता सुद्धा असेच ज्ञानामृत पाजून लाखो लोकांचा तू उद्धार केलास.तुझा

प्रत्येक शब्द गीतेचाच अर्थ सांगतो बघ नाथा. पटले कारे माझे बोलणे? सांगना.

नको सांगू. मी तुला हो म्हणायला लावणार कारण मी लेक आहेना तुझी. किती वेळ अबोला धरशील? मी माझे बोबडे बोल बोलत रहाणार.

हे बघ साईनाथा, कंसाने मगरमस्त बैल पाठवला, त्याला कृष्णरुपात तू नम्र केलेस. आता या रुपात वाघ समोर आला मात्र पण लगेच तो तुझ्यापुढे नम्र झाला. नि जे कृष्णरुपात साधले नाही ते संत रुपात केलेस. कोणते काय अरे तुझ्या प्रेम भरल्या नजरेकडे पहाताच तो उध्दरुन गेला. म्हणून संतांचा महिमा गायला तर देव सुद्धा प्रसन्न होतात.

कृष्णरुपात पिंपळाच्या पानावर तुझे अस्तित्व दाखवतात तर यावेळी तू कुजक्या चिंध्यांनी ४ फुटी फळीवर झोपलेले कित्येकांनी पाहिले आहे आणि आश्चर्याने थक्क झालेत लोक. नाथा असा नुसता पाहू नको. पटले तर हो म्हण पण मी बोलते हे सारे खरे आहे हं!

कृष्ण व गोप यांच्यातला हंगामा तोच या साईरुपात तू केलास. कुस्त्या खेळणे, निरनिराळे खेळ, कसरती म्हणा, थट्टामस्करी करणे, खाणेपिणे एका ठिकाणी करणे.

कृष्ण रुपात द्वारका निर्माण केलीस. त्या द्वारकेत तुझे राज्य स्थापलेस पण शेवटी ती पाण्यात बुडविलीस. पण खरे सांगू ती बुडविलीस नी तुझे तुलाच वाईट वाटले. अरे ती टेवली असतीस तर तुझ्या चरण कमलाने पुनीत झालेली, तुझा पवित्र सहवास लाभलेली ती द्वारका असती तर नंतर घडलेले पापाचरण, देशात अशांतता पसरली ती पसरली नसती असे तुला वाटले असावे खास.

कां ग काय म्हणता? सांगते. तू प्रथम गोकुळात म्हणजे निंबवृक्षाखाली आपला वास केला होतास पण नंतर द्वारकेची आठवण आली. तिचे ते पवित्र्य लक्षात आले आणि आले की महाराज या जागेत. पाय ठेवला नी मारली हांक आणि काय आश्चर्य त्या पडीक जागेला पावित्र्याने नि भाग्याने घातला की वेढा. या पवित्र साईमुखातून 'द्वारकामाई' हाक आली आणि तिचा उद्धार झालाच आणि आम्हा बाल गोपालांचा पण तिच्या सहवासाने उद्धार झाला रे नाथा.

हे बघ ही द्वारकामाई अग्नीचे भक्ष होत होती, हे तरी आठवते का तुला? नि तू तुझा अधिकार त्या खांबावर मारुन अग्नीनारायणाला दाखवीलास आणि आमच्यासाठी ही पावित्र्याने पुरेपूर भरलेली द्वारकामाई तुझ्यामागे ठेवून दिलीस साईनाथा. त्या पवित्र द्वारकामाईत तुझे अस्तीत्व कायम आहे हे सर्वांना पटते.

हे बघ साईनाथा, ती कृष्णस्वरुपातली निस्वार्थ, निष्पाप प्रेम करणारी राधा संसारीच होती ना. फक्त तुझ्या भक्तीत रंगणे, तुझे लाड करणे हेच तिला माहीत.

आता तरी काय कमी लाड कौतुक केले तुझे. राधाकृष्णामाईने तुझी निस्वार्थ भक्ती केली. तुझ्यासाठी पुजेची आरतीची भांडी जमवली, उत्सवासाठी मोठ मोठी भांडी जेवणाची जमवली, सडासारवण नाना तऱ्हेची फुले पुजेला आणावी, उत्सवात सुंठवडा करावा अरे किती कौतुक करायची ती. खरेना? मग आता तरी कबूल करना मीच तो कृष्ण.

गीतेमध्ये नवविधा भक्ती कशी करावी याचे ज्ञान सांगितलेस, तेच तेच तू त्या सौदागराला नऊ लेंड्या पदरात घेतल्याचे वर्णन करुन जाणवून दिल.स भक्तांना.

कारे माझा अंत पहातोस.नुसता हसतोस,मान हलवतोस.तो तुझा हात फक्त स्थीर ठेवला आहेस माझ्या समोर. त्यानेच मला धीर येतो.

कृष्णलीला गोपी दळता, कांडताना, ताक करताना गात होत्या. तुझ्या पण लीला तुझ्या भक्तीने वेड्या झालेल्या स्त्रीया भक्ती भावाने गात असत, अजून गातात.

हे बघ कृष्णाचे ब्रम्हचर्याचे वर्णन पोथी पुस्तकात आहेना !अरे, तसेच तुझे ब्रम्हचर्य श्रेष्ठ आहे बरं. एकूण काय सांगू,तू तूच मागील कृष्णावतार आहेस. जसे जसे युगांतर होते तसे तसे तुझी रुपे घेण्याची पद्धत बदलते इतकेच हं!

नारद मुनी कृष्णलीला गात गात तिन्ही लोकात फिरत असत, खरेना? आता कसा शब्दात पकडला बघ तुला. अरे,दासगणू महाराज किर्तन करायला सजून नटून आले तेव्हा तूच त्यांना म्हणालास, नारदाची गादी चालवायची आहे तर हा सरंजाम उतरा हं. आणि त्याच दासगणूंनी तुमची स्तुती सुमने गावो गावी गाईली.

आता सांग बरे,त्या मुरलीधराच्या मंदिरात आपणच बसू,गप्पा गोष्टी सुखदु:ख बोलू हे कोणाचे शब्द, तुझेच नारे नाथा.

तुझा तो रंगपंचमीचा गोकुळातला सोहळा आठव, आठवलास ना? आता मी शिरडीतला सांगते. ते भाऊसाहेब धुमाळ, साठे, केळकर, बाळासाहेब देव (मामलेदार), गोपाळराव बुटी, शिरडीतले लोक,आलेले भक्तगण. रंगाचा खर्च बुटी करीत. पिंपे भरुन रंग तयार असायचा आणि तू टमरेल भरुन भरुन लोकांच्या अंगावर टाकीत असे. त्यावेळचा तो सोहळा पाहून साऱ्यांना वाटे आपण गोकुळातच आहोत आणि तू तर बेभान होऊन कृष्ण लीला करत असे. त्यामुळे साऱ्यांना अलोट अविट आनंद प्राप्त होई. सांगरे बाबा,आठवले ना सारे तुला.हस नुसता पण हो म्हणू नको बरं.

आता तुला पुराणातली तुझीच एक गोष्ट सांगते. अरे देवा तुझ्या किती लीला वर्णन करु. देवादिक, ज्ञानी ऋषी मुनी थकले तर मी पामराने काय वर्णावे तुझे कौतुक.पण तूच बुद्धी दिलीस म्हणून तुझ्याच कृपेने प्रयत्न करते साई.

ऐक हं.कृष्ण रुपात तू आणि अर्जुन एकमेकांचे जिवाभावाचे मित्र,खरेना? आता कशी कळी खुलली. पक्का लबाड आहेस. अर्जुन तेव्हढा तुझा लाडका, आम्ही भक्तांनी काय तुझे घोडे मारले रे.उलट त्याने तुला घोडे धुवायला, रथ चालवायला लावले, असो. पुढे ऐक,तुझ्या मित्राला तू गुह्यज्ञान सांगितलेस.त्याला गीता सांगता सांगता विश्वरुप दर्शन दिलेस. तो गांगरला, भयभीत झाला हे पाहून तुझे स्वरुप दर्शन दिलेस आणि त्याला धन्य केलेस. अशा तऱ्हेने त्याला ज्ञानी करुन भक्त बनवलेस. असेच तुम्ही एकदा गप्पा मारत असताना अर्जुनाने तुला प्रश्न केला,कायरे कृष्णा तुलाच सारे विश्वंभर का म्हणतात.

तू अगदी मनमोकळा हसलास आणि म्हणालास, तुला म्हणूया आजपासून विश्वंभर. अर्जुनाला बरे वाटले.

पुढे काही काळ लोटल्यावर एक दिवस तू म्हणालास,अर्जुना आज आपण ऋषी मुनींच्या दर्शनाला जाऊया. अर्जुन तर तुझ्या सहवासाचा भुकेलेलाच. लगेच दोघे निघाले. गप्पा गोष्टीत कधी घनघोर अरण्य आले कळलेच नाही.

इतक्यात एक भली मोठी गुहा दिसली.त्यात बरेचसे ऋषी मुनी ध्यानस्थ बसलेले होते. जवळच एक भला मोठा दगडी दिवा होता व त्यात वात जळत होती पण तेल संपण्याचे बेतात आले होते. एका ऋषींचे ध्यान विसर्जन झाले. त्याने दिव्याकडे पाहून, 'तेल संपत आले आहे, जो विश्वंभर असेल तो घालील तेल, आम्हाला काय जरुरी आहे व काळजी तरी कशाला?' इतके बोलून परत ते ध्यानस्थ झाले.

गुहेच्या बाहेर तू आणि अर्जुन उभे होता.तेव्हा तूच अर्जुनाला म्हणालास, 'अरे,तू विश्वंभर आहेस तेव्हा तेलाची व्यवस्था कर.' तेव्हा अर्जुन म्हणाला, 'येथे तर सारे जंगल, येथे तेल कोठून मिळणार? आणि नगरात जाऊन तेल आणीन म्हटले तर हा दिवा विझूनही जाईल.' तेव्हा तू त्याला म्हणालास, 'मला काही माहीत नाही, विश्वंभराने तेलाची व्यवस्था केलीच पाहिजे.'

अर्जुन तर विश्वंभरपद घेऊन बसलेला, पण हे वाक्य ऐकताच तो गोंधळून गेला. त्याला काही सुचेनासे झाले. बराच वेळ विचार केल्यानंतर अर्जुन तुला म्हणाला, 'देवा मला वाटले होते विश्वंभर म्हणून घेणे फार सोपे आहे. पण आता अनुभवाने कळले, विश्वंभर म्हणवून घेणे किती कठीण आहे. तेव्हा कृष्णा,तुझे विश्वंभरपद तुझे तूच सांभाळ व मला मोकळे कर.मला विश्वंभरपद नको,' असे म्हणून तुला शरण आला, खरेना? मग काय तुझ्या लीलेला अंतच नाही. तेथे या दिव्यातल्या तेलाची काय कथा. तू दिव्याकडे पाहिलेस मात्र, दिवा तेलाने संपूर्ण भरला गेला. याचीच पुनरावृत्ती साईनाथा तू केलीस. अरे,कशी काय विचारतोस?

सांगते, नीट लक्ष देऊन ऐक. वाणी हे अज्ञनाने गांजलेले अभिमानाने ताठलेले. त्यांच्या रुपाने तू अर्जुनाला जगापुढे उभे केलेस. सहजतेने रोज तेल मागू लागलास. लोकांनी तुला वेडा फकीर म्हटले. तुझे देवपण जाणले नाही. त्यामुळे त्यांचेकडून निंदा होऊ लागली. अर्थात पाप वाढू लागले. तुलाच दया आली आणि तू त्या अज्ञानी,मूढ लोकांकरिता पणत्यात पाणी भरलेस आणि दिवे लावलेस. तू ''पाण्याचे दिवे लावलेस'' हे लोकांनी पाहिले आणि त्यांच्या हृदयात प्रकाश पडला. ही वार्ता झपाट्याने सगळीकडे पसरली. जनता जनार्दन रुपी अर्जुन तुला मनोभावे शरण आले. नि तुझी किर्ती जगभर पसरली. असा आहेस तू कृष्ण स्वरुप साईनाथ.''कोई कहे राम कोई कहे शाम,साईराम साईशाम'' कसा मस्त हसून मान डोलवत आहेस.

कृष्णा तू द्वारकेतल्या अनाचारांना पाहून कंटाळलास नि एका अरण्यात जाऊन झाडाखाली बसलास. तुझा पायावर पाय ठेवलेला जणू काय हरिणच वाटून एका पारध्याने जो बाण मारला,तो तुझ्या अंगठ्यात घुसला नी तू व्याकूळ झालास. पारधी जवळ आला. त्याला हे पाहून फारच दुःख झाले.तो रडू लागला पण तू त्याला समजावलेस आणि स्वतः विश्वंभर असून विश्वात विलीन झालास, सारी द्वारका शोकाकुल झाली.

असेच तू साईनाथा वागलास. कसे ते सांगते ना, द्वारकामाईत तू होतास.तुला बरे नव्हते. जगाला भुलवण्यासाठी कारण हवे ना. तुझे भक्त तुझी सेवा करत होते. तू अन्नपाणी वर्ज्य केले होतेस. दुपारची वेळ....साऱ्या भक्तांना गोड बोलून जेवायला पाठविलेस. नऊ रुपये लक्ष्मीबाईना देण्यास सांगितलेस. लोकांना समजावे की, नवविधा भक्तीपैकी कोणती ना कोणती भक्ती करा नी जीवनाचे सार्थक करा.

आणि त्या बयाजी पाटील कोते यांच्या खांद्यावर मान टेकून आपली प्राणज्योत विश्वात विलीन केलीस आणि शिरडी शोकाकुल झाली.

आता सांग बरे यात मी काय खोटे सांगितले तें?

आणि दुसरे सांगते बघ, तुझा संबंध द्वारकाधिशाकडे नसता तर तू द्वारकामाई असे म्हटलेच नसतेस रे साईनाथा.

हे बघ रोज तू ३०० रु. वाटीत होतास.असे बारा वर्षात तू १२९६००० रुपये लोकांना पगार, दान धर्म, देणग्या, बक्षीसे असे आणखी किती तरी रुपये तू वाटलेस ते काय फकीर म्हणून? अरे लक्ष्मीकांता, ही लक्ष्मी काय उगाच तुझ्या पायाशी खेळत होती? पुरे झाले तुझे फसवणे आम्हा भक्तांना. आम्ही सुद्धा काही कच्च्या गुरुचे चेले नाहीत. आमचा गुरु शिरडीचा भोलानाथ साईश आहे बरे.

हं. आता कसे पटले नि मनमोकळा हसलास, गालगुच्चा घेतलास आणि डोक्यावरुन तो प्रेमळ हात फिरवलास नि म्हणालास, 'वेड्या पोरी, हो. मी तुमचा भगवान श्रीकृष्ण. तुम्हा भक्तांसाठी मानव रुप घेऊन आलो. तुम्हा भक्तांची भक्ती आणि तुमचे निस्सीम प्रेम पाहून तुमच्या पाठीशी सदा उभा राहीन बरे.

आकृष्यते आनन्यनेती इतिनाम कृष्णा

म्हणून म्हणते साईनाथा, आम्ही सतत तुझ्या नामांत चिंतनात राहावे हाच आशीर्वाद दे. तुझी कृपादृष्टी आम्हावर सदा राहो.

---

**चुकीची दुरुस्ती**

श्री साईलीला फेब्रुवारी १९८७च्या श्री साईबाबा बहार काव्य विशेषांकात पान क्रमांक २३ वर छापलेला 'बाबा बाबा साईबाबा' ही कविता प्रसिद्ध झाली आहे. त्याखाली सौ. शोभा देशपांडे, आगरकर नगर, पुणे असा नाव-पत्ता छापला गेला असून तो चुकीचा आहे. त्याऐवजी तिथे श्री. म.द. अधिकारी, कांदीवली असे हवे होते. केवळ नजरचुकीमुळे झालेल्या चुकीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

**— का. सं.**

# बाबांच्या प्रेमाची पहिली ज्योत

– श्री. चकोर रा. आजगांवकर
एम.ए.
(उप सचिव, शिक्षण खाते, महाराष्ट्र शासन)
आय् ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई–४०० ०५१.

तो १९४४चा वसंत ऋतू होता. माझ्या तारुण्य सुलभ प्रतिभेला कांत, कुसुमाग्रज यांच्या काव्याचा आणि सानेगुरुजींच्या करुणामय साम्यवादाचा स्पर्श झालेला होता. तो स्वातंत्र्योत्तर पहिल्या दशकाचा सोनेरी स्वप्नांचा आणि भाऊक आकांक्षाचा धूसर काल होता. प्रत्येक पावलावर मला कविता स्फुरत होती. साम्यवाद, मानवतावाद, विश्वकरुणा यांच्या ऊर्मी समाजातील समवयस्क राष्ट्रसेवादलातील मित्रमंडळीत उचंबळत होत्या.

अशावेळी मला डोक्याला शुभ्र फडके बांधणाऱ्या एका अवलियाची, म्हणजे साईबाबांची प्रतिमा राष्ट्रसेवादलातील एक मित्र चित्रकार अप्पा मुणगेकर यांच्या घरी दिसली. मूर्तिकाराच्या वडिलांनी आपल्या मूर्तिकलेने देशात आणि विदेशांत आपला लौकिक कमाविला होता. विशेषत: या मालवणच्या जुन्या कलाकाराने इंग्रजी भक्तांना साईबाबांच्या वास्तव आणि हुबेहूब प्लॅस्टर प्रतिमेने स्तंभित केलेले होते. मी अप्पा मुणगेकरांना विचारले की, "हे साधू कोण?" त्यांनी भावनोत्कट स्वरात हे साईबाबा असल्याचे सांगितले. मी यापूर्वी साईबाबांबद्दल काही ऐकले नसल्याने ती मूर्ती मला थोडी गंभीर व भयप्रद वाटली. त्या चित्राने आपल्या बोलक्या डोळ्यांनी मजकडे रोखून पाहिले. परंतु मला त्या करुणार्द्र दृष्टीचे थोडेफार भयच वाटले. त्याचे चरित्रकार्य, कार्य कोणते व त्यांनी कोणता लाभ जनतेला दिला, त्याचा त्याकाळी मला यत्किंचित बोध झाला नाही.

उलट अशा अवलियाचा हे वेडे अंधश्रद्धाळू उगाच भावनेने बडिवार मांडतात, असे मला त्यावेळी वाटले. माझ्या त्यावेळच्या १४ वर्षाच्या बालवयात मी कल्याण मासिके, विवेकानंद चरित्र यांचे वाचन आवडीने केले होते. मला योगसाधना व वेदांतमय ईश्वरविषयक भूमिका त्या काळात माझ्या मनोभूमिकेत रुजलेली होती. परंतु भजने, पूजाअर्चा, आरत्या, भक्ती इत्यादी सोपस्कार मला अंधश्रद्धेचे वेडेचार वाटत होते. अशा वातावरणापासून मी प्रयत्नपूर्वक दूर रहात होतो.

यापूर्वी वयाच्या ११/१२व्या वर्षी याच बाबांचे दर्शन मला कुडाळ येथील साधुपुरुष माडयेबुवा यांच्या स्थानावर घडले होते. त्यावेळीही फारच भयचकित झालो होतो. त्यानंतर जवळजवळ एक तपाचा काळ बघता बघता सरला व १९५५ साल उजाडले. मी ऐन पंचविशीत होतो.

माझ्या हातून राष्ट्रीय कविता, सांस्कृतिक काव्य लेखन घडत होते. "महाराष्ट्र जय" हे शाहीर साबळे यांच्या रेकॉर्डद्वारे अजरामर झालेले महाराष्ट्रगीत मी याच काळात रचले. माझ्या भावकविता वेगवेगळ्या मासिकातून प्रसिद्ध होत होत्या. माझ्या **"कौमुदी"** या काव्यसंग्रहाच्या प्रारंभी मी लिहिले होते :-

"पेटली प्राणातुनी जी दिव्य माझी अस्मिता
यौवनी उन्मेषुनी ती प्रीतीची हो आर्तता
राष्ट्रकार्यी रंगता मी दग्ध हो देहात्मता
जाहली स्वातंत्र्य यज्ञी वांछितांची सांगता"
काव्याविषयी माझे मन गुणगुणत होते :-
"छेडिते झंकार येथे शारदा वीणावती
चांदण्याची स्वप्नपुष्पे ढाळिते ज्योतिष्मती
अमृताचा पूर हा की कौमुदी ही हेमवंती?
दिव्यता ही – चारुता ही – धुंद की वाहे दिगंती"

या स्वप्नातून मला एके दिवशी एका मित्राने जाग आणली. ते म्हणाले, तुम्ही अस्पृश्यता निवारणाच्या विषयावरील सरकारी स्पर्धेत नाट्य लिहा. मला आत्मविश्वास नव्हता. काव्याप्रमाणे नाट्यलेखन मला जमेल असे वाटले नव्हते. शिवाय महाराष्ट्र शासनाची ही पहिलीच नाट्यलेखन स्पर्धा असल्याने दांडेकर, कुसुमाग्रज, शुक्ल, कमला फडके, इत्यादी मान्यवर या रणक्षेत्रात उतरले होते. मी भीतभीत माझ्या नाटकाच्या पाच प्रती समाज कल्याण संचालक, पुणे यांना पाठविल्या. या पाच प्रती करताना श्री. आचार्य या नावाचे शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयातील एका मित्राने बहुमोल मदत केली होती. ते शिरडी येथे बाबांच्या दर्शनाला जावयाचे होते. त्यांनी मला विचारले, "बाबांना काही सांगायचे आहे काय?" मी त्यांच्याकडील साईंच्या फोटोंकडे पाहिले. बाबांच्या डोळ्यांत चमक आणि हास्य होते. मला काही वेगळेच वाटले. थोड्याशा आर्त मृदुतेने मी म्हटले की, माझ्या नाटकाला बक्षीस मिळावे.

अर्थात् माझ्यासारखा नवोदित नाटककारास कोणतेही बक्षीस मिळणे हे शशशृंगासारखे अशक्य कोटीतले होते. मी तो प्रसंग विसरून गेलो. तेवढ्यात संतचरित्र लेखक श्री. कवडे यांचे बाबांचे चरित्र वाचून मन उचंबळून आले व बाबांबद्दल उत्सुकता वाटू लागली. परमेश्वराला जे करता येत नाही, ते संत नियतीचा कायदा आपल्या हाती घेऊन करू शकतात, याची थोडी श्रद्धा मनात तयार झाली. तो ऋणानुबंध हळूहळू फुलत गेला. बाबांची प्रतिमा दिसली की, मी थोडा मनाने आर्द्र होऊ लागलो.

आणि एके दिवशी ९ मे १९५५ हा दिवस उजाडला. माझ्या **"माणुसकीच्या जखम"** नाटकाला शासनाचे प्रथम पारितोषिक मिळाल्याचे मुंबईतील सर्व इंग्रजी, मराठी दैनिकांत ठळक शीर्षकात वृत्त प्रसिद्ध झाले. मी बाबांच्या प्रतिमेकडे पाहिले.

हृदय पाझरले होते. डोळे पाणावले होते. कुणीतरी सगुणातील ईश्वरशक्ति मजकडे मानवी करुणेने पहात होती, असा प्रत्यय आला. तो सगुण भक्तीच्या उदयाचा पहिला स्फुल्लिंग होता. आणि पुढे वाङ्मयात आणि साधना जीवनात पुष्कळ काही तेजस्वी घडावयाचे होते याची ती ग्वाही होती.

# साई-आई

– श्री. चंद्रकांत महादेव सरकाळे
म्हासूर्णे, ता. खटाव,
जि. सातारा.

तूं गाय मी वासरु । तूं माय मी लेकरु ॥
माझेंविषयी नको धरु । कठोरता मानसी ॥१३३॥

अनेक भक्तांची संकटातून मुक्तता करुन त्यांना परमेश्वर चिंतनाकडे प्रवृत्त करुन त्यांचेकडून सत्कार्य करुन घेण्याचे काम सावधतेने संतच करत असतात. संत हे संथपणे जगाला प्रेम देतात. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. शिर्डी या पवित्र भूमीत एका महान संताने वास्तव्य करुन त्या भूमीला पवित्र केले आहे.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवती परोपकारे ॥

सर्व संतांनी जड देहाने अवतार घेतले ते मुळी जनकल्याणासाठीच. एकही संत स्वार्थाभोवती लपेटलेला दिसत नाही. जो स्वार्थी असतो तो संत नसतोच मुळी. संत नेहमी परोपकार करत असतात. त्या परोपकारा पाठीमागे शुद्ध प्रेम ओतप्रोत भरलेले असते. आईप्रमाणे शाश्वत प्रेम करत असताना भेदभाव धरला जात नाही. परोपकाराचा अहंपणा दिसत नाही.

मात्र असे शाश्वत अमृत प्रेम घेण्यासाठी अनन्यभावे सद्‌गुरुमाऊलीला शरण जावे लागते. श्री साई म्हणतात–

शरण मज आला आणि वाया गेला ॥ दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

एकवेळ आपण सद्‌गुरुला शरण गेलो की ती आपली अनंतकाळची माऊली होते. आपल्यावरती भरघोस प्रेम करते. आपली रात्रंदिवस लहान बालकासारखी काळजी करते. पावलोपावली सत्‌विचार शक्ती देत असते. आपल्या किरकोळ बाबींकडे पूर्ण लक्ष देत असते.

सद्‌गुरु माऊली माझी कृपेची साऊली

साईमाऊली आपल्या जवळ असल्यानंतर कोणते मूल भितीने (संकटाने) गांगरुन जाईल? ते शक्यच नाही. लहान बालकाचा आपल्या आईवरती पूर्ण विश्वास असतो.



त्यास कोणतीच चिंता नसते. त्याप्रमाणे आपण साईमाऊलीवरती श्रद्धा (विश्वास) ठेवल्यास आपणास यमाची (मृत्यूची) भिती वाटण्याचे कारणच काय? इतर संकटे त्यामानाने क्षुल्लकच आहेत. आपण आपल्या साईमाऊलीवरती पूर्ण श्रद्धा ठेऊन नित्यव्यवहार करत असता मनामध्ये माऊलीचे स्मरण करत रहावे. कारण साई माऊली हीच आपली देवता आपल्यास सुख देणारी तिच आहे आणि दु:ख देणारीही तिच आहे. त्यामधील आपल्या पदरी सुखाचे माप टाकायचे का दु:खाचे टाकायचे हा सर्व अधिकार या सत्ताधीश माऊलीचा आहे.

आपण देहरुपी एस्.टी.मध्ये बसून मोक्षाचा प्रवास करीत आहोत. या एस्.टी.चा चालक हा साईनाथ आहे. त्या चालकावरती परिपूर्ण विश्वास ठेऊन प्रवास संपवावयाचा आहे. प्रवासामध्ये (जीवनाच्या) कसल्याही चिंतेला जागा द्यावयाची नाही. कारण आपली चिंता आपल्यास का? चिंता वाहणारी एवढी साईमाऊली असताना आपण चिंताग्रस्त होऊन चिंतेत जाण्याचे कारणच काय? असा जो साधक अखेरपर्यंत दु:खी दिसणारच नाही.

साई म्हणे तोचि झाला धन्य ॥ झाला जो अनन्य माझ्या पायी ॥

माझ्या साईमाऊली बद्दल लिहावे तेवढे अपूर्णच आहे. कारण धरतीची व समुद्राची खोली कोणी मोजू शकले नाही. आकाशाची उंची जाणू शकले नाही. हवेची व्यापकता जाणू शकले नाहीत. तसे साई प्रेम वर्णावयास शब्दच अपूरे पडतील.

तूच कर्ता आणि करविता शरण तुला साईनाथा ॥

शिर्डी येथील साईस्थान फारच जागृत आहे. मनामध्ये कोणतीही सद्‌भावना तिथे प्रकट केल्यास ती पूर्ण होत असते. प्रत्यक्ष साईमाऊलीच म्हणतात–

जरी हे शरीर गेलो मी टाकून ॥ तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
जो जो भजे मज जैशा जैशा भावे ॥ तैसा तैसा पावे मी ही त्यासी ॥

आपण या माऊली पासून कितीही दूर असलो तरी माऊलीचे स्मरण केले असता आपल्यासाठी प्रतिसाद देतात आणि धावून येतात. ते देहाने नसले तरी अंश रुपाने आपल्या भोवती वावरत असतात. उलट किरकोळ अडचणींसाठी माऊलीला त्रास दिल्याची खंत वाटत रहाते. परंतु अशा वेळी माऊलीशिवाय कुणाची आठवण येणार? साईमाऊलीच म्हणतात–

माझा जो जाहला काया वाचा मनी ॥ तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥

हा सदर लेख लिहिण्याचा माझा प्रयत्न म्हणजे सूर्याला उदबत्तीने ओवाळणे असाच आहे. परंतु सदरची सेवा साईमाऊलीने नव्हे कलियुगातील आईने आपल्या दप्तरी जमा करुन माझ्यासारख्या अनेकांना मातृप्रेम अखंड द्यावे. अशी मी मनोमन साईचरणी प्रार्थना करतो.

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**साईनंद**

शुक्रवार .१९-१-१९१२

आजचा हा दिवस वाईट होता. सकाळी मी लौकर उठलो, प्रार्थना आटोपली आणि मला नंतर असे आढळून आले की, उजाडायला अजून तासाभराचा अवधी आहे, म्हणून मी पुन्हा अंमळ लवंडलो ; काकड आरतीला मला बापूसाहेब जोगांनी उठविले. पहाटे चार वाजताचे सुमारास मेघा निधन पावल्याचे मला दिक्षित काकांनी सांगितले. काकड आरती झाली खरी पण साईमहाराजांनी आपले मुख मंडल नीटसे दाखविले नाही. इतकेच काय पण त्यांनी आपले नेत्र नीटसे उघडलेले आहेत, हे पण दाखविले नाही. त्यांनी आपली नजरही फारशी कुठेच फिरविली नाही.

आम्ही काकड आरतीहून परतल्यावर मेघाच्या अंत्यविधीच्या कार्यास लागलो. **त्यांचा पार्थिव देह बाहेर काढला नाही तोच साईबाबा तिथे आले आणि मोठमोठ्याने शोक प्रदर्शन करु लागले. त्यांचा तो शोक प्रदर्शक आवाज एवढा हृदयस्पर्शी होता की, तो ऐकून प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. गावाच्या मुख्य रस्त्याच्या वळणापर्यंत** त्यांच्या प्रेतयात्रेबरोबर बाबा आले, आणि मग ते आपल्या नेहमीच्या मार्गाने परत गेले. मेघाचा पार्थिव देह एका वट वृक्षाखाली ठेवला गेला आणि मग तिथे चिता रचून अग्नी दिला गेला. त्यांच्या दु:खाचे आर्तस्वर लांबूनही चांगलेच ऐकू येत होते. अखेरच्या क्षणाला निरोप म्हणून ते आपला हात हालवीत होते. जसे आरतीच्या वेळी ते हात हालवीत अगदी तसेच दिसत होते. कोरड्या इंधनाचा साठा भरपूर होता म्हणूनच की काय शवाला दिलेला अग्नी चांगलाच पेटला व ज्वालाही लौकरच उंचावल्या. मी, बापूसाहेब जोग, उपासनी, दादा केळकर आणि इथे तिथे असलेल्या साऱ्या साऱ्यांनी मेघाच्या कार्याची भरपूर स्तुती केली. त्याच्या देहाचे बाबांनी दर्शन घेतले, त्याच्या मस्तकाला, हृदयाला, खांद्याला आणि पायांना बाबांनी स्पर्श केला होता. मेघाचे सारे क्रिया कर्मांतर आटोपल्यावर आम्ही प्रार्थनेलाच बसणार होतो पण इतक्यातच बापूसाहेब जोग तिथे आल्याने मी त्यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. जेव्हा नंतर मी श्री साईबाबांच्या दर्शनास गेलो तेव्हा आजची दुपार मी कशी काय घालविली याबाबत त्यांनी विचारणा केली. मी ती बोलण्यात घालविली असे मोठ्या दु:खाने कबूल केले. हा मला त्यांनी दिलेला पाठ होता. तिनच दिवसापूर्वी बाबांनी त्याचे भविष्य सांगितले होते "ही मेघाची आजची शेवटचीच आरती. मेघाला सुद्धा आपण आपली सेवापूर्ती केल्याची जाणीव झाली. आपण आता जाणार. गुरुस्थानी आपण ज्यांना मानले ते साठेसुद्धा आपल्याला आता दिसणार नाहीत हे समजून चुकून त्याच्या डोळ्यात चटकन् अश्रू उभे राहिले. साईबाबांनी वळविण्यास सांगितलेली गुरे आता मोकाट सुटणार होती. त्याने आपली कोणतीच इच्छा कधीच प्रदर्शित केली नव्हती. जीवनभरच्या अतीव भाव भक्तीबद्दल आम्ही सारेच जण त्याचे कौतुक करीत होतो. मी

भक्तीभावाने प्रार्थना करण्याच्या ऐवजी निरर्थक गप्पा गोष्टी ऐकत बसल्याबद्दल मला स्वत:लाच वाईट वाटले. भीष्माला आणि माझा मुलगा बळवंत याला आज बरे वाटत नव्हते, म्हणून भजन झाले नाही. रात्री दिक्षित काकांनी रामायण वाचले. गुप्ते, त्यांचे बंधू आणि त्यांचे परिवार सकाळीच मुंबईला निघून गेले.

## श्रीसाईनाम स्मरण

साई तुझे नाम घेता । साई तुझे नाम ध्याता
उठता बसता शयनी पहुडता
नाम तुझे ते निरंतर घेता
हरुनि जाई व्यथा चिंता
साई तुझे नाम घेता । साई तुझे नाम ध्याता
गंध, पुष्पे, मानस पूजा
प्राणी मात्रा अंश तुझा
दर्शन देई साई माझा
साई तुझे नाम घेता । साई तुझे नाम ध्याता
दिव्य उदी लावी माथी
आधि व्याधी पळूनि जाती
संकटसमयी सूचना देती
साई तुझे नाम घेता । साई तुझे नाम ध्याता
आपत्काली धावूनि येशी
अनंत रुपे लीला दाविशी
अगाध तुझी माया ऐशी
साई तुझे नाम गाता । साई तुझे नाम ध्याता
निष्ठा, सबुरी भक्तिभावा
स्मरणात तुझ्या अखंड ठेवा
हिच प्रार्थना मम साईदेवा
साई तुझे नाम गाता । साई तुझे नाम ध्याता

**— श्रीमती पुष्पलता वसंतराव दाभोलकर**
सी/२३, कोकणनगर, माहिम,
मुंबई-४०० ०१६.

# श्री साईसमकालीन आमचे आजोबा

– श्री. शशीकांत अं. कुलकर्णी
शिरडी.

आमचे आजोबा कै. बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी यांचा जन्म १८९० मध्ये शिरडी मुक्कामी झाला. ज्यांचा उल्लेख साईचरित्रात, अध्याय ४३ मध्ये श्री साईबाबांनी देह ठेवल्यानंतर समाधी पूर्वी स्वप्नाद्वारे दृष्टांत देवून स्वतःची आरती ज्यांच्या हातून करुन घेतली असे थोर भक्त कै. लक्ष्मण मामा यांचा हा गुणी सुपूत्र. आजोबा दहा वर्षाचे असतानापासून श्री साईबाबांकडे जात असत. त्यामुळे त्यांना श्री साईबाबांचा खूप सहवास लाभला. श्री साईबाबांनी त्यांना त्या काळचे एक नाणे व ऊदी देवून 'अल्ला तेरा भला करेगा' असा आशीर्वाद दिला होता. म्हणूनच त्यांना ९७व्या वर्षापर्यंत चांगले आयुरारोग्य व सुखसंपदा लाभली.

आमचे आजोबा श्रीसाईबाबांचे अनेक अनुभव व चमत्कार आम्हास सांगत असत. त्यापैकी काही अनुभव व चमत्कार पुढीलप्रमाणे–

श्री साईबाबा हे अयोनी संभव होते. श्री साईबाबा ब्रह्मचारी, वैराग्यशील, अजाणबाहू, दैदिप्यमान, सुंदर, सतेज कांती असे सर्वज्ञ होते. या शिवाय ते अन्नदाते, दयाशील व योग सामर्थ्यवानही होते. म्हणून काही चिकित्सक लोक त्यांच्याकडे ब्रह्मज्ञान प्राप्तीसाठी येत असत. त्यापैकी दोन तपस्वी संन्यासी हिमालयातून बाबांकडे आले व त्यांनी विचारले की, "आप ब्रह्म जानते है तो ब्रह्म का स्वरुप कैसा है वह हमको तत्त्वज्ञान से समझा दो।" तेव्हा श्री साईबाबांनी २० रु. दक्षिणा मागून घेतली व नंतर सांगितले की, "दुनिया में अल्लाइलाही भरा है। दुनिया यह चिज परवर दिगार है। खुदा कर दे नजर तुमको हर सुरत में खुदाही नजर आये।" अशा प्रकारे बाबांनी ब्रह्मज्ञानाचे स्वरुप स्पष्ट केले.

एकदा श्री ज्ञानेश्वर महाराजांचे कट्टर भक्त पुण्याचे श्री. केशवराव देशमुख व त्याचे मित्र कोपरगावचे मामलेदार बाळासाहेब मिरीकर हे दोघे शिरडीस येऊन कौलारु धर्मशाळेत थांबले. श्री. मिरीकर बाबांचे दर्शनास द्वारकामाईत गेले. श्री. देशमुख धर्मशाळेतच थांबले कारण ते श्री. ज्ञानेश्वरांखेरीज कोणत्याही ईश्वरास किंवा संतास मानत नव्हते. त्यांना ताबडतोब पुण्यास जाण्याची घाई होती. परंतु श्री. मिरीकर बाबांजवळून येईनात म्हणून देशमुख स्वतः द्वारकामाईच्या बाहेरच्या दरवाजा जवळ जावून श्री. मिरीकरांना हाक मारु लागले. पण श्री. मिरीकरांचे लक्ष त्यांच्याकडे जाईना. श्री. देशमुख आणखी पुढे झाले. त्यांची व श्री साईबाबांची नजरा नजर झाली. पाहतात तो काय श्री साईबाबांच्या ठिकाणी साक्षात् श्री ज्ञानेश्वरांचे दर्शन श्री. देशमुखांना घडले. धावत जाऊन त्यांनी श्री साईंचे चरण पकडले आणि त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले– 'साई माझा ज्ञानेश्वर महाविष्णूचा अवतार'.

श्री साईचरित्रात वर्णन केल्याप्रमाणे दररोज द्रव्यदान (पैसे वाटणे), अन्नदान (हंडीत प्रसाद शिजवून वाटणे), कोणाला संतती व संपत्ती उदी-फळांच्या द्वारे देणे. अशा बाबांच्या संबंधीच्या अनेक घटना आजोबा आम्हाला सांगत असत.

शिर्डीत त्या काळात एकदा चाऱ्याच्या पन्नास गंजींना आग लागली. त्यावेळेस बाबांनी स्वतः आपल्या टमरेलमध्ये पाणी घेऊन गंजी भोवती प्रदक्षिणा मारताच आग त्वरीत विझली.

आमचे आजोबा श्री साईबाबांचे व विठ्ठलाचे निस्सिम भक्त होते. गेल्या २५ वर्षांत त्यांनी श्री साईबाबांच्याच आशीर्वादाने षडविकारांवर विजय मिळविला होता. त्यांचे शिर्डीतच विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर आहे. असे आमचे आजोबा, थोर साईभक्त दि. १२ मे १९८७, नरसिंह जयंतीच्या दिवशी अगदी सहजतेने श्री साईचरणी विलीन झाले. श्री साईईश्वर मृतात्म्यास शांती आणि सद्‌गती देवो.

## शब्द मला रे वदले

भक्ती भावनेची ओंजळीत लेवूनी ही फुले
साई मी तुझ्या मंदिरात रे आलो -------- ॥ धृ. ॥

तारितोस तू सदा भाविक भक्त गणांना
एकदा येऊनी दे शुभाशिर्वाद मम लेकरांना
प्रती गुरुवारी करेन मी तुझी उपासना
होईल पूर्ण मम हृदयाची मनोकामना
असे आज शब्द मला रे वदले
साई मी तुझ्या मंदिरात रे आलो --------- ॥ १ ॥

जगत् विधाता करूणाकरा अर्पितो मी तुला
नयनांचा नंदादिप करूनी भाव सुमनांची माला
विश्वात गर्जते आज तुझी अगाध लीला
तूच भक्तगणांचा पालनकर्ता शंभूनाथ भोला
असे आज शब्द मला रे वदले
साई मी तुझ्या मंदिरात रे आलो --------- ॥ २ ॥

— **कु. सुर्यकांत शंकर आंगणे**
ताडदेव बने कंपाऊंड,
मुंबई-३४.

# मनाची शांती

**कु. शुभांगी कुलकर्णी**
द्वारा श्री. जी. जे. कुलकर्णी
पोष्ट मास्तर, देगलूर,
ता. देगलूर, जि. नांदेड.

**शिरडीस ज्याचे लागतील पाय ॥**
**टळती अपाय सर्व त्याचे ॥**
**माझ्या समाधीची पायरी चढेल ॥**
**दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥"**

**"गुरुविन कोण दाखविल वाट?"**

या जीवनरुपी आयुष्याच्या पथात प्रत्येक माणसाला गुरु असतो. त्याचे मार्गदर्शन माणसाला मिळते. माणूस नेहमी त्याचा आदर्श बाळगतो. लहानपणी प्रत्येक बालकाला आपल्या आईवडिलांकडून मार्गदर्शन मिळते. पुढे तो विद्यार्थी बनतो आणि शाळेत त्याला योग्य मार्गदर्शन करणारा शिक्षकरुपात गुरु भेटतो. या गुरुद्वारे तो आध्यात्मिक जगाची ओळख करुन घेतो. पूर्वीच्या काळी जसे, 'राजा म्हणेल ती पूर्व दिशा,' असे प्रजा मानत असे, त्याच प्रमाणे सद्य काळात विद्यार्थी आपल्या गुरुचे ऐकतो. कारण त्याची बुद्धी प्रगल्भ झालेली नसते. परंतु जेव्हा त्याला खरा मानव म्हणून स्वतःला ओळखण्याची शक्ती येते, तेव्हाच या जगाचे अंतर्गत रुप त्याला दिसायला लागते. मग त्याला कळायला लागते की, मानवी जीवन हे अतिशय अवघड आहे आणि हे मानवी जीवन सोपे करण्यासाठी संतांची साथ आवश्यक आहे.

या जीवनरुपी तळ्यात बराचसा चिखल साचलेला आढळून येतो. जे लोक ह्या चिखलामधील माती काढून टाकण्याचा प्रयत्न करतात, अशांना इतर माणसे वेडे समजतात. याच वेड्या माणसांना पुढे पुढे संत म्हणून उपाधी देण्यात येते.

असे म्हणतात की, माणूस जेव्हा जन्म घेतो तेव्हा इतरांना हसवतो आणि जेव्हा त्याचा शेवट होतो तेव्हा स्वतः हसत इतरांना रडवतो. जन्म आणि मरण या दोन्हींतला जो कालावधी आहे, या काळात प्रत्येक दिवसातला प्रत्येक क्षण मानवाचा असतो. त्या कधी परत न येणाऱ्या अनमोल क्षणाचा त्या व्यक्तिने योग्य तो वापर केला पाहिजे. तरच जीवनाचे सार्थक झाले असे समजावे. जसे संत गोताखोर कठीण परिश्रम घेऊन समुद्राच्या तळाशी असलेले पांढरे शुभ्र मोती घेऊन येतो, ते मोती मिळविण्यासाठी त्याला खूप कष्ट घ्यावे लागतात. परंतु म्हणतात ना "प्रयत्नांती परमेश्वर," कठोर परिश्रम केल्यावर आणि अपार श्रद्धा असली म्हणजे साक्षात परमेश्वराला सुद्धा आपल्यासमोर उभे रहाणे भाग पडते. परंतु त्यासाठी व्यक्तिचे मन फार मोठे असावे

लागते. 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण', आणि हे मोठे मन बहुतेक करुन संतांचे असते. काम, क्रोध, लोभ, मोह यांचा त्या लोकांवर काहीच परिणाम होत नाही. ही माणसे ईश्वरी अंश समजली जातात.

या जीवनात कर्मयोगाची जशी गरज आहे, त्यापेक्षा जास्त भक्तीयोगाची आहे. आपल्या मनाला शांती मिळविण्यासाठी परमेश्वराचे त्यामागे फार मोठे रहस्य दडलेले आहे. या रहस्याचे गुढ आत्तापर्यंत तरी कुणाला उलगडलेले नाही. भक्तीमुळे मानवाला खरे समाधान मिळते. जेव्हा व्यक्तिकडे लक्ष्मी देवी (संपत्ती) वास करीत असते तेव्हा त्या व्यक्तिला भक्तिरसाला किंवा भक्तिदेवीची किंमत नसते. परंतु जेव्हा संकटाची चाहुल लागते तेव्हा परमेश्वराची आठवण येते. जर परमेश्वरावर आपली अपार श्रद्धा असेल तर कोणतेही कठीण काम पूर्ण होऊ शकते. परमेश्वर नसता तर या जीवनरुपी सागराचे पाणी अतिशय गढूळ झाले असते. ते पाणी स्वच्छ करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे परमेश्वराची भक्ती करणे. आणि म्हणूनच अथांग पसरलेल्या ह्या सागररुपी जीवनात अमृतरुपी देणगीचा आपण कशा प्रकारे वापर करावा याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे.

आजच्या युगात जागृत देवता म्हणजे श्री साईबाबा होत. त्यांना मनोभावे आपण शरण जावे, त्यांचे चिंतन, नामस्मरण करावे. दुसऱ्याने सांगितले म्हणून मी केले असे नको. 'मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव' हे उपयोगाचे नाही. आपली मनापासून श्रद्धा पाहिजे. आणि जे लोक साईबाबांना भावपूर्ण शरण जातात, त्यांना साईबाबा नेहमी मदत करतात.

"शरण मज आला आणि वाया गेला,
दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥"

ज्याप्रमाणे शिवाजी महाराज, कौरव पांडव यांनी आपले पूर्ण जीवन गुरुसेवेत किंवा गुरुआज्ञेत अर्पण केले, त्याप्रमाणे आपण सुद्धा श्री साईबाबांना गुरु मानूया आणि मनोभावे, चित्तभावे त्यांची सेवा करुया. यामुळे आपल्या मनाची शांती ढळणार नाही.

"माझा जो झाला कायावाचामनी ॥ तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥
साई म्हणे तोची झाला धन्य ॥ झाला जो अनन्य माझ्या पायी ॥

# देशभक्त संत पांचलेगांवकर महाराज

– सौ. सरोजिनी मुळ्ये
सरस्वती सदन,
नाथमंदिर कॉलनी, इंदूर.

**(राष्ट्रसंत धर्मभास्कर श्री संत पांचलेगांवकर महाराजांची पहिली पुण्यतिथी १६ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रभर साजरी होईल त्यानिमित्ताने त्यांच्या संबंधीचा हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.)**

विज्ञानवादी, हिंदुत्वाची शास्त्रीय मिमांसा समजवणारे हिंदी आणि मराठीचे प्रकांड पंडीत आणि ओजस्वी वक्ता. ढोंग, चमत्कार, मागासलेले अज्ञान तसेच रुढी नांवावर प्रहार करणारे, संत श्री पांचलेगांवकर महाराज मुंबई येथें गेल्या वर्षी निधन पावले. ते ८० वर्षांचे होते.

वासुदेव बळवंत फडके आणि नृसिंह सरस्वती यांच्या परंपरेचे दत्त संप्रदायाचे ते अधिकारी पुरुष होते. ते लहानपणीच घरांतून निघून गेले होते आणि पुन्या देशात हिंडत राहिले. त्यांनी भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास केला. ते जेव्हा कुराणाच्या भर



अस्सल नागावर बसलेले हे बाळ आज मध्यप्रदेश हायकोर्टाचे न्यायमूर्ती आहेत — श्री. पद्माकर दिनकर मुळ्ये.



लेखिकेच्या गळ्यात संत पाचलेगावकर महाराजांनी साप घातला होता तेव्हाचे चित्र.

सभेमध्ये बोलत असत तेव्हा बडे बडे मौलवी आश्चर्यचकित होत असत. ते कलकत्त्यात राहिले होते. तेथील सशस्त्र क्रांतीकारांबरोबर त्यांचे घनिष्ट संबंध होते. किती तरी वर्षे ते भूमीगत राहिले. निजाम सरकारांनी त्यांना राज्यात न येण्यासाठी

पायबंदी केली होती.

काही वर्षांनंतर पांचलेगांवकर महाराज, वीर सावरकरांचे मोठे बंधू बाबाराव सावरकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघ चालक डॉ. हेडगेवार यांना भेटले. वीर सावरकरांना ते रत्नागिरीत भेटले आणि त्या वर्षापासून त्यांनी, हिंदु संघटन, शुद्धि आणि सामाजिक चेतनेसाठी सर्वस्व अर्पण केले.

प्रसिद्ध मराठी साहित्यकार शिवरामपंत परांजपे यांच्या ''काळ'' नावाच्या वर्तमान पत्रातील अग्रलेख महाराजांनी मुखोद्‌गत केले होते. त्यामुळे त्यांच्या मराठी वक्तृत्वात अधिकच ओजस्वीपणा आला होता. गोव्यामध्ये युकॅरिस्ट इसाई जबरदस्तीने किंवा लालूच दाखवून धर्म परिवर्तन करीत होते. त्यांचा मुकाबला मसूरकर महाराज आणि पांचलेगांवकर महाराज यांनी केला. हजारों इसाई झालेल्या हिंदुंना त्यांनी पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा दिली.

वीर सावरकर रत्नागिरीहून मुंबईस आले आणि पांचलेगांवकर महाराज त्यांच्याशी एकमत झाले. १९४१ मध्ये सावरकर इंदूरला आले. त्याच्या आधी पांचलेगांवकर महाराजांनी मोहल्या मोहल्यांमधे प्रवचन करुन वातावरण तयार केले. त्यांनी आपले मुक्तेश्वर दल, जे क्रांतीकारकांचे संघटन होते, त्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघा मध्यें विलीनीकरण केले, आणि ते हिंदु संघटनांच्या कार्यास लागले. हिंदु समाजात व्याप्त रुढिवाद, अंधविश्वास आणि पुरोगामी विचार दूर करण्यासाठी त्यांनी अथक श्रम केले. त्यांनी ग्वालियरमध्ये हिंदु राष्ट्रसेवा स्थापित केली आणि ते त्याचे सर्वाधिकारी झाले. स्व. डॉ. परचुरे यांना त्यांनी ग्वालियरचे प्रमुख बनविले. अध्यात्म्याच्या बरोबर त्यांनी सर्पांच्या जीवनाचा गहन अभ्यास केला. हजारो विषारी साप आणि नाग त्यांनी पकडले होते. खामगावच्या मुक्तेश्वर मठात त्यांनी एक विशाल सर्पालय बनविले होते. भूतपूर्व राष्ट्रपती स्व. राजेंद्रप्रसाद यांना जेव्हा महाराज भेटण्यास गेले तेव्हा त्यांनी एक मोठा नाग राष्ट्रपतींच्या गळ्यात घातला.

महायुद्ध चालू होते आणि रेल्वेमध्ये गोरे शिपाई देशभर येत जात होते. गोरे अधिकारी प्रथम श्रेणीत प्रवास करीत होते. परंतु काळ्या लोकांना तिकीट असून सुद्धा डब्यात चढू दिले जात नव्हते. पांचलेगांवकर महाराज आपल्या तीन शिष्यांसहित, मुंबईला प्रथमश्रेणीच्या डब्यात चढू लागले. तेव्हा इंग्रज अधिकाऱ्याने, त्यांना असाच कोणी साधू समजून धक्का दिला, त्यांना डब्याचे बाहेर ढकलून दिले. महाराज फार नाराज झाले. शिष्यांनी प्रथम डब्याची कांच फोडली आणि महाराजांना आंत घुसविले. महाराजांनी जागेवर बसल्याबरोबर सापांच्या पेटाऱ्यांतून दोन नाग बाहेर काढले. ते डब्यात सोडून दिले. नाग पाहिल्याबरोबर इंग्रज अधिकारी घाबरले. इकडे तिकडे सैरावैरा पळू लागले. एक नाग जेव्हा इंग्रज अधिकाऱ्याच्या जोड्यावर चढू लागला तेव्हा इंग्रजाने महाराजांना हात जोडिले आणि माफी मागितली. लगेच त्यांनी महाराजांना बसावयाला व आराम करावयाला जागा करुन दिली. काही क्षणातच महाराजांनी नागांना पेटाऱ्यात बंद केले. मग त्यांना प्रवासात काही अडचण

झाली नाही. त्यांना अनेक भाषा उत्तम बोलता येत असत.

ते परम शिवभक्त होते. त्यांच्यापाशी शिवाजीची सुंदर पंचधातूची मूर्ती होती. ते शिवाजीची आरती करत असत आणि त्याच वेळी मानसिक व्याधींनी त्रस्त झालेल्या रोग्यांचा इलाजही करीत असत. त्यांचे म्हणणे असे की, ही सर्व विकृती आहे. भूत, जकिणी वगैरे काहीही नाही. हिंदुंचा हा बावळटपणा आणि अंधश्रद्धा कधी जाईल?

कांही वर्षे त्यांनी श्रमदान यज्ञाचे अनुष्ठान चालविले होते. त्यांचा डॉ. राजेंद्रप्रसाद, गुलजारीलाल नंदा, वीर सावरकर, आचार्य अत्रे, शिवराज पाटील, आर. के. पाटील इत्यादी लोकांशी घनिष्ट संबंध होता आणि ते महाराजांच्या कामाबद्दल खूप प्रभावित झाले होते. महाराजांचे हजारो शिष्य आहेत. ते जनजागृतीच्या कामाला लागलेले आहेत. महाराजांचा मुक्तेश्वर मठ, खामगांव मठ व मुलुंडचा मठ प्रसिद्ध आहेत.


असे हे संत पांचलेगांवकर महाराज १९२७ साली पुण्याला आमच्या वडिलांकडे त्यांना बोलाविले होते म्हणून आले होते. सबंध हॉलभर त्यांचे नागाचे व सर्पांचे पेटारे होते. ते प्राणी बाहेर काढत तेव्हा पाहण्यास मोठी मजा वाटत असे. महाराज जवळ असल्यामुळे भिती वाटत नसे. त्यांच्यावर श्रद्धा होती म्हणूनच. त्यांना काळ्या वस्त्रांचा तेव्हा फार तिटकारा होता. कोणी बायकां काळ्या साड्या नेसून आल्या तर ते भेटत नसत.

त्यांनी माझ्या गळ्यात १ साप घातला व म्हणाले,भिवूं नकोस, तो कांहींही करणार नाही. माझा भाचा उर्फ पुतण्या, कारण आम्ही दोघीं बहीणी एकाच घरात दिल्या गेल्या होतो. माझी बहीण तेव्हा तेथेच होती. तिचा मुलगा पद्माकर दिनकर मुळ्ये, हा १-१। वर्षांचा होता. आज तो मुलगा मध्यप्रदेश हायकोर्टमध्ये जज्ज आहे. महाराजांनी त्याला उचलून नागावर बसविले हे सोबतच्या फोटोवरुन कळेलच. माझ्या वडिलांनी दोघांचेही फोटो काढिले ते येथे प्रसिद्ध केले आहेत.

# श्री. विजय गव्हाणकर साईचरणी विलीन

श्रीसाईबाबा संस्थानचे एकावेळचे अध्यक्ष कै. डॉ. के.भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांचे सुपुत्र श्री. विजय (बाबा) यांचे शिर्डी मुक्कामी रविवार ता. २८ जून ८७ रोजी रात्री अचानक देहावसान झाले. निधनसमयी त्यांचे वय ४९ वर्षांचे होते.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.



# श्री सच्चिदानंद समर्थसद्‌गुरुसाईनाथ

— श्री. वसंत वामन प्रधान
श्री. गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग सोसायटी लि.,
बि. नं. २, ब्लॉक नं. १२,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१.

भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थान फार मोठे आहे. भगवान राम आणि कृष्ण यांना अनुक्रमे आपले गुरु वशिष्ठ व सांदिपनी यांचे संबंधी अत्यंत पूज्य भाव व नितांत आदर होता. ह्या महान व्यक्ती स्वत: परमेश्वरी अवतार व सर्व शक्तीमान असतानासुद्धा गुरुचरणी अत्यंत लीन होत्या. भगवान कृष्णांनी तर गुरुदक्षिणा म्हणून आपल्या गुरुचा त्यांच्या इच्छेनुसार श्री. सांदिपनींचा मृतपुत्र त्यांना जिवंत करून दिला. अर्वाचीन काळात श्री स्वामी विवेकानंदांचे गुरु भगवान रामकृष्ण परमहंस हे सुद्धा त्रिकालज्ञ अवतारी परमेश्वर स्वरुपच होते. श्री सच्चिदानंद समर्थ सद्‌गुरु साईनाथ महाराज हे भगवान कृष्ण व रामच. माझ्यामते श्री योगेश्वर कृष्णाचा आविष्कार श्रीसाईबाबांच्या ठिकाणी जास्त आढळतो. यात तुलनात्मक विचार नसून भगवंताने कृष्ण अवतारात जास्त व्यापक परमेश्वरी लीला दाखविल्या. श्रीसाईबाबांचे समाधी मंदिरातील मुरलीधराच्या गाभाऱ्यात देह विसर्जनाने वास्तव्य, आपण बालगोपाला सहीत याच ठिकाणी संवाद साधून सुखदु:खाच्या गोष्टी बोलत आनंदाने कालक्रमणा करू असे श्रीबाबांचे आश्वासन, श्रीकृष्णाची द्वारका म्हणजे रुपकात्मक श्रीबाबांनी स्थापन केलेली द्वारकामाई समाविष्ट असलेले तुलसीवृंदावन, पूर्वी होत असलेला गोपालकाला, अन्न संतर्पण, श्रीबाबा स्वत: हंडी शिजवून भक्तांना जेवू घालणे हे काही वर्षापूर्वी घडलेले देव दुर्लभ दृष्य गीतेचा अर्थ समजावून सांगणारे बालब्रह्मचारी श्रीसाईबाबा, राधाकृष्णबाईकडून रस्ते झाडण्याचे काम करुन घेणारे म्हणजे राधामाई कडून सारी मलीनता काढून घेणारे (या बाई अध्यात्मिक मार्गात अती उच्च पदावर पोहोचलेल्या होत्या). लाडका भक्तशामा, श्रीबाबांचा घोडा, श्यामकर्ण या सर्व नामकरणाने तो भक्त वत्सल 'देव' जरी रागावला तरी प्रेमाने पोटाशी धरणारा, सर्व अपराध पाठीशी घालणारा, आईच्या मायेने आपल्याकडे पाहणारा व भक्त उद्धराची अहर्निश चिंता वाहणारा देवाधीदेव सद्‌गुरुस्वरुपही धारण करीत आहे. ते प्रत्यक्ष लौकिक अर्थाने गुरु नसून अप्रत्यक्षपणे देव व सद्‌गुरु या दोन्ही भूमिकेत सारखेच दिसतात. अर्थात सद्‌गुरु व देव यांत फरक नाहीच. माझ्यामते, श्यामाला विष्णू सहस्रनामाचा पाठ श्रीबाबांनी देणे, श्री. नानासाहेब चांदोरकरांना गीतार्थ समजाविणे, श्री. साठ्यांना गुरुचरित्राचे पारायण करण्यास सांगणे, श्री देव मामलेदारांना ज्ञानेश्वरीची पोथी समजाविणे, श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या पत्नी सौ. खापर्डे यांना आई तू राजाराम नित्य म्हणत रहा त्यात तुझे कल्याण आहे असे म्हणणारे श्रीसाईबाबा

'सद्गुरुच'। माझ्या मावशीचे पती श्री. बेंद्रे यांनी श्रीसाईबाबांचेकडे मला मार्ग दाखवा असे म्हटल्यावर श्रीबाबांनी त्यांना एका निर्दीस्त व्यक्तीच्या श्वासावर लक्ष केंद्रित करावयास सांगून उमटणाऱ्या ध्वनीचा नामजप करावयास सांगितले, श्री. अण्णासाहेब दाभोळकरांना (श्री साईसत्चरित्र लेखक) श्री. शामाकडे जावून गप्पागोष्टी करण्यास व पंधरा रुपये दक्षिणा आणण्यास पाठविले, सदर घटनेत शामाचे पंधरा नमस्कार व देशमुखबाईंचे मंत्रोपदेश मागणे ही कथा व तिला केलेले मार्गदर्शन हे सर्व श्रीबाबांना पुन्हा कथन करणे व कथेचे तात्पर्य नीट ध्यानात ठेव असे श्रीबाबांचे आवर्जून सांगणे आणि खडीसाखरेचा प्रसाद देवून आयुष्याचा गोड शेवट करणे (श्रीसाईचरित्र लेखन पुरे होत असता त्याच चिंतनात देह विसर्जन होणे हे परमभाग्य हाच गोड शेवट) हेमाडपंतांना देशमुख बाईची गोष्ट नीट जीव लावून ध्यानात ठेव असे श्रीबाबा म्हणाले, यात माझ्या मते हेमाडपंतांना जगज्जननी आदीमाता श्रीसाईबाबा हेच सर्वस्व सर्व ज्ञान पसरविणारे सद्गुरु व सर्वेश्वर दिसले व त्यामुळेच श्रीबाबा ग्रंथ रुपाने प्रगट झाले. प्रस्तुत कथानक सारांश रुपाने जरा अवलोकन करु. बाईंना परंपरागत स्वरुपाचा कान मंत्र पाहिजे होता. त्यावर श्रीसाईबाबा म्हणाले, आई माझेच कान गुरुने फुकले नाहीत तर तुला मी कानमंत्र कसा देवू,तू फक्त अनन्यभावाने मजकडे पहा,सारा परमार्थ हाती येईल. 'तू मजकडे अनन्य पाही॥ पाहीन तुजकडे तैसाच मीही॥ माझ्या गुरुने अन्य काही॥ शिकविले नाहीच मजला गी॥ अ. १९/७३ केवल जे मूर्त ज्ञान॥ चैतन्य अथवा आनंदघन॥ तेंची माझे स्वरुप जाण॥ ते नित्य ध्यान करीगा॥ जरी न आतुडे ऐसे ध्यान॥ करी सगूण रुपानुसंधान॥ मनी नख शिखान्तमी सगूण॥ रात्रंदिन आणावा॥ ऐसे करिता माझे ध्यान वृत्ती होईल एकतान॥ ध्याता-ध्यान-ध्येयाचे भान॥ नष्ट होवून जाईल॥ एवं ही त्रिपुटी विलया जाता॥ ध्याता पावे चैतन्य घनता॥ हीच की ध्यानाची इतिकर्तव्यता॥ ब्रह्म समरसता पावसी॥ कासवी नदीचे ऐलकांठी॥ तिची पिल्लें पैलतटी॥ ना दूध ना ऊब – केवळ दृष्टी॥ देई पुष्टी बालका॥ पिलीया सदा आईचे ध्यान॥ नलगे काहीच करणे आन॥ नलगे दुग्ध ना चारा ना अन्न॥ माता निरीक्षण पोषण त्यां॥ हे जे निरीक्षण कूर्मदृष्टी। ही तो प्रत्यक्षअमृतवृष्टी॥ पिलीया लाधे स्वानंदपुष्टी॥ ऐक्यसृष्टी गुरुशिष्या॥ साईसतचरित्र, अध्याय १९,ओव्या १०७ ते ११३.

श्री हेमाडपंतांकरवी श्रीसाईसत चरित्र लेखनात श्रीसाईबाबा भक्ती, ज्ञान, वैराग्य, या साऱ्या रुपात प्रगट झाले आहेत. तरीसुद्धा आपल्याकरिता या गोष्टींच्या संदर्भात अनन्य चिंतन हा मार्ग सांगितला आहे.

श्रीसाईबाबांनी आत्मस्वरुपाचेही दर्शन घडविले आहे. परंतु ते सामान्य माणसाला शक्य होणार नाही. शरीर इंद्रिय आणि मन॥ बुद्धी ही नेणे करु आकलन॥ ऐसे जे आत्मस्वरुप गहन॥ तयाचे दर्शन गुरु कृपे॥ ३२।११०

श्रीसाईबाबा आपल्या गुरुचा नामोल्लेख न करिता म्हणतात– एका विहिरीत माझ्या दोन्ही पायाला दोर बांधून विहिरीच्या काठावर असलेल्या एका झाडाला मला

बांधून मला पाण्याच्या वर उलटे लोंबकळत सोडले. अशा बेताने की मी विहिरीत न बुडता व तोंडात पाणी न जाता राहिलो. दहा बारा घटका त्या अवस्थेत राहिलो. त्यानंतर गुरु आले व मला त्यांनी बाहेर काढले. बाहेर काढल्यानंतर मला गुरुने विचारले, कसे वाटले. तर श्रीबाबांनी म्हटले मी फार आनंदात होतो. ती स्थिती अवर्णनीय आहे. ही श्रीसाईबाबांची आत्मसाक्षात्काराची कथा. ते स्वतःच सद्गुरु स्वरुपात असल्याचे दाखवितात.ही एक त्यांचीच रुपक कथा आहे. सद्गुरु मोक्षदाता आहे म्हणूनच सद्गुरु व परमेश्वर यात भेद नाही. श्रीसाईबाबा आपले मातापिता, देवाधिदेव, व सद्गुरुचे स्वरुपात आहेत. करिता गुरु स्वरुपध्यान॥ कुंठीत होय बुद्धिमन॥ म्हणोनी शेवटी करावे नमन॥ निःशब्द मौन धरोनिया॥ अ. ३२/८२.

# नित्य नेमे स्मरा बाबासाई

चला चला हो शिरडीला जाऊ- डोळा भरूनी बाबांना पाहू
सांई चरणावरी लीन होवूंऽऽ ...॥ धृ॥

भल्या पहाटे काकड आरती- झाल्या मंगल स्नानावरती
भक्त करिती अर्चन- बाबा देती दर्शन
जवळ घेवूनी अपुल्या भक्तांनाऽऽ ...॥ १॥

भोळी भाबडी मशिद माई- अपुल्या भक्तांच्या हृदयाचे ठायी
शिवशंभू दशी अग्नीकुंडातुनी
धरा विश्वास उदीचे ठायीऽऽ ...॥ २॥

झाली महाप्रसादाची वेळ- हजार भक्तांच्या पंगतीचा मेळ
करून धुपारती- भक्त येतीक्षिती
अपुल्या शिवसाई दर्शनालाऽऽ- ...॥ ३॥

लेंडीबागेत जावूनी येती- नंदा दिपाचे दर्शन घेती
दत्ता पाया पडून- साई रूपे स्मरुण
फिरून येवूं श्री साई दर्शनालाऽऽ ...॥ ४॥

रामचंद्र सांगे भक्तासाई- नित्य नेमे स्मरा बाबासाई
होतील थोडे कष्ट- जातील समुळ दुःख
दृढ श्रद्धा असो श्री साई चरणीऽऽ ...॥ ५॥

— श्री. राम धनावडे
१३५/३९७३, सुखशांती,
कन्नमवार नगर क्र. २,
विक्रोळी (पूर्व),
मुंबई-४०० ०८३.

# श्रीसद्‌गुरुबाबांना काय द्यावे?

– सौ. उषा अधिकारी
बंदररोड, रत्नागिरी.

पूर्वी देव आणि दानव यांचे आपसात वैर असे. दुष्ट दानव उन्मत्त होऊन देवांना फार त्रास देत असत. काही वेळा असे बिकट प्रसंग येत की, देवांनाही आपल्या गुरुकडे धाव घ्यावी लागे. देवांचे गुरु होते बृहस्पति. ते देवांना योग्य तो सल्ला देत असत. गुरुचे माहात्म्य देवांहूनही श्रेष्ठ आहे. भगवान शंकराला तर गुरुचे गुरु म्हटले आहे. पुराणामध्ये थोर अशा गुरु-शिष्यांच्या अनेक कथा प्रस्तुत आहेत. गुरुंचे शिष्यावरील अकृत्रिम प्रेम व शिष्यांची गुरुवरील अनन्य, अढळ निष्ठा यांचे त्यात बहारदार वर्णन आहे. श्रीदत्तात्रेयाने पशु-पक्षी, प्राणी, मानव हा भेद भाव न करता २४ गुरु केलेत. श्रीरामाचे गुरु वसिष्ठ मुनी तर श्रीकृष्णाचे सांदिपनी गुरु कल्याण व उद्धव या उत्तम शिष्यांचे गुरु होते रामदास. रामदासांच्या पूर्ण कसोटीला उतरलेले हे जसे दोन शिष्य होते, तसेच शिवराय हेही त्यांच्या परिक्षेला उतरलेले एक थोर शिष्य होते. क्षणाचाही विचार न करता अनेक आपत्तींशी झगडून मिळवलेल्या स्वराज्याचे [illegible]न त्यांनी रामदासस्वामींना केले होते. त्यांचे गुरु रामदास हे परिपूर्ण, निग्रही, निस्पृह. त्यांनी ते दान तर स्वीकारले नाहीच पण आपल्या शिष्याची पात्रता ओळखून त्यांना अनेक शुभाशीर्वाद दिले.

प्रत्येक मनुष्य प्राण्याला गुरु करावाच लागतो. साध्या संसारातसुद्धा मार्गदर्शकाची जरुरी असतेच. मग अध्यात्म मार्गाचा सोपान चढावयाला सद्‌गुरु आवश्यकच आहे. पण तो करताना त्याची नीट पारख करुनच केला पाहिजे. श्रीसाईसच्चरितकार श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचा गुरुवर मुळीच विश्वास नव्हता. 'स्वकर्तबगारीने पुढे यावे, गुरुची आवश्यकताच काय' असे ते म्हणत. गुरुच्या आवश्यकतेबद्दल त्यांचा श्री. बाळासाहेब भाट्यांशी वादही झाला होता. पण शेवटी त्यांना श्रीबाबांचे दर्शन झाले तेव्हा कल्पनेपेक्षा आपण अधिक पाहिले आणि त्यामुळे आपल्याला अगदी समाधान वाटले असे त्यांनी खुषीने कबूल करुन श्रीसाईबाबांना गुरुस्थानी मानले आणि त्यामुळेच श्रीबाबांवर अकृत्रिम प्रेम करुन निष्ठा बाळगून त्यांनी असा कृपाशीर्वाद मिळवला की, जगातला सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांचे हातून लिहून झाला. श्रीबाबांना अनेक वकील, डॉक्टर्स, सॉलिसिटर्स, शिक्षक, धनिक लोक यांनी गुरुस्थानी मानले पण श्रीबाबांनी स्वतःकडे नेहमीच कमीपणा घेतला आहे. ते म्हणत, "तुम्ही माझे नाव घ्या अगर घेऊ नका. मी मात्र तुमच्या नावाची अखंड घोकणी करतो. मी तुमच्या विष्ठे पोटीचा किडा आहे. तुम्ही मला परमेश्वर, अल्ला मानता पण मी तो नाही. मी त्याचा बंदा, सेवक मात्र आहे. माझाही एक गुरु होता. आज तो नाही. त्याने माझ्यावर खूप प्रेम केले. कासवीच्या दृष्टीने त्याने माझ्याकडे पाहिले. मीही त्यांची अपरंपार सेवा केली.

भूक, तहान विसरुन मी माझ्या गुरुकडे अखंड पाहत राही. पहाता पहाता मला प्रेमाचा गहिवर येई. माझे गुरु मला प्रेमदृष्टीने न्हाऊ घालत. त्या प्रेमाचे वर्णन मी कसे करु? तुम्ही सर्वजण माझ्यावर रुसता. माझे व्यंकुशा आज असते तर मी त्यांच्यावर रुसलो असतो. आता रुसायला मला स्थानच नाही. माझ्या गुरुने माझी अनेक प्रकारे परीक्षा घेतली व शेवटी मी त्यांच्या परिक्षेत उतरताच दोन पैसे दक्षिणा मागितलो. श्रद्धा आणि सबुरी हे दोन पैसे मी लगेच त्यांना देऊन टाकले''.

श्रीबाबा स्वतःच परब्रह्मस्वरूप असल्याने, पूर्ण निग्रही, बालब्रह्मचारी आणि जन्मतःच सर्व विद्यांनी परिपूर्ण असल्याने त्यांनी ते लगेच देऊन टाकले. आपण भक्त ते तातडीने देऊ शकतो का, याचा विचार केला पाहिजे. श्रीबाबा नानांना म्हणाले, ''बनता बनता बनेल''. एकेका भक्ताला उद्देशून बोललेले त्यांचे अमृतमय बोल आपण ध्यानात घेऊन आपण जर वागलो, तर ते आपणालाही देता येतील. पण ते देण्यापूर्वी आपण काय देऊ शकतो? श्रीबाबांनी सांगितलेल्या गोष्टींपैकी आपण थोड्याफार गोष्टी जरी आचरणात आपल्या तरी त्या त्यांना नक्की पोचतील. श्रीबाबा म्हणतात, ''अरे, जनसेवा हीच प्रभुसेवा आहे. प्रभू काय मूर्तीतच आहे? तो सर्वांतर्यामी भरलेला आहे. तेव्हा प्रत्येक व्यक्ती पशु-पक्षी व इतर प्राणीमात्र हे त्याचेच रूप मानून त्याप्रमाणे वागा. गरिबांना जमेल तशी मदत करा. अनाथ स्त्रीच्या बाळंतपणाला मदत करा. घरोघरी माधुकरी मागून जे विद्यार्जन करतात, अशा माधुकऱ्यांना मदत करा. अनाथ अपंग दीन दुबळ्यांसाठी चालवलेल्या संस्थांना मदत करा, भुकेलेल्याला अन्न व तहानलेल्या पाणी द्या. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मुक्या प्राण्यावरही प्रेम करून त्यांना अन्नपाणी द्या. अनाथांना निवारा द्या. अनाथ, पंगु, रोगग्रस्त, पोरकी मुले यांच्याकरिता काही करता आले तर करा. विद्वानांची योग्य संभावना करा. हातात सत्ता असेल तर तिचा दुरुपयोग करू नका. लाचलुचपत घेऊ नका. आपल्यावर जबाबदारीचे काम टाकले असेल, तर जबाबदारी ओळखून ते नीटपणे करा. फाजील पोषाख करून अहंभाव दाखवू नका. उच्चनीचता पाहू नका. गरिबांना वस्त्रदानही करा. कुणाला हडहड करू नका. साधुसंतांचा मान राखा. कुणाचाही छळ करू नका. खूप फळभाराने वृक्ष जसे लीन होतात, तसे श्रीमंती आली तर लीन व्हा. सर्वांवर प्रेम करा. आपण सर्व एक आहोत, ही भावना ठेवा. असे तुम्ही सर्व परिपूर्ण झालात की, मद्रूपच होणार आहात. नुसती पूजा अर्चा करणे, गंध पुष्पे वाहाणे, उत्तमोत्तम वस्त्रे अर्पण करणे, पंचपक्वानांचा नैवेद्य दाखवणे याने परमेश्वर प्रसन्न होत नाही. त्यासाठी अनन्यनिष्ठा, निष्काम भक्ती सत्शील आचरण आणि प्रेमाची वागणूक हवी.''

श्रीसाईबाबांचे स्वमुखातून आलेले बोल आहेत हे. हे त्यांनी प्रवचन करुन, कीर्तन करून प्रकट केलेले नाही. भक्तांशी प्रेमालाप करता करता ते सहज बोलून गेले आहेत. हे सद्‌गुरुघरचे गारुड आहे. हे ज्यांना ऐकायला, पहायला याचि देही याची डोळा मिळाले, ते भाग्यवान भक्त. आपण ते वाचून, ऐकून त्याप्रमाणे वागलो तर ती एक प्रकारची मूल्यवान दक्षिणाच ठरेल. आपण श्रीबाबांचे साधेसुधे, भोळेभाळे भक्त

आहोत. जे श्रीबाबांना जे हवे आहे ते द्यायचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे हे प्रत्येक भक्ताचे काम आहे. खरा भक्त ते करीलच करील. खरा भक्त श्रीबाबांना हृदयसिंहासनावर बसवण्याची पराकाष्ठा करील आणि ते करता करता म्हणेल–

**बाबा तुमचे शब्द यावे आचरणी**
**तुमच्या पवित्र नामाची मी ओढीन स्मरणी ।**
**दाखवीन माझी सत्त्वशील करणी**
**मग मिळेल मग ठाव तुमचे मंगल चरणी ॥**

# विधाता-साई

असू दे आमच्यावर अवधान
हे प्रभु दयाघन सुखनिधान
'भक्ताचिया रक्षणा खचित धावेन'
जावो न कदापि व्यर्थ तव विधान -१-

आम्ही क्षुद्र आम्ही सामान्य
साई तूच एकला देवासम मान्य
तुजप्रत आलो विनीत शरण
न मरणभय, विश्वासता मन -२-

असावे मनी नित्य समाधान
भ्रम नसावे चित्ता दुसरे नादान
नश्वर सुखांचे नकोच वरदान
वासनादमन, निरामय जीवन -३-

आनंदघन मिळावे साईवंदन
तुझ्या दर्शनास प्रार्थना साधन
चंचल मनाचे संपावे आकर्षण
छत्र बने मग खुले वितान -४-

साई, साधी भोळी भक्ती मान
तू पिता आमचा आम्ही तुझे संतान
निष्ठावान भक्तांतच साई तुझी शान
साईश्वरा, घडव चमत्कार-दर्शन -५-

**— श्री. बाबू फिलीप डिसोजा**
कॅनरा बँक, डॉ. परमार बिल्डींग,
लोणावळा-४१० ४०१.

**बालसाईभक्तांसाठी**

# साईबाबांचा अवतार

– कु. संतोष अनंत राणे
मु. पो. मुटाट, मोहूळवाडी,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग–४१६ ८०३.

या पृथ्वीतलावर परमेश्वराने खूप अवतार घेतले. परमेश्वर अवतार घेण्यामागे काहीतरी कारण असावे लागते. ती कारणे ओळखूनच परमेश्वर निरनिराळी रूपे धारण करतो.

जसे शेगावचे गजानन महाराज, अक्कलकोटचे अक्कलकोट स्वामी, कणकवलीचे भालचंद्र महाराज, त्याचप्रमाणे शिरडीचे साईनाथ महाराज.

साईबाबा हे हिंदू वा मुसलमानही नव्हते. त्याचप्रमाणे त्यांचा इतर कोणताही धर्म नव्हता. बाबांचा धर्म एकच होता, तो धर्म म्हणजेच बाबा परमेश्वर होते.

कलीयुगातील माणूस नास्तिक होऊन, वाईट कर्माकडे जात आहे. एवढा चांगला मनुष्य देह त्याला देवाने दिला आहे. त्या देहाचा तो काहीच सदुपयोग करत नाही.

हा देह या मनुष्याला खूप पुण्याईने मिळाला आहे. तो पुन्हा कधीच मिळणार नाही. ह्या जन्माचे काहीतरी सार्थक व्हावे. ह्या जन्मात आलेली संधी पुन्हा कधीच येणार नाही. एकदा मनुष्य जन्म गेला की तो गेलाच.

म्हणूनच मनुष्यदेह असताना नास्तिक होऊन, वाईट कर्माकडे न जाता, तो आस्तिक होऊन सत्कर्माकडे वळला पाहिजे. तो कोणत्याही धर्मातील असो. त्यात भेदभाव नाही. सर्व एकाच देवाची लेकरे.

त्याचप्रमाणे धर्मांधर्मांतील चालू असलेले वादविवाद टाळून, सर्व धर्मांनी एकमेकांशी एकमताने वागावे, एकमेकांस सहाय्य करावे, एकमेकांस समजावून घ्यावे.

स्वधर्माबद्दल गर्व करून, दुसऱ्या धर्माची निंदा, कमीपणा करू नये.

कोणत्याही मनुष्याने आपला सुखाचा संसार संभाळून, आपल्याला आवडत असलेल्या कोणत्याही देवतेची उपासना, भक्ती वा नामस्मरण करावे.

गरिबांवर दया करा, प्राणीमात्रांवरही दया करा, भुकेलेल्यांना अन्न द्या, लज्जा रक्षणासाठी गरजूंना स्वतःची वस्त्रे अर्पण करा. त्याचप्रमाणे निवाऱ्याची सोय नसलेल्यांना स्वतःच्या घरात किंवा झोपडीत निवाऱ्याची सोय करून द्या.

स्वतःचा देह स्वकल्याणासाठी न कष्टवता, तो जगाच्या कल्याणासाठी कष्टवा. अशा वर्तनाने मनुष्य जन्माचे सार्थक होईल आणि परमेश्वर प्रसन्न होईल. अशी भक्ती पाहून प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या भक्ताच्यां घरी राबतो आणि राबलाही आहे.

अशा तऱ्हेने सर्व धर्मांना एकाचवेळी हा हिताचा उपदेश करण्यासाठी साईबाबांनी अवतार घेतला.

त्या साईमाऊलीला माझे कोटि कोटि प्रणाम।

# नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य.........

**– श्री. मनमोहन चांदोरकर**
छायाचित्रकार
'पर्णकुटी', न्यू नगरदास रोड,
पिंकी चित्रपटगृहासमोर,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.

सोमवार दि. ११ मे १९८७ ला काही कामानिमित्त मी पुण्याला गेलो होतो. तेथून १२ मे ला नाशिकला जायचे होते. पुण्यास ठरविले की, शिर्डीला बाबांच्या दर्शनास जाऊ! म्हणून शिवाजीनगर एस्. टी. स्थानकावर आलो. १२॥ च्या दुपारच्या पुणे–शिरडी बससाठी रांगेत उभा राहिलो. पण तेथे कळले की, दोन दिवसांच्या सर्व तिकीटांचे आगाऊ आरक्षण झालेले आहे. आता काय करावे? परंतु इच्छा प्रबळ असली की मार्ग दिसतो ना! सहज डेपोत फिरत असताना पुणे–अमळनेर बस दिसली. एस्. टी. कर्मचाऱ्याने सांगितले की, ही ६॥ ची सकाळची बस. पण ब्रेकडाऊनमुळे जवळजवळ ५॥ तास उशीरा सुटत आहे. कंडक्टरला विचारले. त्याने, आता बस सुटायला आली आहे, बसा, असे म्हणताच, मी बसलो. बसमध्ये गर्दीही नव्हती. आम्ही केवळ १५-२० प्रवासीच होतो. बस चाकण, राजगुरु नगर, भोसरी मार्गे नारायणगावाला आली. निरनिराळ्या स्थानकावर माणसे चढत होती, उतरत होती. मला हा मार्ग नवीन होता. नारायणगावाला चहासाठी उतरत असताना कंडक्टर म्हणाला, साहेब, एकतर बस ५॥ तास उशिरा आहे, तुम्ही आता आळेफाट्यावरच जा. मी बरं म्हटले. एका तासा नंतर आळेफाटा आल्यावर चहा व नाश्ता केला. बाहेर येऊन पहातो तो काय बस तर निघून गेलेली. त्यात तो मार्ग मला अनोळखी व नवखा. काय करायचे हा गहन प्रश्न माझ्या समोर उभा राहिला. तेवढ्यात एक जीप संथ गतीने जात असल्याचे मी पाहिले. मी त्यांना माझी सारी बिकट परिस्थिती कथन केली. ते म्हणाले, जीप ४० कि. मी. च्या वर वेगाने जात नाही, पण बसा. जशी नेईल तसे जाऊ. बॅगेत जवळजवळ ७००-८०० रु., सामान व श्री. रणजित देसाई यांची 'श्रीमान योगी'ही कादंबरी होती. मला काहीच सुचेनासे झाले होते.

जीप निघाली. १५-२० मिनिटांनंतर पुढे एक टपालाची बस दिसली. ती तळेगाव–संगमनेर होती. त्या बसमध्ये बसलो. ड्रायव्हरला सगळी परिस्थिती समजावून सांगितली. पण ती टपालाची बस असल्यामुळे लहान लहान गावे घेत ३। च्या सुमारास संगमनेर येथे आली. तेथे कळले की, अंमळनेर बस सुटून १५ मिनिटे झाली होती.

संगमनेरचे कंट्रोलर श्री. पंडित यांना भेटलो. त्यांना सर्व सांगताच, त्यांनी शिर्डीला दूरध्वनी करायचे कबुल केले व ३॥ च्या संगमनेर–कोपरगाव बसमध्ये बसावयास

सांगितले. बस मध्ये उभं रहाण्या इतपतच जागा होती. बस सुटावयाच्या वेळी हे गृहस्थ स्वत: धावत मजकडे आले व मला म्हणाले, चांदोरकर, शिर्डीला दूरध्वनी लागलेला आहे. शिर्डीस कंट्रोलरला भेटा. बॅग काढून ठेवायला सांगितले आहे. ६॥ वाजता संध्याकाळी शिर्डीस पोहोचलो. शिर्डीचे कंट्रोलर श्री. लंके यांनी ती बॅग मिळविण्यात यश संपादिले होते. म्हणजे जवळ जवळ १ वाजल्यापासून ६॥ वाजेपर्यंत बॅग मजकडे नव्हती. मिळाल्याचा आनंद अवर्णनीय होता. अर्थात मिळेपर्यंत बाबांचा धावा सारखा चालू होता.

बाबांच्या आशीर्वादाने व सर्वश्री पंडीत, लंके ह्यांच्या साहाय्यामुळे मला माझी बॅग होती त्या स्थितीत परत मिळाली. ही पुण्याई माझे चुलत आजोबा (नानासाहेब चांदोरकर), जे बाबांच्या बरोबर होते व माझे वडील, जे १९३५ पासून शिर्डीस जात असत, यांच्यामुळे लाभली. मी देखील आतापर्यंत कित्येकदा शिर्डीस जाऊन आलो आहे. बाबांची कृपादृष्टी आम्हांवर आहे, तशीच अन्य साईभक्तांवरही ती राहो हीच त्या साईचरणी सदिच्छा.

# बाबांच्या कृपेने गंभीर शस्त्रक्रिया टळली

**— सौ. सरीता गोविंद लिखिते**
ब १७५/१, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

मार्च १९८५ मधील ही घटना. माझ्या पुण्याच्या भावाचे एकाएकी प्रेशर वाढायचे व तो आजारी पडायचा. सर्व डॉक्टरी चाचण्या झाल्या. किडनी व्यवस्थित काम करीत नसल्याने असे होते, असे तज्ञ डॉक्टरांनी निदान केले. त्याप्रमाणे शस्त्रक्रिया करुन किडनी काढून टाकावयाचे ठरले. १३ मार्च १९८५ ला शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित झाले. मला तसे पत्र आले. पत्र वाचून मी पार घाबरुन गेले. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. तो आमच्या पेक्षा खूपच लहान.व एवढ्या लहान वयात एवढे मोठे ऑपरेशन। काय करावे तेच सुचेना. शेवटी मी श्रीसाईबाबांची प्रार्थना केली की, माझ्या भावाची किडनी पूर्ववत काम करु दे. १३ मार्चला त्याला ठरल्याप्रमाणे शस्त्रक्रिया टेबलवर घेतले गेले. परंतु डॉक्टरांच्या मनात विचार आला की, एकदम किडनी काढून टाकू नये. त्याप्रमाणे त्यांनी बाहेर येऊन भावाच्या पत्नीला तशी विचारणा केली. त्यावर ती म्हणाली, आपणच तज्ञ आहात, तेव्हा आपणास योग्य वाटेल तसे करा. डॉक्टरांनी किडनी काढली नाही. आता त्याची तब्येत उत्तम आहे. ही सर्व श्रीसाईबाबांचीच कृपा होय! अशा आमच्या परम पूज्य बाबांना कोटि कोटि प्रणाम.

# शिरडीवृत्त – मे १९८७

या महिन्यात शाळा, कॉलेजना सुट्टी असल्यामुळे भक्तांची दर्शनासाठी गर्दी बरीच होती.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :

**कीर्तन :**

१) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान-पुजारी (गवई), कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

३) ह.भ.प. जानकीबाई इंगळे, गोरेगाव.

४) ह.भ.प. गंगाधर नरहरबुवा व्यास, डोंबिवली.

***प्रवचन :**

१) ह.भ.प. शंकर रंगनाथ भालेराव, शिरडी.

२) ह.भ.प. काशीबाई शिरसगांवकर, शिरसगांव

***भजन, गायन, वादन इ. :**

१) श्री. एस. विरेश, राजमंद्री २) श्री. पी. व्ही. वासुदेव शास्त्री, अनंतपूर ३) श्री. ेकुमार कौशल, ग्वाल्हेर ४) श्री. विलास पवार ५) स्वीट मेलडी ऑर्केस्ट्रा, घाटकोपर ६) श्री. आनंद आसवेकर ७) श्री. बद्धेश्वर गवाल ८) श्री. लवेश नुरी ९) श्री. संभाजी निळे १०) श्री. रवी पाटणकर ११) श्री. केतन तोडणकर १२) श्री. शंकर जाधव १३) श्री. अंकुश म्हशीलकर १४) श्री. माणिक डें १५) श्रीमती नलिनी डे १६) कु. मिना प्रधान १७) श्री. बलराज भातणकर १८) श्री. गोविंद १९) श्री. दिलीप पांडे २०) श्री. नाखवा २१) श्री. सदानंद व पुढील पाच हितचिंतक २२) श्री राबीन २३) कु. शीला २४) श्री. चंद्रकांत ट्रॅव्हल्स, गिरगांव २५) श्री. नंदू भाटीया, शिरडी २६) श्री. संतोष पात्रे २७) श्री. तुकाराम रघुनाथ गोसावी, जोगेश्वरी २८) श्री. नथुलाल पाराशर, वरळी २९) श्री. मोहनदास वि. नार्वेकर, मालाड ३०) श्री. गणपत ना. नाणवे, मालाड ३१) श्री. एम. के. सक्सेना, अजली मितल ३२) सौ. वत्सलाबाई काशीनाथ पवार, शिरडी ३३) श्री. प्रभुदास लक्ष्मण जाधव, जामगांव ३४) श्री. ह.भ.प. गुलाब महाराज, काटेल ३५) श्री. रमेश एन. गुलानी, लक्ष्मीनगर ३६) सौ. आशा गुलानी ३७) कु. रत्नमाला गुलानी ३८) श्रीमती आर.रुक्मिणी ३९) श्री. सुभाषचंद्र शंकरराव थोरात ४०) श्री. त्रिंबक माणिकराव देशमुख ४१) श्री. गंगाधर विष्णुपंत देव ४२) विद्या राणी दत्त, बंगलोर ४३) श्री. पी. के. दत्त ४४) श्री. बी. बी. मोहन ४५) श्री. रतनलाल **शर्मा,** ४६) श्री. शिरडी साईबाबा भक्त समाज, चल्लापल्ली ४७) श्री. शिरडी साईबाबा ध्यान मंदिर, मछलीपटटण ४८) श्री. ए. सांबशिवराव, निजामाबाद ४९) श्री. रावळ पल्ली व्यंकटेशराव, चल्लापल्ली ५०) श्री. हसमुख ओंकार पाटील, नवापूर ५१) साईकृपा म्युझिकल बॅण्डपथक पार्टी, कळवणे ५२) कु. आशा ठाकूर

५३) श्री. नन्हेबाबू कुँवर, बिदर ५४) श्री. वई अंजनील, कुलू ५५) कु. मंजिरी कर्वे, पूर्ण ५६) श्री. आर. प्रताप राजू, पावगढा.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

• ———— •

## श्री. रामचंद्र सहादू पा. कोते साईचरणी विलीन

श्री. साईबाबा संस्थान शिरडी येथील कर्मचारी श्री. रामचंद्र सहादू पाटील कोते यांचे दि. १७.४.८७ रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५९ वर्षे होते.

श्री. रामचंद्र पाटील कोते हे श्रींच्या रथ, पालखी मिरवणुकीच्या वेळी भारुड कार्यक्रम करीत असत.

ईश्वर त्यांच्या मृतात्म्यास शांती व सद्गती देवो.

: ———— :

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।**
**स संन्यासीच योगी च न निरग्निर्न चक्रियः ॥१॥**
(श्री मद्भगवद्गीता, अध्याय ६ वा)

**अर्थ–** जो आपले कर्म करीत असताना, फलाची अभिलाषा धरीत नाही तोच खरा संन्यासी आणि तोच खरा योगी होय. परंतु ज्याने अग्निहोत्रादिक कर्मांचा त्याग केला आहे, आणि जो कोणतेच कर्म करीत नाही, तो संन्यासी नव्हे व योगीही नव्हे.

: ———— :

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।**
**न ह्मसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥२॥**
(श्री मद्भगवद्गीता, अध्याय ६ वा)

**अर्थ–** संन्यास म्हणजे योग किंवा भगवंताशी एकरुप होणे होय, कारण मानवाने इंद्रिय तृप्तीच्या आसक्तीचा त्याग केला नाही तर तो पूर्ण योगी बनू शकत नाही.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19 Licence To Post Without
Prepayment at Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १ | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७"x२२" | २-८० | ५-५० |
| २. | –,,– | १४"x२०" | १-५० | ५-५० |
| ३. | –,,– | ७"x१०" | ०-९० | ५-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४"x२०" | ०-८० | ५-५० |
| ५. | मूर्ती फोटो | ७"x१०" | ०-९० | ५-५० |
| ६. | पालखी फोटो | ७"x१०" | ०-९० | ५-५० |
| ७. | ऑफसेट फोटो | ७"x१०" | ०-९० | ५-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :–**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

**मुद्रक :** श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर,
मुंबई-४०० ०१४.